# माणूस

शनिवार । २४ जुलै १९७६ । साठ पैसे


# प्राध्यापक उदंड जाहले!!

प्रा. राम बिवलकर

**दहा + दोन + तीन** या नव्या अभ्यासक्रमाने अनंत समस्या उभ्या केल्या. मास एज्युकेशनपासून क्लास एज्युकेशन अशी उलटी वाटचाल आमच्या शिक्षणक्षेत्राने सुरू केली की काय, अशी भीती वाटू लागली. महाविद्यालयीन स्तरावरील प्राध्यापक उदंड झाल्याचे चित्र अलीकडे दिसू लागल्यामुळे ती साधार ठरू लागली. प्राध्यापकांची बेकारी ही आजवर ना कुणी ऐकिली, अशी समस्या आहे. देशात शिक्षणाचा प्रसार करायचा, ते बहुजनसमाजाला उपलब्ध करायचे, तर शिक्षकांची बेकारी संभवतेच कशी ? देशातील अशिक्षितपणा संपल्याने व शिक्षणसंस्थांची संख्यावाढ खुंटल्याने शिक्षक–प्राध्यापकांची मागणी घटली का ? पण देशातील अशिक्षितांची संख्या वाढत असताना शासकीय शिक्षणविषयक नव्या धोरणाने ती समस्या निर्माण झाली आहे. तिची चाहूल लागताच यंदा एप्रिल महिन्यात महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांच्या क्षेत्रातील महाविद्यालये चालविणाऱ्या कितीतरी संस्थांनी आपल्या अनेक कायम आणि तात्पुरत्या नेमणुका केलेल्या प्राध्यापकांना नोटिसा देऊन महाविद्यालयाला जूनपासून त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्याचे कळविले. प्राध्यापकीय जगतात असुरक्षितेची लाट उसळली. संबंधितांनी शासनाकडे दाद मागितली. प्राध्यापक संघाने आपली कैफियत मांडली. मा. शिक्षणमंत्र्यांनी विधानसभेत केलेल्या भाषणाचा उल्लेख करून, महाविद्यालयांच्या संचालक मंडळाने तसे न करण्याचे आवाहन केले. नवा अभ्यासक्रम प्रत्यक्षात उतरताना कुणाही कायम प्राध्यापकाची नोकरी जाणार नाही या आपल्या आश्वासनाचा पुनरुच्चार केला. पण या आवाहनाची फारशी दखल महाविद्यालयांच्या संचालकांनी घेतली नाही. नागपूर विद्यापीठाच्या कक्षेतील महाविद्यालयात तसे घडले नाही याचे कारण त्या विद्यापीठाच्या कुलगुरूंनी १९७४ च्या नागपूर विद्यापीठ कायद्याच्या कलम ११ (६) (ब) अन्वये, महाविद्यालयांच्या संचालकांनी, ७ फेब्रुवारी १९७५ पूर्वी दोन वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कुणाही प्राध्यापकाला नोकरीवरून काढू नये अगर पदावनती करू नये असा सक्त आदेश काढला होता.

या सर्व परिस्थितीत प्राध्यापकांनी प्रशंसनीय संयम दाखवला हे मान्य केले पाहिजे. 'दहा अधिक दोन अधिक तीन' या आकृतिबंधाचा फेरविचार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या समितीकडे मुंबई विद्यापीठ प्राध्यापक संघटनेने अलीकडे जे निवेदन सादर केले त्यामध्ये नव्या आकृतिबंधामुळे निर्माण होणारी प्राध्यापकांची बेकारी, ती दूर करण्याचे उपाय, शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचे मार्ग या गोष्टींचे तर्कशुद्ध विश्लेषण केले आहे.

गेल्या काही वर्षांत राज्यातील गुणवत्ता घटण्याचे एक कारण असे आहे की, शिक्षणविस्तार होत असता विद्यार्थी–प्राध्यापक प्रमाण (Student–Teacher Ratio) भरमसाठ वेगाने वाढत आहे. विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येच्या मानाने प्राध्यापकांची संख्या कमी पडत आहे. शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत असता, विद्यार्थी–प्राध्यापक प्रमाण घटवणे आवश्यक आहे. असे असताना, नव्या अभ्यासक्रमामुळे अनेक जुन्या-जाणत्या प्राध्यापकांच्या हातीही संचालकांनी नारळ ठेवावा हे अजब आहे! विद्यापीठ अनुदान मंडळाने १।१।१९७३ पासून देऊ केलेल्या वेतनश्रेणीच्या प्रश्नाला बगल देण्याच्या दृष्टीने, नव्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी महाराष्ट्र शासन व्यापारी दृष्टीने आणि उपलब्ध निधीच्या कक्षेत करू पाहत आहे, ही गोष्ट महाराष्ट्रातील शिक्षणक्षेत्राच्या प्रगतीच्या दृष्टीने निःसंशय घातक आहे.

अनेक महाविद्यालयांतील प्राध्यापक अतिरिक्त ठरण्याची कारणे अनेक आहेत.

१ : शहरातील सकाळचे आणि संध्याकाळचे वर्ग बंद करण्याचा

पृष्ठ २ वर

# साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक सातवा

२४ जुलै १९७६

मूल्य : साठ पैसे



संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


पृष्ठ १ वरून....

निर्णय घेतला गेला आहे. म्हणजे नोकरी करून शिक्षण घेणाऱ्यांचे शिक्षण बंद पडणार.

२ : काही भाषा, भूगोल, इतिहास यांसारख्या विषयांना वीसपेक्षा कमी विद्यार्थी मिळत असतील, तर ते विषय शाळांनी शिकवू नयेत, असे धोरण जाहीर झाले आहे. त्यामुळे काही विषय शिक्षणातूनच हद्दपार होत आहेत. उदा.–

(१) संस्कृत भाषेला आपण विविध भारतीय भाषांची जननी म्हणतो. तिचा सामान्य शिक्षणात अभ्यास व्हायला हवा असे प्रतिपादन करतो. संस्कृतची विद्यापीठे निघावीत अशा मागण्या पुढे येतात. संस्कृतचे ज्ञानकोश राष्ट्रपतींच्या हस्ते प्रकाशित होतात. आकाशवाणीवरून संस्कृतमधून 'वार्ताश्रूयताम्' म्हणून बातम्या ऐकवल्या जातात. पण नव्या आकृतिबंधात संस्कृत हा हिंदीला पर्याय अगर संस्कृत / हिंदी एक पेपर–परिणामतः माध्यमिक शाळांतून संस्कृत शिकवलेच जात नाही. मग ज्युनिअर कॉलेजांतूनही ती भाषा हद्दपार होणार आणि महाविद्यालयीन स्तरावरही संस्कृतला स्थान नसणार हे उघड आहे. सहाजिकच नव्या आकृतिबंधाच्या राबवणीत दोन दोन तपे संस्कृत शिकविणाऱ्या गुणवान प्राध्यापकांना अतिरिक्त म्हणून घरी बसण्याचा प्रसंग आला आहे.

(२) जी स्थिती संस्कृतची तशीच थोडीफार स्थिती भूगोलाची–इतिहासाची. इतर काही भाषांची.

३ : दहा + दोन + तीन या आकृतिबंधात अधिक दोन हे ज्युनिअर कॉलेजचे वर्ग शाळांना जोडावे ही विद्यापीठ अनुदान मंडळाची सूचना अंमलात आणण्याच्या प्रयत्नात अनेक ठिकाणी शाळांना, काही ठिकाणी कॉलेजांना हे वर्ग जोडले गेले. माध्यमिक वेतनश्रेणीपेक्षा जरा बऱ्या वेतनश्रेणीच्या लोभाने अनेक शाळांनी अकरावी मागितली. पण ग्रामीण भागातल्या शाळांची स्थिती अकरावी मिळूनही केविलवाणी झाली. कला, वाणिज्य, विज्ञान या तिन्ही शाखांना पुरेसे विद्यार्थी मिळणेच अशक्य झाले. शिक्षक, पुस्तके, प्रयोगशाळा, उपकरणे, इमारती हे सारे प्रश्न होतेच ! अनेक शाळांचे अकरावीचे वर्ग सुरूच झाले नाहीत. काही ठिकाणी फक्त कॉमर्स, काही ठिकाणी फक्त सायन्स. कला शाखेचे वर्ग तर हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या शाळांतही सुरू झाले नाहीत. परिणामतः ग्रामीण भागातील सरासरी ४० टक्के विद्यार्थी दहावीनंतर घरीच बसले. यात विद्यार्थिनींची संख्या मोठी होती. अकरावी सुरू करणाऱ्या शाळांजवळ वसतिगृहे नव्हती. अकरावीकरता परगावी मुलींना ठेवण्याची अनेक पालकांची इच्छा नव्हती; आस्थाही नव्हती. वर्ग सुरू व्हायलाच सप्टेंबर उजाडला–अशी अनेक कारणे त्यामागे होती. परिणामतः यंदा बारावीचे वर्ग कॉलेजांना जोडले तरी, कॉलेजच्या कला शाखेच्या बारावीच्या वर्गाला विद्यार्थीच नाहीत अशी सर्व ग्रामीण महाविद्यालयांची स्थिती आहे. वाणिज्य आणि विज्ञान शाखांचेही प्रत्येकी १०० विद्यार्थी मिळणे या कॉलेजांना अशक्य झाले. याला कारण शासनाचा तालुकावार एकेक शाळेला बारावीचे वर्ग देण्याचा निर्णय हे आहे. विद्यार्थ्याला पुढील शिक्षणासाठी दूरवर परगावी जावे लागू नये या दृष्टीने हा निर्णय घेतला गेला असला

तरी, त्यामुळ धड त्या शाळांनाही विद्यार्थी मिळणार नाहीत आणि कॉलेजांनाही मिळणार नाहीत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यात पुन्हा सरकारने काही अपवाद करून, कॉलेज असलेल्या तालुक्यातही शाळेला बारावी दिली. उदा. – महाड तालुक्यात महाडला डॉ. आंबेडकर, कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय असूनही महाडपासून चार मैलांवरील वहूर येथील फजंदार हायस्कूलला विज्ञानशाखेचा बारावीचा वर्ग काढण्याची अनुज्ञा मिळाली आहे. या परिस्थितीचा साहजिक परिणाम ग्रामीण भागातील कॉलेजांना जोडलेल्या ज्युनिअर कॉलेजच्या वर्गातही पुरेशी विद्यार्थी संख्या न आल्याने ती कॉलेजे आर्थिकदृष्ट्या धोक्यात येऊन तिथला काही प्राध्यापकवर्ग अतिरिक्त होण्यात झाला आहे.

बदलत्या जगात, अभ्यासक्रम सातत्याने अद्ययावत राखले पाहिजेत यात दुमत नाही. त्या दृष्टीने नव्या आकृतिबंधाप्रमाणे–अभ्यासक्रमात बदल झाले–परिस्थितीप्रमाणे त्यात सुधारणा करण्यात येत आहेत हीही गोष्ट चांगली आहे. पण अभ्यासक्रम अद्ययावत करणे आणि शिक्षण क्षेत्राचा अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ढाचा बदलणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. दहा + दोन + तीन आकृतिबंधामुळे ना शाळांचा फायदा झाला ना महाविद्यालयांचा. ज्युनिअर कॉलेजचा अभ्यासक्रम शिकविण्याची पात्रता असलेला शिक्षकवर्ग महाविद्यालयांतून उपलब्ध असता आणि ते वर्ग शाळांना जोडल्यामुळे आणि महाविद्यालयीन शिक्षण-व्यवस्थेचा ढाचा बदलल्यामुळे–महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक अतिरिक्त ठरण्याचा धोका असता, शासनाने वरीलप्रमाणे निर्णय घेणे शिक्षणक्षेत्राचा खेळखंडोबा करायला कारणीभूत झाले आहे. त्यापेक्षा ज्युनिअर कॉलेज आणि डिग्री कॉलेजातील शिक्षण-व्यवस्था एकसंध केली असती तर हा गोंधळ मुळीच झाला नसता. जुन्या अकरावीनंतर महाविद्यालयाची पायरी चढणारी मुले दहावीनंतर महाविद्यालयात आली असती. अनेकांचे शिक्षण जे बंद पडले तेही झाले नसते. मास एज्युकेशनपासून क्लास एज्युकेशन अशी उलटी गती शिक्षणक्षेत्राला दिल्याचा आरोपही सरकारवर झाला नसता. अकरावी, बारावीचा अभ्यासक्रम खरोखरच, फर्स्ट इयर वा इंटर या वर्गाच्या बरोबरीचा अगर कांकणभर वरच्या दर्जाचा आहे. तो शिकविणे महाविद्यालयातील प्राध्यापकांना सहज शक्य झाले असते. त्यांच्यात ज्या दोन जाती–वेतनश्रेणीप्रमाणे पडू पाहत आहेत त्याही पडल्या नसत्या. आजच्या कार्यविभागणीत ज्युनिअर कॉलेजच्या वर्गात शिकविण्यासाठी फक्त ज्युनिअर प्राध्यापकच ढकलले जाण्याची शक्यता. न राहता महाविद्यालयातील अनुभवी प्राध्यापकांच्या शिकविण्याचा फायदाही ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना मिळाला असता. पुढील काळात उच्चशिक्षणाचा दर्जा सुधारायचा असेल तर, शैक्षणिक-व्यवस्थापनाच्या गोंधळामुळे आज अतिरिक्त ठेवून दूर केल्या जाणाऱ्या अनेक अनुभवी प्राध्यापकांची जागा त्या वेळी कुणी भरून काढायची ? तुकडीतील विद्यार्थी संख्या कमी करून, विषयवार व्याख्यान संख्या वाढवून, टच्युटोरिअल्सचे वर्ग अधिक घेऊन, विद्यार्थी-प्राध्यापक प्रमाण घटवता आले असते, प्राध्यापकांना वाचनाकरता, संशोधनाकरता अधिक वेळ देता आला असता व शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचे प्रयत्न करता आले असते.

शासनाने ६ मे १९७६ रोजी काढलेल्या जी. आर. मध्ये (H S C 1076 / 419 – XX–XXI) ज्युनिअर कॉलेजे चालविण्याबद्दलचे धोरण जाहीर झाले आहे. त्यात ज्युनिअर कॉलेजे चालविण्यासंबंधीचे नियम आणि निर्बंध स्पष्ट केले आहेत. उदा.–फीचे दर, तुकडीमध्ये आवश्यक विद्यार्थी-संख्या, शिकविण्याचे विषय, प्राध्यापकांची आवश्यक गुणवत्ता, सर्व्हिस कंडिशन्स् इत्यादी. ज्युनिअर कॉलेजात शिकविणाऱ्या प्राध्यापकाची कमीत कमी गुणवत्ता, दुसऱ्या वर्गाची मास्टर्स डिग्री अधिक बी. एड्. अगर शिक्षणशास्त्रविषयक पदविका किंवा प्रमाणपत्र अशी ठरविण्यात आली असून, डिग्री कॉलेजातील जे प्राध्यापक अतिरिक्त ठरून ज्युनिअर कॉलेजांतून सामावले जातील त्यांनीही वर उल्लेखिलेली शैक्षणिक पदवी, पदविका अगर प्रमाणपत्र पुढील पाच वर्षांत प्राप्त केले पाहिजे. मगच या प्राध्यापकांना रु. ३००–१५–४५०–EB–२०–५५०–२५–६५० या वेतनश्रेणीसाठी लायक समजले जाईल.

याशिवाय डायरेक्टर ऑफ हायर एज्युकेशन यांच्या कार्यालयाने दि. १३ मे १९७६ रोजी एक मार्गदर्शक परिपत्रक काढून, विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी आपापल्या महाविद्यालयांतील विषयवार प्राध्यापकांचे वर्कलोड कसे मापावे व त्यावरून कोणते प्राध्यापक अतिरिक्त ठरतात हे कसे ठरवावे, याची कार्यपद्धती ठरवून देऊन या अतिरिक्त प्राध्यापकांना ज्युनिअर कॉलेजात अगर इतरत्र कसे सामावून घेतले जाईल याचे दिग्दर्शन केले. या मार्गदर्शक परिपत्रकानुसार अतिरिक्त ठरणाऱ्या प्राध्यापकांची पाच प्रकारे वर्गवारी ठरविली गेली.

अ : ७ फेब्रुवारी १९७५ पूर्वी महाविद्यालयात रिक्त जागेवर कायम झालेले अगर त्या दिनांकापूर्वी रिक्त जागेवर सातत्याने दोन वर्षे काम केलेले प्राध्यापक.

ब : ७ फेब्रुवारी १९७५ या दिवशी वा त्या पूर्वी महाविद्यालयाच्या सेवेत असणारे आणि १९७५–७६ सालाअखेरपर्यंत सातत्याने सेवेत असून १९७५–७६ सालाअखेर दोन वर्षांची अगर जादा सेवा पूर्ण झालेले प्राध्यापक.

क : ७ फेब्रुवारी १९७५ या दिवशी वा तत्पूर्वी महाविद्यालयाच्या सेवेत असणारे आणि १९७५–७६ सालाअखेर सातत्याने सेवेत असूनही त्या सालाअखेर दोन वर्षांची सेवा पूर्ण न झालेले प्राध्यापक.

ड : ७ फेब्रुवारी १९७५ पूर्वी रिक्त जागेवर नेमले जाऊन कायम झालेले अगर त्या दिनांकापूर्वी २ वर्षांची सेवा पूर्ण झालेले, रु. २५०–४०० च्या वेतनश्रेणीत अगर तत्सम वेतनश्रेणीत असणारे पण १ जुलै १९७५ ला व्याख्यात्याची गुणवत्ता प्राप्त असलेले टच्युटर्स अगर डेमॉन्स्ट्रेटर्स.

इ : वरील 'ड' प्रमाणेच परिस्थिती असलेले पण व्याख्यात्याची गुणवत्ता नसलेले टच्युटर्स अगर डेमॉन्स्ट्रेटर्स.

प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या सेवेतील सर्व प्राध्यापकांच्या वर्कलोडचे मापन करून संपूर्ण अतिरिक्त कोण ठरतात त्यांची यादी तयार करण्याच्या दृष्टीने, डायरेक्टर ऑफ हायर एज्युकेशन यांनी नेमलेल्या समितीपुढे ती सर्व आकडेवारी सादर करावी, असाही आदेश सुटला. परिपत्रकात प्रत्येकाचे काम कसे मापावे, कुणाला सीनिअर धरावे, त्या अग्रक्रमाने एकूण खात्याचे काम महाविद्यालयाच्या सेवेत विषयवार असणाऱ्या प्राध्यापकात कसे वाटावे आणि त्याप्रमाणे

युक्त, अर्धअतिरिक्त आणि अतिरिक्त प्राध्यापक कसे ठरवावे याचेही सोदाहरण स्पष्टीकरण देण्यात आले. शैक्षणिक प्रश्नांचा विचार सरकारी पद्धतीने कसा होतो याचा नमुनाच या पद्धतीने दाखविला !

महाविद्यालयीन स्तरावर विषयाचे नाव विशिष्ट असले तरी त्याचे अनेक पोटविषय असतात आणि तेथे शिकविण्यासाठी विशेषत्वाने त्या पोटविषयांचे अध्ययन केलेली माणसे लागतात, याचा विचार वरील पद्धतीत झालाच नाही. उदा.–विज्ञान शाखेतील रसायनशास्त्र हा विषय घेतला तर बी. एस्सी. पातळीवर या विषयाचे ऑरगॅनिक केमिस्ट्री, इनरॅगॅनिक केमिस्ट्री, फिजिकल केमिस्ट्री असे विविध पोटविषय शिकवावे लागतात. ऑरगॅनिक केमिस्ट्रीचा प्राध्यापक, इनरॅगॅनिक अगर फिजिकल केमिस्ट्री शिकवू शकत नाही. विषयाचे एकूण तास मोजून त्याला १७ ने भागून माणसे युक्त अगर अतिरिक्त ठरविली तर एखादा पोटविषय शिकविणारा ज्युनिअर प्राध्यापक अतिरिक्त ठरेल, एखादा पोटविषय शिकविणाराचे काम फक्त डेमॉन्स्ट्रेटरचे राहील !

आजवर विद्यापीठे या गोष्टींचा विचार करून १५ लेक्चर्स + ४ ट्युटोरियल्स हे प्राध्यापकाचे आठवडयाचे जास्तीत जास्त काम मानीत आली तरी पोटविषय शिकविण्याच्या दृष्टीने कुणाचे काम कमी असले तरी त्याला अतिरिक्त मानीत नसत. अशा कमी तास घेणाऱ्या प्राध्यापकांच्या पगारावर शासनही प्रमाणित अनुदान देत होते. मग ज्युनिअर कॉलेजचे वर्ग डिग्री कॉलेजांना जोडण्याचा निर्णय घेतल्याबरोबर सरकारने असा अविवेकी कार्यमापनाचा निर्णय घेणे म्हणजे मी वर म्हटल्याप्रमाणे व्यापारी हिशेब झाला. शिक्षणक्षेत्रात व्यापारी हिशेब–शिक्षणाचा विकासच कुंठित करणारा ठरतो.

अतिरिक्त प्राध्यापकांना वरील वर्गवारीप्रमाणे अग्रक्रम धरून विविध महाविद्यालयांतून सामावून घेण्याचा शासन प्रयत्न करणार आहे. प्रत्येक वर्गातील प्राध्यापकांची सीनिऑरिटी (गुणवत्ता, सेवाकाल, वेतनश्रेणी, वय या अनुरोधाने ती ठरवून) विचारात घेऊन हे 'सामावण्याचे' कार्य होणार आहे. महाविद्यालयात अर्धअतिरिक्त ठरलेल्या मंडळींना काम पूर्ण करण्याकरता ज्युनिअर कॉलेजात काम करावे लागले तरी, आज असलेले त्यांचे वेतन सुरक्षित राहीलच, पण शिवाय उद्या डिग्री कॉलेजांच्या प्राध्यापकांना विद्यापीठ अनुदान मंडळाने सुचविलेली उच्च वेतनश्रेणीही वि. अ. मंडळाने व केंद्र सरकारने मान्य केल्यास, मिळू शकेल असेही परिपत्रकात म्हटले आहे. अतिरिक्त प्राध्यापक जर 'कायम' असेल अगर ७ फेब्रुवारी १९७५ पूर्वी त्याची दोन वर्षे सेवा झाली असेल, तर त्याला आपल्याच महाविद्यालयात ज्युनिअर कॉलेजात काम करणे अगर महाराष्ट्रातील इतर कुठल्याही महाविद्यालयात त्याच पदावर जाण्यास तयार असणे असे दोन पर्याय देण्यात आले आहेत. त्याने ज्युनिअर कॉलेजात काम करणे मान्य केले तर, त्याला ज्युनिअर कॉलेजच्या प्राध्यापकांची वेतनश्रेणी लागू होईल आणि वि. अ. मंडळाची उच्च वेतनश्रेणी तो त्या पदावर असेपर्यंत त्याला मागता यायची नाही. त्याने तसे स्पष्टपणे लिहून द्यावे असेही परिपत्रक म्हणते. पण असेही काही विषय आहेत (उदा.–संस्कृत, पाली, अर्धमागधी) की, त्या विषयांच्या प्राध्यापकांना इतरत्र त्याच पदावर सामावणेही शक्य होणार नाही आणि आपल्याच महाविद्यालयातील ज्युनिअर कॉलेजातही त्यांना काम असणार नाही. माध्यमिक शिक्षणामध्ये त्या विषयांची जी हेळसांड गेली अनेक वर्षे चालू आहे, त्यामुळे हे अटळ आहे. या प्राध्यापकांचे काय करायचे, हा प्रश्न शासनापुढे 'यक्षप्रश्न' ठरणार आहे.

सरकारचे हे तपशीलवार मार्गदर्शन करणारे परिपत्रक आणि ६ मेचा जी. आर. 'प्राध्यापकांची बेकारी' या समस्येच्या गाभ्याला हातच घालीत नाही. ७ फेब्रुवारी ७५ पूर्वी कायम असलेल्या वा दोन वर्षांची सेवा पूर्ण झालेल्या मंडळींच्या डोक्यावरही नोकरी गमावण्याची टांगती तलवार आहे, मग इतर प्राध्यापकांची दैना काय वर्णावी ? म्हणजे सरकार प्राध्यापकांची बेकारी अटळ आहे, हे मान्य करून ती पद्धतशीर व कार्यक्षमतेने कशी अंमलात येईल, याचाच विचार या परिपत्रकात आणि जी. आर. मध्ये करीत आहे, असा त्याचा अर्थ होतो. म्हणजे पर्यायाने एप्रिलमध्ये ज्या कॉलेज-संचालकांनी आपल्या शेकडो प्राध्यापकांना नोटिसा बजावल्या त्यांची कृती कायदेशीर करण्याचा हा प्रयत्न ठरतो.

विद्यार्थी-संख्या वाढत असता, प्राध्यापकांची संख्या कमी असल्याने वाढत्या विद्यार्थी–प्राध्यापक प्रमाणामुळे शिक्षणाचा दर्जा घसरतो आहे हे मूळ प्रमेय, धोरण ठरविणारांना आकलन होत नाही की, ते ते जाणूनबुजून या प्रश्नाकडे दुर्लक्ष करताहेत हे समजत नाही. खरे तर विद्यापीठांनी आणि शासनाने या प्रश्नावर लक्ष केंद्रित करायला हवे.

दिनांक ११ जून १९७६ रोजी सरकारने आणखी एक जी. आर. काढून, ३० सप्टेंबर १९७६ पर्यंत 'जैसे थे' परिस्थिती राखावी म्हणून महाविद्यालयांच्या संचालकांना आदेश दिला आहे. तोपर्यंत अतिरिक्त प्राध्यापकांच्या यादीची छाननी होऊन, विविध ठिकाणी उपलब्ध असलेल्या रिक्त जागांवर त्यांच्या नेमणुका शक्य होतील, असा सरकारचा अंदाज आहे. प्रत्यक्षात आज इंग्रजी व कॉमर्स या विषयांचे प्राध्यापक अनेक महाविद्यालयांना हवे आहेत, पण अतिरिक्तांच्या यादीत या विषयांचे कुणी फारसे नाहीत. संस्कृत, पाली, अर्धमागधी, उर्दू, पर्शिअन, अरेबिक, हिंदी, इतिहास, भूगोल, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित या विषयांचे बरेच आहेत. मुंबई–पुण्यासारख्या मोठ्या शहरांत ज्युनिअर कॉलेजांच्या अनेक तुकड्या भरल्याने या अतिरिक्तांना तिथे निदान ज्युनिअर कॉलेजात समाविष्ट करता येईल–पण ग्रामीण भागातील महाविद्यालयांच्या ज्युनिअर कॉलेजच्या तुकड्या कमीत कमी विद्यार्थी-संख्येनेही पूर्ण होणे कठीण (तालुकावार शाळांना अकरावी–बारावीचे वर्ग दिले गेले आहेत) असताना ही मंडळी इतरत्र सामावणार कशी ? ३० सप्टेंबरपर्यंत महाविद्यालयांच्या संचालकांनी अगदी तात्पुरत्या म्हणून हव्या त्या प्राध्यापकांच्या नेमणुका कराव्या अगर कसेही काम रेटावे–असेही जी. आर. म्हणतो. ज्यांना ज्युनिअर कॉलेजातही काम देता येत नाही त्यांना बसवून ठेवायचे ! ठेवायचे ते तात्पुरते ! या सगळ्या परिस्थितीत महाविद्यालयीन शिक्षणाचा केवढा खेळखंडोबा होणार आहे ? एप्रिल–मेमध्ये एका हाती नोटीस असूनही विद्यापीठ परीक्षांच्या उत्तरपत्रिका धीमेपणाने तपासण्याचे काम वेळेवारी करणाऱ्या प्राध्यापकांच्या डोक्यावरील टांगती तलवार महिनोन् महिने तशी राहिली तर शिकविण्याकडे कुणाचे लक्ष लागेल ?

सारांश, नवे धोरण ठरविताना आणि कार्यमापनाची मार्गदर्शक पद्धती ठरविताना शासनाने खालील गोष्टींची दखलच घेतली नाही.

१ : विविध पीद्यापीठांचे अभ्यासक्रम वेगळे आहेत. प्रत्येक वर्षाला जे पेपर शिकविले जातात त्यांची संख्या वेगळी आहे. उदा. पुणे विद्यापीठात एस्. वाय्. ला प्रमुख विषय, साहाय्यभूत विषय आणि जादा विषय अशा तीन विषयांचे ६ पेपर्स शिकविले जातात–तर टी. वाय्. ला प्रमुख विषयांचे चार पेपर्स + इंग्रजी असे पेपर्स असतात. याउलट मुंबई विद्यापीठात एका प्रमुख विषयाचे वेगवेगळ्या तीन उपविभागांचे एकेक असे तीन पेपर्स, साहाय्यभूत विषयाचा एक पेपर अधिक इंग्रजीचा एक असे पाच पेपर्स ज्युनिअरला व तसेच पाच सीनियरला शिकविले जातात. कुठले पेपर्स ज्युनियरचे व कुठले सीनियरचे असे ठरलेले नसल्याने, ज्या महाविद्यालयात कमी विद्यार्थी असतात तिथे ज्युनियर व सीनियरचे वर्ग एकत्र करून आलटून पालटून हे दहा पेपर्स शिकविले जातात. अशा परिस्थितीत मुंबई विद्यापीठाच्या कक्षेतील महाविद्यालयातील प्राध्यापकांचे वर्कलोड कमी दिसणार व त्यामुळे जास्त संख्येने प्राध्यापक अतिरिक्त ठरणार.

२ : प्रत्येकी सतरा तासिकांच्या नियमामुळे एकत्र प्राध्यापक एकाच वेळी विविध वर्गांना शिकवू शकत नसल्याने वेळापत्रक सकाळपासून संध्याकाळपर्यंत विस्तारित करावे लागेल–याला विद्यार्थ्यांचा विरोध होईल.

३ : एकाच तालुक्यात कमीत कमी संख्येच्या (५०) दोन बारावीच्या तुकड्यांना अनुमती देणे सरकारला खर्चाचे ठरेल.

४ : ग्रामीण भागात ज्युनिअर कॉलेजे महाविद्यालयांनाच जोडावी, असे जिल्हा परिषदांचेही म्हणणे आहे. कुलाबा जिल्हा परिषदेने तसा ठराव केल्याचीही बातमी आली आहे.

५ : तालुकावार बारावी देण्याचा निर्णय–विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणासाठी दूर जावे लागू नये म्हणून असला–तरी कोकणासारख्या दुर्गम आणि मागासलेल्या भागात तालुक्याचे ठिकाण अंतराच्या दृष्टीनेही गैरसोयीचे ठरते. मागासलेल्या भागात शिक्षणाचा प्रसारच कमी असल्याने तालुकावार वर्गांना विद्यार्थी मिळणेही शक्य नाही.

६ : नव्या आकृतिबंधातील सीनिअर कॉलेजच्या अभ्यासक्रमाचे चित्र स्पष्ट नसताना, गतवर्षीच्या पार्श्वभूमीवर वर्कलोड ठरविणे चुकीचे आहे.

७ : कलाशाखेचे अकरावीचे वर्ग–शासकीय धोरणामुळे गतवर्षी अनेक ठिकाणी निघूच शकले नाहीत. हा प्रकार चालूच राहिल्यास कलाशाखेला फारच थोडे विद्यार्थी सीनियर कॉलेजला येतील. १७ तासिकांच्या कार्यमापनाच्या धोरणामुळे एकाच प्राध्यापकाला वेगवेगळ्या वर्गांचे सहा पेपर्स शिकवायला लागतील. विद्यापीठीय शिक्षणाच्या रचनेत हे बसत नाही. कुणाही शिक्षकाने कुठलेही विषय शिकवावेत ही माध्यमिक शाळांतील पद्धती डोळ्यासमोर ठेवून १७ तासिकांची फूटपट्टी निघाली असावी, ती अयोग्य आहे. अर्धअतिरिक्त प्राध्यापक ही जात त्यातून निर्माण झाली आहे.

८ : देशातील सर्व क्षेत्रांतील बेकारी हटवणे हे पंतप्रधानांच्या वीस कलमी कार्यक्रमाचे उद्दिष्ट असताना प्राध्यापकांवर बेकारीची कुऱ्हाड उचलली जाणे गैर आहे.

९ : मार्गदर्शक–परिपत्रकातील, अतिरिक्त प्राध्यापकांना सामावून घेण्याची अग्रक्रमी वर्गवारी ७ फेब्रुवारी १९७५ या तारखेला का महत्त्व देते समजत नाही. वास्तविक महाविद्यालये १५ जूनला सुरू होतात. नव्या नेमणुका साधारणत: १५ जून ते १५ जुलै या दरम्यान होतात. म्हणून ही रेषा १५ जुलैची हवी. ७ फेब्रुवारी या दिनांकाला कुठले पावित्र्य चिकटले आहे ?

१० : महाविद्यालयाच्या संचालनात प्राचार्यांना मदत करणाऱ्या उपप्राचार्यांना अगर साहाय्यक प्राचार्यांनाही १७ तासिकांची सक्ती होणे चुकीचे आहे.

११ : नवा आकृतिबंधी अभ्यासक्रम महाविद्यालयांना भिडल्याबरोबर १७ तासिकांची सक्ती करून बेकारी निर्माण करून–बेकारांना सामावून घेण्याच्या कटकटी मागे लावून घेण्याची सरकारला काय गरज होती ? त्यापेक्षा नवा अभ्यासक्रम रुळेपर्यंत ४-५ वर्षे जाऊ देऊन, मग या सर्व परिस्थितीचा आढावा शासनाने घ्यायला हवा होता.

पण हे घडले नाही. व्यापारी दृष्टी शासनाने धरली. आकडे मांडले. चौकटी तयार केल्या. आदेश काढले. महाविद्यालये सुरू झाली, तरी आपणच निर्माण केलेल्या गोंधळाला शिस्त लावता येत नाहीसे पाहिल्यावर, ११ जूनचा जी. आर. काढून सध्या 'जैसे थे' ठेवा. 'न्यून ते पुरते अधिक ते सरते' प्राचार्यांनी पाहावे असा आदेश देऊन ते मोकळे झाले. प्रश्न पुढे ढकलला गेला, सुटला नाही.

यापेक्षा ज्युनिअर–सीनिअर कॉलेजांचे शिक्षण एकसंध करावे, परीक्षा घेण्याचे काम विद्यापीठांकडे सोपवावे. हायर सेकंडरी बोर्डाला रजा द्यावी. ज्या शाळांनी ज्युनिअर कॉलेजे काढली आहेत त्यांचे व्यवस्थापन ६ मेच्या जी. आर. प्रमाणे करावे. कॉलेजांची अनुदानसंहिता सुधारून द्यावी. कॉलेजातील ज्युनिअर–सीनिअर विभागातील सर्वांना एकच वेतनश्रेणी लागू करावी–म्हणजे शासनाच्या डोक्याची कटकट नाहीशी होईल. प्रश्न नव्या अभ्यासक्रमातील अद्ययावतीकरणाचा नसून शिक्षण व्यवस्थापनाचा आहे, हे ओळखून अशी पावले संबंधितांना उचलली पाहिजेत, असे कुणीही म्हणेल. ☐


**पॅपिलॉन**

**पॅपिलॉन**

**लेखक : हेन्री शॅरीयर**

**अनुवाद : रवींद्र गुर्जर**

**किंमत : पंचवीस रुपये**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# सोलकढी

## □ उलटया त्रिकोणात लाल शाईने—

मी का लिहितो, हा प्रश्न (माझ्या वाचकांना नेहमीच पडत असला तरी) मला कधीच पडत नाही. एक साहित्यिक म्हणून माझी राजसामाजिक जबाबदारी मी नीट जाणतो. आपल्याजवळ जे आहे ते वाचकांना सांगावे, त्यांना जमेल तितके शहाणे करून सोडावे, या देशाचे आदर्श नागरिक होण्यासाठी युक्तीच्या चार गोष्टी त्यांच्यापर्यंत पोचवाव्या, या एकाच हेतूने, उद्देशाने आणि प्रयोजनाने माझे बॉलपेन पुन्हा पुन्हा रिते होत असते आणि भरत असते. हा हेतू, उद्देश, आणि प्रयोजन इतके भव्योदात्त आहे की ते सोडून दुसऱ्या कशासाठी कोणी लिहीत असेल हे एकदम खरेच वाटणार नाही. पण असतात बरे; दुसऱ्यांसाठी न लिहिता केवळ स्वतःसाठी लेखणी चालवणारे लेखक असतात. मराठीत असेच साहित्यिक जास्त.

त्यांनी स्पंदनशील जीवनाची अनेककेंद्री आणि व्यापक व्यामिश्रता आकळलेली असते; अनेक पातळ्यांवरचा अनुभव संपृक्तपणे आपल्या खिशात साठवलेला असतो; प्रत्येक अनुभवाला त्याचा त्याचा जो सेंद्रिय आकार असतो तो शोधण्यासाठी त्यांची प्रतिभा व्याकुळलेली असते. दिवाळी अंकांच्या अलीकडे, स्वतःसाठी लिहिता लिहिता, त्यांच्या लिहित्या हातांना भोवऱ्या झालेल्या असतात. मी दुसऱ्यांसाठी लिहितो म्हणून हे स्वतःसाठी लिहिणारे साहित्यिक मला मानीत नाहीत.

मानीत नसत, असा रीतिभूतकाळ वापरणे अधिक बरोब्बर होईल.

आपण दुसऱ्यांसाठी लिहू शकतो, इतकेच नव्हे तर दुसऱ्यांसाठी जे लिहिले जाते तेच खरे साहित्य होय, अशी, 'उदयाचळी मित्र आल्या'सारखी जाणीव त्यांना प्रथमच झाली आहे. आता त्यांच्या लिहिण्यात अरुणोदयाची आभा कालवली जाईल. आता त्यांच्या कलेत चैतन्यशाली सौंदर्य येईल.

हे ओळखूनच कुटुंबनियोजन-मोहिमेत शासनाला सहकार्य द्यायला महाराष्ट्राचे झुंजार साहित्यिक बद्धपरिकर झाले आहेत.

शनिवार दिनांक १० जुलैच्या वर्तमानपत्रातल्या बातमीप्रमाणे, अनंत काणेकर, पं. महादेवशास्त्री जोशी, वामनराव चोरघडे, श्री. ज. जोशी, व. पु. काळे, विजया राजाध्यक्ष, मंगेश पाडगावकर, ज्योत्स्ना देवधर, सतीश आळेकर, बाबूराव बागूल, वसंत सबनीस, रा. रं. बोराडे प्रभृती थोर्थोर मराठी साहित्यिकांनी, कुटुंबनियोजनमोहिमेची जबाबदारी उचलायचे ठरवले आहे. ही बातमी वाचली आणि, तुम्हाला सांगतो, अष्टसात्त्विकभाव टक्क जागे झाले. म्हणजे नेमके काय वाटले ते, नेहमी नेमके तेच बोलणाऱ्या मलासुद्धा, सांगणे अंमळ अवघड आहे. पण धन्य धन्य वाटले. वाटले की मराठी साहित्यिकांचे हे सत्कृत्य उलटया त्रिकोणात लाल शाईने लिहून ठेवायला हवे.

माझ्या मते, वाढती लोकसंख्या ही आपल्या विकसनशील भारतापुढील सर्वांत बिकट समस्या होय. बाकीच्या सगळ्या समस्यांना तोंड द्यायला हा आणीबाणी-नंतरचा भारत देश समर्थ आहे, पण तो लोकसंख्यावाढीच्या समस्येला कसे काय तोंड देणार, हा मोठा प्रश्नच माझ्यापुढे पडला होता. मी आपल्यापरीने उपाययोजनांचा विचार करत होतो. पण हळद पिऊन लगेच गोरेपान करणारा उपाय गवसत नव्हता. साहित्यिकांच्या ठिकाणी वसत असलेल्या अद्भुत सामर्थ्याचे मला स्मरण झाले नाही. कारण एकवीस बोटांची आणि घाम न येणारी ही मंडळी स्वतःसाठीच लिहिता लिहिता आणि लिहून लिहून संपणार अशी माझी ठाम समजूत.

आता मला कुटुंबनियोजनाच्या मोहिमेच्या यशस्वितेबद्दल शंका वाटत नाही.

उपरिनिर्दिष्ट आणि उपरि न निर्दिष्ट मराठी साहित्यिक कुटुंबनियोजनाच्या प्रचाराचा आता नुसता दणका उडवून देतील. एकाच विषयावर वर्षानुवर्षे अथक लिहिण्याची त्यांची कर्तबगारी आता कामी येईल. आधी कथा लिहायची; मग तिची कादंबरी करायची; मग तिच्यातून नाटक काढायचे; मग त्यातून पटकथा ठाकठोकायची असली कल्पक उपक्रमशीलता अंगी मुरलेली असल्यामुळे, प्रचाराला, अनेकानेक माध्यमांतून जाऊन अज्ञात कोनाकोपऱ्यातल्या डोळ्यांना, कानांना, हृदयांना समजावता येईल. कोणी 'गीतनियोजनायन' लिहील; कोणी 'त्रिकोणायण' रचू शकेल; कोणी आपल्या कौटुंबिक जिव्हाळ्याच्या नाटकातून नियोजनाचे दोनचार प्रवेश 'दाखवू' शकेल; कथा, कादंबऱ्या आणि विनोदी लेखन तर लागेल तेवढे लिहिणे शक्य होईल, अशी माझी अपेक्षा आहे.

जाहीर झालेल्या नावांचाच विचार केला तरी त्यांच्या एतद्विषयक अजूनपर्यंत छुप्या असलेल्या तेज-ताकदीबद्दल सर्वांनाच मोठा विश्वास वाटायला हरकत नाही. कुटुंबनियोजनाची तत्त्वे आणि तपशील रंजकतेने सांगणारे नवे लघुनिबंध अनंत काणेकर लिहू लागतील. (आणि आपण कोणे एके काळी खरोखरच लघुनिबंध लिहिले आहेत हे नव्या (कुटुंबनियोजनपरायण) वाचकांना पटवून देतील; इतकेच नव्हे तर लघुनिबंधाचा खरा जनक कोण या वादाला एक नवी कलाटणी देतील.) वेगवेगळ्या स्वभावाचे कथालेखक पात्रांच्या मनाचे पापुद्रे हळुवारपणाने वा धसमुसळेपणाने उलगडतील वा ओरबाडतील आणि कुटुंबनियोजनेच्छूंना धीर देतील. 'किशोर' मासिकाचे चकचकीतकोरे संपादक वसंत सबनीस, किशोर-किशोरींच्या परस्परदिलात कुटुंबनियोजनाची आगाऊ जाणीव उत्पन्न करतील. या यादीत दोन बायका पण आहेत, हे आले का तुमच्या लक्षात? ताई, मावशी, वहिनी अशा जिव्हाळयाच्या भूमिकांतून लिहिलेल्या कथांनी त्यांना कौटुंबिक आणि नैयोजनिक काहीही साधता येईल. लघु प्रपंच, छोटा प्रपंच, नेटका प्रपंच, चिमुकला प्रपंच, मोजका प्रपंच अशा लागतील तेवढ्या मॅड मॅड श्रुतिका आकाश-

वाणीवरून सादर करून व. पु. काळे कोट्यवधी श्रोत्यांच्या कानात सुखी संसाराचे गुपित (किंवा लुपित) सांगतील हो सांगतील. सतीश आळेकरांच्या नाटकात आई-बापांना नेहमी एकुलता एक मुलगा असतो. (' मिकी आणि मेमसाहेब 'मध्ये तोही नाही.) तेव्हा हा नाटककार आधीपासूनच कुटुंबनियोजनाचा भला संदेश देऊन राहिला आहे. तथापि, या अनंतरावांचा असा अंदाज आहे की या मोहिमेत मंगेश पाडगावकर सर्वापेक्षा मोलाची कामगिरी बजावतील. हव्या त्या आशयाच्या कविता, बालगीते, संगीतिका, गाणी, वात्रटिका वाटेल तितक्या लिहू शकतात ते. शिवाय त्या प्रत्येकात वेगळी 'लिज्जत' आणणेही त्यांना सहज जमेल. मंगेश पाडगावकरांवर मी फार मोठी भिस्त ठेवून आहे.

दुसऱ्यांसाठी लिहिणे हेच खरे स्वतःसाठी लिहिणे असते, हा मला आधीच झालेला साक्षात्कार त्यांना आता होऊ लागला आहे. त्यामुळे लेखनाचा संकोच होण्याऐवजी त्यांचे हुकूमी तेजस्वी लेखन दशदिशांनी विस्तारत जाईल.

आता लागतील तेवढी बॉलपेन्स आणि रिफिल्स त्यांना मिळाली म्हणजे झाले !

—अनंतराव

# जमेका

## सी. आय. ए.च्या कारवाया

वा. दा. रानडे

जमेका व त्याची राजधानी किंग्स्टन आपणास परिचित आहे ते तेथे होणाऱ्या क्रिकेट कसोटी सामन्यांमुळे. वेस्ट इंडिजच्या दौऱ्यात, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, भारत या संघाचा एक सामना किंग्स्टनला होतोच. वेस्ट इंडिज समूहातील या छोट्याशा देशात काही आठवड्यांपूर्वी आणीबाणी जारी करण्यात आली, त्याची छोटीशी बातमी प्रसिद्ध करण्यापलीकडे आपल्याकडील वृत्तपत्रांनी या घटनेची फारशी दखल घेतली नाही. पण ही घटना केवळ त्या देशाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे असे नव्हे, तर त्यात आंतरराष्ट्रीय धागेदोरे गुंतलेले आहेत.

जमेका ही पूर्वीची ब्रिटिशांची वसाहत ब्रिटिशांनी या वसाहतीस जुलै १९५९ मध्ये स्वातंत्र्य दिले. काही वर्षे हा देश वेस्ट इंडिज फेडरेशनचा सभासद होता. पण सप्टेंबर १९६१ मधील जनमतकौलात फेडरेशनमधून बाहेर पडण्याचा निर्णय तेथील जनतेने घेतला व ऑगस्ट १९६२ मध्ये हा देश पूर्ण स्वतंत्र झाला. कॉमनवेल्थचा तो अजून सभासद आहे, पण पश्चिम गोलार्धात असल्याने अमेरिकन राष्ट्रांच्या संघटनेचाही तो सभासद आहे. चार वर्षांपूर्वी तेथे झालेल्या निवडणुकांत पीपल्स नॅशनल पार्टीने विजय मिळविला. त्या पक्षाचे नेते मायकेल मॅनले पंतप्रधान झाले. त्यांच्या वडिलांनी १९३८ साली ब्रिटिश मजूर पक्षाच्या धर्तीवर पीपल्स नॅशनल पार्टीची स्थापना केली. या पक्षाचा कल समाजवादाकडे असला तरी त्याचा समाजवाद सौम्य आहे, नेमस्त आहे. पण अमेरिकेला हा सौम्य समाजवादही नको असल्याने सी. आय. ए. या त्यांच्या गुप्तहेर संघटनेने तेथे हालचाली सुरू केल्या. या हालचालींमुळे सरकारची सुरक्षितता धोक्यात आल्याने तेथे आणीबाणी जारी करण्यात आली. जमेकात एकदा समाजवादाची लागण झाली की, वेस्ट इंडिज समूहातील इतर बेटांवरही अशा राजवटी येतील,असे अमेरिकेला वाटत असावे; म्हणून ते थोपविण्यासाठी सी. आय. ए. ने तेथे हालचाली केल्या. वास्तविक खुल्या निवडणुकांच्या मार्गाने तेथे अधिकारावर आलेल्या सरकारला तेथे राज्य करण्याचा पूर्ण लोकशाही अधिकार आहे. विरोधी कारवाया करून हे सरकार खाली ओढण्याचा प्रयत्न करणे लोकशाहीविरोधी आहे.

आणीबाणीबाबत बोलताना जमेकाचे राष्ट्रीय सुरक्षा मंत्री केबल मुन म्हणाले, 'जमेकात अस्थिरता निर्माण होण्याशी आमचा काही संबंध नाही, अशी आश्वासने अमेरिकन सरकारने आम्हाला दिली आहेत... पण चिलीत काय घडले सर्वांना माहीत आहे. असे असले तरी तेथील घटनांमागे कोण आहे, हे वॉटरगेट प्रकरणातून साऱ्या गोष्टी बाहेर येईपर्यंत कोणी सिद्ध करू शकत नव्हते.' चिलीचे अध्यक्ष आयेंदे यांना तीन वर्षांपूर्वी पदच्युत करण्यात आले. त्यानंतर आमच्या देशात सी. आय. ए. च्या कारवाया चालू आहेत, असे आरोप जमेका सरकार सतत करीत आहे. सी. आय. ए. मधून फुटलेल्या लोकांनी सांगितलेली माहिती आणि वॉशिंग्टनमधील सिनेटच्या समितीस उपलब्ध झालेल्या अंतर्गत कागदपत्रांतून मिळालेली माहिती यावरून सी. आय. ए.च्या कारवाया उघड झाल्या आहेत. पण अंतर्गत पुरावा फुटला नसेल तर परकीय हस्तक्षेप सिद्ध करणे किती कठीण आहे, हे जमेकातील घटनांनी पुनः एकदा दाखवून दिले आहे. एखाद्या देशात अस्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न होत आहेत, हे दिसत असले तरी केवळ स्थानिक राजकीय पक्ष त्यामागे नसून परदेशाचा हस्तक्षेप आहे, हे सिद्ध करणे कठीण असते.

आणीबाणी का पुकारावी लागली, हे सांगताना मुन म्हणाले, 'काही स्थानिक बंदूकधाऱ्यांना अटक करण्यात आली तेव्हा आपणास पैसा देणाऱ्या श्रीमंत व्यापाऱ्याची व राजकीय नेत्यांची नावे त्यांनी सांगितली. कोर्टात आरोप सिद्ध करण्याइतका पुरावा अजून मिळालेला नाही, पण या वर्षी शंभरापेक्षा अधिक लोकांना ठार करण्यात आले असल्याने संशयित आरोपींना चौकशीविना स्थानबद्ध केले पाहिजे, असे सरकारला वाटू लागले आणि त्यासाठी आणीबाणी पुकारण्यात आली.'

परदेशी हस्तक्षेपाबद्दल मुन म्हणाले, 'देशावर सरकारचे नियंत्रण राहिलेले नाही, असा प्रचार अमेरिकनांचा एक गट रेडिओवर करीत होता. टोरोंटोमध्ये निधी जमविण्यासाठी सभा झाल्या. विरोधी जमेका लेबर पार्टीला पाठिंबा देण्यासाठी या सभा होत्या. जमलेल्या पैशाचा उपयोग शस्त्रखरेदीसाठी केला जाईल, असे सभेतील लोक बोलत होते. पोलिसांनी गेल्या दोन महिन्यांत घातलेल्या छाप्यात अमेरिकन बनावटीचे सहा रिव्हॉल्व्हर सापडले. जमेकासारख्या गरीब देशात लोकांजवळ आतापर्यंत गावठी बंदुकांशिवाय दुसरी शस्त्रे नव्हती. हिंसेसाठी त्यांचाच वापर केला जाई, पण आता आधुनिक शस्त्रे सापडत आहेत. अशी थोडी शस्त्रे वापरली तरी या छोट्या देशात त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो.'

जमेका सरकारने गेल्या दीड वर्षात स्वीकारलेली काही धोरणे डावीकडे झुकणारी आहेत. परदेशी बॉक्साइट कंपन्यांवर सरकारने जबर कर बसविला आणि ग्रामीण विकासासाठी पडीक जमीन ताब्यात घेतली. या धोरणामुळे व्यापारी वर्गाच्या हितसंबंधांना बाधा आल्याने त्याने सरकारविरुद्ध मोहीम उघडली, परदेशी वृत्तपत्रांशी संधान

पृष्ठ २९ वर

# राष्ट्राला साहसाच्या भावनेचा पुनर्लाभ
# 1975-76

## गावांमधील नवजीवन

- 65 लाखांहून जास्त घरांसाठीच्या जागा देण्यात आल्या, त्यांपैकी 3,68,000 जागा पूर्णतः विकसित आहेत. 2,46,000 घरांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.
- सुमारे 47,000 वेठबिगार मुक्त झाले आहेत.
- जमीन धारणा कायद्यामुळे 16,67,000 एकर अतिरिक्त जमीन ताब्यात आली आहे. त्यांपैकी 4,24,000 एकर जमिनीचे वाटप झाले आहे. याचा लाभ सुमारे 1,80,000 लोकांना झाला आहे.
- 19 ग्रामीण बँका स्थापन करण्यात आल्या आहेत, 1976-77 मध्ये आणखी 50 बँका उघडण्यात येतील. सहकारी कर्ज पुरवठा संस्था अधिक भक्कम करण्यात आल्या आहेत.

DAVP 76/88

तिसऱ्या शतकात होऊन गेलेल्या एका जगन्मान्य भारतीय कामसूत्रकाराच्या जीवनावर आधारलेली एक ललितरम्य कादंबरी (भाग ४)

# वात्स्यायन

दि. बा. मोकाशी

## । निष्ठुर नायिका ।

अंगरिक्षाला आत नेऊन, त्यांच्या आईने त्याचे पान वाढून तो पानावर बसून जेवू लागल्यावरच वात्स्यायन पुढील दालनात आला. अंगरिक्षाला आपण जे सांगितले त्याचे त्यालाच स्वतःला आश्चर्य वाटत होते. आपणही एकवेळ असेच मलूल पडलो होतो. त्याला आठवले–पण आपले वेगळे होते. आपली भीती होती. स्त्रीच्या विपरित वर्तनाची भीती होती. तो कोंडमारा होता. एकीकडे तारुण्य-सुलभ कामवासना आणि दुसरीकडे ती शांत करण्याचा जो उपाय त्याविषयी अज्ञान, संताप आणि भय. मनोविकृतीच होती ती. कोणत्याही दलदलीतून जसे दुसऱ्याने ओढून काढावे लागते, तसे मनोविकृतीतूनही स्वतःला स्वतःची सुटका करून घेता येत नाही. महेश्वरदत्तामुळे आपण त्यांतून सुटलो. आपण अंगरिक्षाचा महेश्वर-दत्त होऊ.

अंगरिक्षाला आपण जे सांगितले ते काही बाभ्रव्यातले होते–काही आपले. अंगरिक्षाची निवड त्याच्या आईला मान्य आहे का पाहायला हवे. तसेच वासंतिकेच्या घरी विरोध आहे का बघायला हवे. मग वासंतिकेचे मन पाहू. एकेक पवित्रा नीट टाकला पाहिजे.

समोरून येणाऱ्या पत्नीला पाहून पुढे होत तो म्हणाला, 'धारिणी–समजावला त्याला बसविला पानावर.'

'पाहिला मी. बरे झाले बाई! आईला घोर पडला होता. काय चमत्कार केलात?'

'चमत्कार कसला!'

'तुम्ही काय कराल, सांगता यायचे नाही.'

'वासंतिका आवडेल का तुम्हाला?'

'तिच्याकडले हो म्हणाले तर आमचे काही म्हणणे नाही.'

'तिच्याकडून नकार येण्याचा संभव आहे तर!'

'आहेही आणि नाहीही. पण आहेच. त्यांचे घराणे सेनापतीचे. वासंतिका पाहिलीत ना? सगळा लढाऊ बाणा आहे तिचा. आमचा अंगरिक्ष काही झाले तरी व्यापाऱ्याचा पोर.'

'हा विवाह सुखाचा होणार नाही असे वाटतंय का?'

'ते कसे सांगणार?' पत्नी म्हणाली.

वात्स्यायन म्हणाला, 'मी दोघांना उद्यानयात्रेला घेऊन जाण्याचे ठरवतोय. वासंतिकेचे आईवडील धाडतील का तिला?'

'तुम्ही विचारलंत तर धाडतील. पण मधेच हे उद्यानयात्रेचे काय डोक्यात आले?'

'सहज.'

'सहज नाही. काहीतरी आहे तुमच्या मनात.'

'बोलता बोलता वाटलं.'

'नाही. काहीतरी ठरवलंय तुम्ही.'

'काही ठरवलं नाही. काहीतरी करीत राहिलं की त्यातून मार्ग निघतो असं म्हणतात.'

पत्नीशी बोलून वात्स्यायन परत गच्चीत येऊन उभा राहिला. उद्यानयात्रेचे आपल्या मनात यावे याची त्याची त्यालाच गंमत वाटत होती. अंगरिक्षाशी बोलताना आपण सहज ते बोललो होतो. आता धारिणीशी बोलतानाही तेच सहज मनात आले. अशी कल्पना येते आणि धारिणीला वाटते ठरवूनच कल्पना मांडली आहे. दोघांना उद्यानयात्रेत वावरताना पाहिले की, त्यांच्या परस्पराविषयीच्या भावना कळतील. असं पाहून पुष्कळ कळतं. असं पाहण्याचा, विवाह-पूर्वकाळात खूप अभ्यास झालाय, नकळत. दाराच्या फटीतून किती किती प्रणयी युगुले आपण पाहिली! फलकावर स्त्रीशरीर विकृत करून काढले, विकृत संभोगचित्रे काढली. पण दुसऱ्या गोष्टींचेही निरीक्षण झाले. त्या लहान लहान गोष्टींनी प्रणयी युगुलांबद्दल आपण खूप शिकलो. ते आता उपयोगी पडेल. समोरून नायक आला की नायिका थबकावयाची. तिचे डोळे खाली व्हावयाचे आणि मध्येच चोरून नायकाकडे पाहावयाचे. तिच्या बोटांना कंप सुटावयाचा आणि कपाळावर घर्मबिंदु दिसावयाचे. नायक जवळजवळ येत चालला की तिची अगदी विकल अवस्था व्हावयाची. वक्षस्थळावर तळहात ठेऊन, एक पाय मोडून ती लज्जेनं एवढीशी व्हावयाची. नायकाबद्दलची तिची अनुकूलता ओरडून सांगावी तसे हे तिचे आविर्भाव सांगावयाचे. आपल्या मनातल्या वासना तिच्या स्तनादींच्या चित्राकृतीत कशा घालाव्या हा विचार करीत असता हेही आपण पाहिले. नायकाने जवळ यावे असे तिला वाटावयाचे आणि तो जवळ आला की बावरून ती पुढे गेलेल्या मैत्रिणींना हाका मारावयाची–'सख्यानो! थांबा, थांबा! मला एकटीला टाकून जाऊ नका.'

आणि अप्रिय नायक समोरून येत असलेला दिसताच नायिका मैत्रिणींच्या घोळक्यात लपावयाची. मग खट्टू झालेला नायक, त्या मैत्रिणींच्या अरण्यात लपलेली आपली मैना पाहण्याचा यत्न करीत,

निष्फल होऊन तोंड उतरवीत पुढे जावयाचा. तो स्वतःला म्हणाला, अनुकूल आणि प्रतिकूल दोन्ही नायिकांचा तेव्हा तुझा अभ्यास झाला आहे. एवढेच नाही तर, प्रतिकूल नायिका अनुकूल करून आपण भोग कसे घेऊ याची दिवास्वप्ने तू रंगवली आहेस. त्या स्वप्नांत नायिकेकडे आपले पराक्रम, गुण सांगण्यास, दूती पाठवण्याची तुझी कल्पना. नायिका शेजारी मैत्रिणीत असता, आपण मित्रामध्ये तिच्या कानावर जातील असे विनोद करावयाचे आणि तिला खुदकन् हसवायचे ही कल्पना, मागून नायिका येत आहे, आपण तिच्यासाठी फूल टाकावयाचे ही कल्पना. या सगळ्या आता तुला उपयोगी पडतील. तुझे ते एक लाडके दिवास्वप्न आठव,–दूती नायिकेकडे जाऊन म्हणते, 'अग ! तो मल्लनाग वात्स्यायन, असा पुरुष सबंध नगरात मिळणार नाही. स्त्रियांची मने जाणणारा त्याच्यासारखा कुणी नाही. रसिक तर इतका ! चौसष्ट कलांचा ज्ञाता आणि बाभ्रव्याची कामसूत्रे पाठ असलेला.–सांगायची गोष्ट की, तुला त्याने देवळाच्या रस्त्यावर पाहिले आणि तुझ्यासाठी वेडा झालाय तेव्हापासून. त्याने अन्न वर्ज्य केलंय, सारखे उसासे टाकतोय. मदनाने व्याकूल होऊन तो जळत आहे. एकदा प्राण जाण्यापूर्वी तुझे केवळ दर्शन घडावे अशी त्याची इच्छा आहे. एखाद्याने आपल्यासाठी प्राण द्यावा असे तुझ्या उदार, दयाळू मनाला वाटणार नाही हे मला ठाऊक आहे. काय सांगावे ! तू त्याला दर्शन दिलेस तर त्याचे प्राणही वाचतील.'

आणि मग पावसात भिजत दूतीबरोबर आलेल्या नायिकेला आपण कोरडी वस्त्रे दिली. पेय दिले आणि मांडीवर बसवले.

बस् ! पुरे ! वात्स्यायन स्वतःवर ओरडला, नायिकेला मांडीवर बसवल्यानंतर केलेल्या विचित्र संभोगाच्या कल्पना या वेळी नकोत. निष्ठूर नायिकाही अनुकूल करून घेता येते, वासंतिकाही तशी अंगरिक्षावर अनुकूल करून घेता येईल हेच म्हणायचंय ना तुला ? तुझा मुद्दा कळला.

वात्स्यायनाची दृष्टी वासंतिकेच्या वाड्याकडे होती. गच्चीत कुणी नव्हतं. आता वासंतिका गच्चीत आली तर बरे होईल. सहज हाक मारून बोलणं सुरू होईल. आपण बुद्धयाच अंगरिक्षाबद्दल बोलायला लागलो असं होणार नाही. उद्यान मात्र सुंदर केलंय तिच्या मातापित्यांनी. अंगरिक्षाचे हाल करावयास ती गच्चीत यायला हवी पुन्हा. प्रिय असलेल्या नायकालाही छळण्यात जिथे नायिकेला आनंद होतो, तिथे अप्रिय नायकाचे काय ? आपण वाट पाहू. बराच वेळ अंगरिक्षाला चिडवायला तिला मिळालेले नाही. काय सांगावे, खालून उद्यानातील एखाद्या लतामंडपातून ती चोरून पाहतही असेल. वात्स्यायनाने उद्यानभर दृष्टी फेकली.

वाड्याच्या पुढच्या भागातच फुललेले उद्यान तेवढे तेथून दिसत होते. वसंतातल्या नानारंगी पालवींनी आणि पुष्पांनी तो भाग फुलला होता. फुलांच्या रंगातल्या तऱ्हा कुणा मर्त्याला सांगता येतील का ? एक निळा रंग ! त्यात किती प्रकार ? ती तिकडली सोनेरी फुले आपण कुठेच पाहिलेली नाहीत. परदेशची जात दिसते. बहर आलेल्या त्या उद्यानाकडे वात्स्यायन गुंग होऊन पाहत राहिला. एकमेकांचा पाठलाग करीत फुलपाखरे फुलांफुलांवरून धावत होती. लहानमोठे झपझपणारे, ते पिवळे, काळे, नारिंगी ठिपके! त्यांच्यामधून पारदर्शक पंखांचे पडदे उभे करीत, वेगाने चतुर उडत होते. मधूनच 'गुं गुं' गुंगणारा पिंगट भुंगा दुष्ट माणसाप्रमाणे सर्वांना घाबरवीत जात होता. एका उंच झाडावर मधमाशांचे पोळे गच्च धरून बसले होते. पोवळ्याभोवती मधमाशांचा थवा अधांतरी टांगल्यासारखा तरंगत होता. वाऱ्याची झुळूक येताच कोवळी पाने, आपले वय दाखवीत खिदळत होती. वृक्षांवर चढलेल्या लता आपल्या जून पानांमुळे कोवळ्या पर्णांनी बहरलेल्या झाडांवर प्रौढ वाटत होत्या. उंच वृक्षावर चढलेली लता उत्तरीयासारखी हलत होती. झुळूक येताच ताटव्यांताटव्यांतील फुले डोलू लागून, सगळे उद्यान थरारत होते.

अशा या मनोहर उद्यानाने वेढलेल्या गृहात, एक निष्ठुर तरुणी, प्रियकराला छळण्यात आनंद घेत असावी ! वसंत हा युवतींची मने कठोर करितो. वात्स्यायन स्वतःशी हसला. महेश्वरदत्त हे म्हणाला असता. त्याचे मन कवीचे आहे.

समोरच्या गच्चीत हालचाल झाली. वात्स्यायनाने समोर पाहिले. बाहेर आलेली वासंतिका झटकन त्याच्याकडे नजर टाकून आत वळू लागली. त्याने हाक मारली,

'वासंतिके !'

वासंतिका थबकली. तिने मान वळवली. वात्स्यायनाने विचारले,

'ओळखले नाहीस ?'

स्वर आखडून ती म्हणाली,

'ओळखले ना !'

'ओळखलेससे दिसले नाही.' वात्स्यायन म्हणाला. 'केवढी मोठी दिसू लागलीस तू ! आमच्याकडे आली होतीस तेव्हा इवलीशी होतीस. इकडे ये. जरा नीट पाहू दे तुला.'

'आले हं !' वासंतिका म्हणाली आणि गच्चीतून आत गेली. वात्स्यायन आपल्या गच्चीत उभा होता. खाली उतरून ती उद्यानातून येऊ लागेल, असे त्याच्या मनात आले. पण वासंतिका पुन्हा तिच्या गच्चीत आली आणि म्हणाली,

'आईने तुम्हालाच बोलावलाय.'

'येतो' वात्स्यायन म्हणाला, 'पण तू इथे येऊन निमंत्रण दे, म्हणजे येतो.'

मग उद्यानातून ती येत असता वरून तो पाहत राहिला. हे पाहणे आता निराळे. त्याच्या मनात आले, कदाचित ती आपल्या मेहुण्याची पत्नी होईल. 'घरी' येणारी 'मुलगी' म्हणून आता पाहायला हवी. अजून अल्लड आहे. तिची चाल पाहत तो म्हणाला, मध्येच फुलपाखरू पकडायला धावली, चांगले फूल दिसताच मध्येच थांबते आहे, मनात येईल ते महत्त्वाचे वाटतंय तिला. केसांत फूल खोवून इकडे येऊ लागलीय. पुन्हा धावत आहे. मुलीत हवा तो उत्साह आहे तिच्यात–थोडा जास्तच.

वासंतिका घरात शिरताच तो गच्चीतून झटकन आत झाला. पत्नी बसली होती त्या खोलीत येऊन म्हणाला,

'वासंतिका वर येते आहे. तिच्याबरोबर तिच्या घरी जाऊन येतो मी.'

वासंतिका वर येताच गंभीर झाली आहे हे वात्स्यायनाच्या लक्षात आले. तिची नजर, अंगरिक्ष कुठे गाठतो का ते पाहत इकडे तिकडे फिरते आहे. जिन्यातूनच सावधगिरीने हाक मारायला तिने आरंभ केला होता.

वासंतिकेची चाहूल लागताच पत्नी आतून म्हणाली,

'वासंतिके ! ये वासंतिके.'

खोलीच्या दाराशी येत वासंतिका म्हणाली,

'काय धारणीताई ?'

'अग ऽ ! किती दिवसात तू वळली नाहीस इकडे ! दुसऱ्याचा राग आमच्यावर का काढतेस !'

वात्स्यायन पुन्हा गच्चीत येऊन बाहेर पाहत उभा राहिला होता. दोघींचे बोलणे त्याला ऐकू येत होते. वासंतिका म्हणत होती,

'राग येण्यासारखे कुणी का करावे ?'

त्याच्या पत्नीचा आवाज आला,

'ज्या कुणी केले त्याच्यावर रागव. आमच्यावर नको बाई रागावू.'

जरा थांबून वासंतिकेचे शब्द आले,

'ताई, त्यांना घेऊन जाते मी.'

वात्स्यायनाचे तोंड रस्त्याकडे होते. वासंतिका गच्चीकड आलेली त्याला कळली. येताना ती हळू पावलांनी आल्यासारखी त्याला वाटली. त्याने तिच्याकडची पाठ मग मुद्दाम तशीच ठेवली. तिने मागे येऊन खाली वाकल्याचे, एक कमलपत्र उचलल्याचे, ते अर्धे फाडल्याचे त्याच्या ध्यानात आले. त्याने झटकन तोंड वळवले. ओणवी वासंतिका कमलपत्र टाकून दचकून उभी राहिली. तिची लगबग पाहत, गालात हसत वात्स्यायन म्हणाला,

'चल निघायचे ना ?'

तिने हो म्हणून पाठ वळवताच त्याने वाकून फाडलेले कमलपत्र उचलले. कसली खूण हिने केली आता ? अंगरिक्षाच्या खुणा ती पाहत होती तर !

गच्चीतून परतत असता हातातले कमलपत्र मागे लपवून पत्नीच्या खोलीवरून जाताना त्याने झटकन आत फेकले आणि तो वासंतिके मागे गेला. ¤

## अशीही एक स्त्री

वासंतिकेकडे गेल्यावर आणि पहिले कुशल प्रश्न झाल्यावर वात्स्यायन म्हणाला,

'वासंतिकेची आई ! तुमची वासंतिका छान दिसायला लागलीय. ओळखलेच नाही मी तिला !'

'बरेच वर्षांनी पाहता तुम्ही तिला.'

'हो ! पण आता जिथली वस्तू तिथे गेली पाहिजे.'

'गेलीच पाहिजे.' वासंतिकेची आई म्हणाली. 'कण्वालासुद्धा काळजी पडली तिथे आमचे काय ? तिच्या वडिलांना रोज सांगते. पण राजाची सेवा संपूनही राजाची कामे संपत नाहीत आणि घरची कामे होत नाहीत.'

वात्स्यायन म्हणाला,

'आमच्या अंगरिक्षाकडेही बघायला हवाय आता. मी इथे आलोच आहे, तेव्हा एखादा वरणविधी झाला तर बरे होईल. पण मला मात्र वाटते मुलांनी आपली लग्ने स्वतःच जुळवावी. मुलानेच आवडलेल्या मुलीजवळ स्वतःच मागणी घालावी. तिला येऊन विचारणारा पतीच मुलीलाही चांगला.'

'मुळीच चालायचे नाही आम्हाला असले' वासंतिकेची आई फणकाऱ्याने म्हणाली.

'मुलींना काय कळते ! आणि मुलाला काय होतंय तिच्याजवळ मागणी घालायला ! घराणे बरोबरीचे हवे. आम्ही लढवय्यी माणसे, मुलीचे क्षत्रियाचे तेज सहन होईल असाच मुलगा हवा आम्हाला. 'एखादा राजपुत्र किंवा शूर पुरुष किंवा अमात्यपुत्र असल्यास सुचवा.'

वात्स्यायन म्हणाला,

'वासंतिकेची आई ! राजपुत्र, शूर पुरुष, किंवा अमात्यपुत्र हे अनेक स्त्रिया करतात आणि मुलीला ते दुःखदायक होते. धनहीन पण स्वतंत्रवृत्तीचा, गुणहीन पण कुटुंब पोषण करणारा असा वर पत्करला, परंतु धनवान पण परतंत्रवृत्तीचा, किंवा गुणवान परंतु अनेक स्त्रियांवर प्रेम करणारा वर कन्येला बघू नये.'

वासंतिकेची आई पुन्हा फणकाऱ्याने म्हणाली,

'जे शूर असतात ते समर्थ असतात. त्यांनी अनेक स्त्रिया केल्या तरी अशा वराशीच कन्येचा विवाह करावा आणि त्याचे महाराणी-पद मिळवावे. मी माझ्या मुलीला तसेच शिकवीन. पुरुषही आपल्या मुठीत आणि त्याच्या इतर स्त्रिया आपल्या हातांत, अशी भाग्यवान पत्नी माझ्या मुलीने व्हावे.'

अंगरिक्ष वासंतिकेच्या विवाहाला इथेच विरोध होणार हे वात्स्यायनाच्या लक्षात आले. वाद थांबवण्याचे ठरवून तो म्हणाला,

'जाऊ द्या ! आपल्या मुलामुलींचे विवाह आताच ठरत आहेत असा वाद आपण घालीत आहोत. लग्नाची वेळ येईपर्यंत किती वरणविधी होतील कोण सांगणार ? आत्ता मी आलोय तो तुमच्या कन्येला परवाच्या उद्यानयात्रेला आमच्याबरोबर नेण्यासाठी, तुमची अनुज्ञा घ्यायला. पाठवता का तिला ?'

'घेऊन जा. येईल ती.'

पलीकडेच पाठ करून सगळे ऐकत असलेल्या वासंतिकेला वात्स्यायन म्हणाला,

'वासंतिके ! तुमची बाग दाखव ना मला !'

'जा दाखव,' वासंतिकेची आई म्हणाली. ¤

## वेणुनाद

उद्यान दाखवीत वासंतिका पुढे चालत होती.

वासंतिकेच्या आईच्या बोलण्याच्या धक्क्यातून वात्स्यायन अजून सावरला नव्हता. स्त्रियांना सर्वसाधारणपणे सवती आवडू नयेत, पण आधिपत्य करण्याच्या सुखासाठी सवती पत्करणे ! अशाही भावनांच्या स्त्रिया असतात आणि आधिपत्य मिळाले नाही तर ? झगडचात त्यांना सुख मिळेल. अशा स्त्रियांची कामप्रवृत्ती कशी असेल ! रंजक असेल. काम हा त्यांना दुय्यम वाटत असेल.

या विचारांबरोबरच मनाला येत चाललेला मोकळेपणा त्याला

कळत होता. अवंतीकडे निघावयाचे ठरवताच मन मोकळे होण्यास आरंभ झाला. महेश्वरदत्ताचे भेटीत ते आणखी मोकळे झाले आणि पत्नीशी बोलणे झाल्यावर पुरते मोकळे झाले. असे झाले की, गुहेतून बाहेर यावे तसे वाटते. पुन्हा पुन्हा परत जाऊन झाडावर टांगून बसणाऱ्या वेताळासारखे आपले मन आहे. एकदा त्या मनाच्या वेताळाला झाडावरून काढून खांद्यावर घेऊन चालू लागलो की, सर्व कळू लागते. मनाचा वेताळ कुठलीही कूट गोष्ट विचारो त्याची उत्तरे आपल्याला सापडतात. पण मधूनच हा वेताळ परत जाऊन स्वतःला झाडावर टांगून घेतो आणि मागे परतून त्याला पुन्हा खांद्यावर घेऊन पुन्हा चालू लागतो.

जिना उतरून घराच्या मागच्या ओटीवर वात्स्यायन उभा राहिला. समोरच्या उद्यानाच्या दृश्याने त्याचे मन एकदम वेधले. वेताळाला पुन्हा खांद्यावर घेतले आहे आपण आणि आता उद्यानाचे सौंदर्य कळते आहे. आम्रवृक्ष एका ओळीत लावलेले आहेत. त्यांच्यावर फुललेल्या मोहोरामुळे, विवाहप्रसंगी उत्तमोत्तम वस्त्रे नेसण्याची रमणींत चढाओढ लागावी तसे वाटत आहे. अधूनमधून लोंबणाऱ्या बारीक कैऱ्या माळेतल्या मण्यांसारख्या शोभत आहेत. टोकाला लावलेले ऊस, त्यांच्या माथ्यांवरील पांढऱ्या तुऱ्यांमुळे कुटुंबांतील कौतुक करीत उभ्या असलेल्या वयोवृद्ध माणसांप्रमाणे दिसत आहेत. ती पलीकडे भाजी, त्यापलीकडे जिरे, मोहरी, ओवा, बडीशेप यांची लागवड दिसते. त्यांचे विविधरंगी वाफे किती शोभा वाढवताहेत !

आणि समोर सर्वांमध्ये विस्तीर्ण पुष्करणी होती. तिच्या पायऱ्या उतरून आत जात असता वात्स्यायनाचे मन अगदी शांत झाले. पायऱ्यांच्या कडेला मधूनच बसायला ओटे होते. पाणी नितळ होते. मधूनच एखादा मासा वर उसळून उडताच पाण्याच्या पृष्ठभागावर चिमटा उठून, वर्तुळाकार लहरी धावत होत्या. दोन कासवे मंद सरकत होती. अगदी खालच्या पायरीवर पोहोचल्यावर वात्स्यायनाने वर पाहिले. आकाशाच्या निळ्या घुमटाशिवाय दुसरे काही दिसत नव्हते. विश्व एकदम गप्प झाले होते.

अशा ठिकाणी बसून एखादा ग्रंथ लिहावा. एकदम वात्स्यायनाच्या मनात उर्मी आली. कामसूत्रेसुद्धा. इथे बसून बाहेरचे ध्वनी बंद झाल्यावर विचार छान करता येईल. विट होण्यात आनंद आहे हे महेश्वरदत्तावरून कळले. वासंतिका प्रियकराला छळते तो अनुभव आपणास नाही. आणि तिच्या आईची सवतीची आवड विलक्षणच. आपण अशी पुष्करणी बांधू. मग पुष्करणी बांधण्याच्या कल्पनेने त्याचा ऊर भरून आला. नागरिकाची बाग अशी हवी. आपण ग्रंथ लिहीत असे खाली बसलेले असू. पुष्करणीच्या तोंडाशी वर आपली पत्नी येईल. वरच्या उजेडात तिचे मुख आणखी उल्हसित दिसेल. निळ्या आकाशावरची तिची ती रेखीव आकृती पाहत राहू. तिचे वय झालेले असेल, पण ती म्हातारी वाटणार नाही. कारण आपणही म्हातारे झालेले असू. अगदी वाटलेच तर, तिचे तारुण्यांतले रूप पुढे आणू. फक्त रूपच. त्या काळातल्या शंका मनात आणणार नाही.

त्यावेळी आपली कन्या विवाहाला झालेली असेल. कदाचित आपल्याऐवजी ती इथे बसलेली असेल. आणि तिचा प्रियकर उत्तरीय सांभाळीत एक पायरी टाळून, पायऱ्या उतरीत तिच्याकडे उतरीत तिच्याकडे उतरू लागला की त्याची ऐट पाहून तिचे त्याच्यावर आणखी मन बसेल.

वात्स्यायन पायऱ्या चढून पुष्करणीच्या बाहेर आला. वासंतिका फुलांच्या मागे धावली होती. त्याने पुष्करणीच्या काठावरून काही अंतरावरच्या वृक्षराजीकडे पाहिले. वृक्षराजीतला तलाव आपल्या ठिकाणी वृक्षांची रूपे घेऊन लपला होता. सुंदर ! वात्स्यायन स्वतःशी म्हणाला, छान तलाव केलाय. तलाव ध्यानात येताच त्याला तलावावरची नील, श्वेत, लाल कमले दिसू लागली. कोण कशाची शोभा वाढवतंय हे न कळून तो क्षणभरच स्तिमित असा उभा राहिला.

जरा वेळाने सबंध बागेला वळसा घेऊन तो पुढच्या बागेत आला. वासंतिका समोर अल्लडपणे चालत होती. दुरून गच्चीतून पाहिलेली फुले आता अगदी हाताशी होती. डोक्याजवळून एक भुंगा गुणगुणत गेला. लांबून रंगाचे शिडकावे वाटलेली फुले आता वेगवेगळी कळत होती. मल्लीकेचा सुगंध नाकाला सुखावत होता. जपांचा किरमिजी रंग शालीसारखा वाटत होता. कुरंटकांचे पिवळे सौंदर्य डोळ्यांना दिपवीत सुखावत होते. मधूनच वेलींचे पडदे केलेले लताकुंज होते. त्यांतील लहानशा कमानींतून आतील विश्रांतीच्या बैठकी कळत होत्या.

'कुणी केला हा बाग ?'

वात्स्यायनाने वासंतिकेला विचारले.

'आईने. दुसऱ्या कुणी ?'

त्याच्या मनात आले, महेश्वरदत्तही हिच्या आईसारखाच आत कुठेतरी सुंदर आहे. विट व्यवसायाबद्दलचा आपला कुग्रह त्याने नक्की बोथट केला. विट कसे असतात तर आपल्या पित्यासारखे– गुंड, लोभी, धूर्त, व्यसनी. आपण आता हे पूर्वीचे मत सांगणार नाही. तसेच महत्त्वाकांक्षी स्त्री कठोर असते असे हिच्या बोलण्यावरून आपले मत झाले होते. पण कधी कधी तिला हिच्यासारखी सौंदर्यदृष्टीही असते. हिच्या कामप्रवृत्तीबद्दल आपल्याला कुतूहल वाटले. हिची कामप्रवृत्ती उद्यानाच्या सौंदर्याकडे वळली असे फार तर म्हणावे.

निरोप द्यायला बागेच्या दारापर्यंत वासंतिका आली होती. निरोप घेताना वात्स्यायन म्हणाला होता,

'उद्यानयात्रेचे लक्षात ठेव, वासंतिके !'

मग तेथून परतल्यावर सासुरवाडीच्या घरात शिरताना वेणूच्या सप्तसुरांनी त्याचे स्वागत केले. चकित होऊन, वात्स्यायन वर खाली पाहू लागला. अवंतीत घरोघरी वीणा आणि वेणुनाद कानांवर येतात. पण इतक्या बहारीचा क्वचितच.

घरात येऊन गच्चीच्या दारातून त्याने हळूच गच्चीत डोकावून पाहिले. गच्चीच्या कोपऱ्यात बाहेरून न दिसेल असा बसून अंगरिक्ष वेणू वाजवीत होता. वेणूचे सूर साऱ्या घरभर तरंगत होते. कुठची गत वाजवतोय हा ? नवीनच दिसते. अवंतीत रोज काहीतरी नवे होत असते.

इतक्यात समोरच्या गच्चीत अगदी हळू पावलांनी आलेली वासंतिका पाहताच वात्स्यायन झटकन भिंतीआड झाला. वासंतिका गच्चीत आली आणि कान इतकडे तिकडे करून वेणुनादाची दिशा चाचपू लागली. वेणू वाजवणारा दिसत नव्हता ती गोंधळात पडली होती.

वेणुनाद एकाएकी थांबला आणि इतका वेळ उल्हसित झालेले तिचे तोंड, वीणेची तार तुटावी तसे कष्टी झाले. अंगरिक्ष बसल्या

जागेवरून उठला. तो उभा राहताच त्याच्या हातातील वेणू पाहून, वेणू वाजवणारा तो हाच हे ध्यानात येताच, वासंतिकेने एकदम पाठ फिरवली. पण तेवढ्यात आत जाताना तिने मान वळवून अंगरिक्षाकडे पाहिले का? काही असले तरी तरुणींना मोह घालणाऱ्या गोष्टीत वेणुनाद आहे हे नक्की.

पत्नीच्या खोलीत येताच पत्नीने त्याला विचारले,

'काय म्हणते वासंतिकेची आई?'

'त्यांचा विरोध होणार लग्नाला. वेणू ऐकलास का अंगरिक्षाचा?'

पत्नी हसत म्हणाली,

'हो! गेले कित्येक दिवसांत त्याने वेणू हातात धरला नव्हता.'

इतक्यात अंगरिक्ष आत आला. तो म्हणाला,

'यज्ञोत्सवाला येता का उद्या?'

'जाऊ या!' पुढे होऊन अंगरिक्षाच्या खांद्यावर हात ठेवून त्याने म्हटले,

'वेणू फार सुंदर वाजवतोस रे!'

पत्नी म्हणाली,

'समवायात त्याने अनेक पारितोषिके मिळवली आहेत.'

हात वर करून वात्स्यायन स्वतःला नकळत म्हणाला,

'जा! तुझा वेणू तुझा हेतू पूर्ण करील.' मग जरा चेष्टेत त्याने म्हटले,

'वासंतिका येणाराय का यज्ञोत्सवाला?'

मान उडवून अंगरिक्ष तुच्छता दाखवीत म्हणाला,

'यज्ञोत्सवाला अवंतीतल्या सगळ्या मुली येतात.'

'आणि उद्यानयात्रेला?'

'वडीलधाऱ्या माणसाने विचारले की येतात.' अंगरिक्ष हसत म्हणाला आणि वेणू तोंडात घालून सूर काढीत निघून गेला.

थोड्या वेळापूर्वी अंगरिक्षाला आपण दिलेला आशीर्वाद वात्स्यायनाला आठवला. 'जा! तुझा वेणू तुझे मनोरथ पूर्ण करील.' त्याला स्वतःची गंमत वाटली. आताच महेश्वरदत्ताच्या संगतीतून आपण आलो आणि त्याच्याच पद्धतीने आशीर्वाद दिला. आपले नेहमी असे होते. वाचलेले, ऐकलेले तसेच डोक्यात राहते आणि काही काळाने ते आपले वाटू लागते.

त्यातही बिघडले नाही. आपल्या सांगण्याला ते पोषक असेल तर घ्यावे. पण आपल्याला काही सांगावयाचे आहे काय? किंवा सांगण्याजोगे आपल्याजवळ काही आहे का? ग्रंथ लिहावा असे मनात येते. पण ग्रंथाचा विषयही आपल्याजवळ नाही. गुरू म्हणाले होते की, पुन्हा कामसूत्र लिहावयाचा काल आला आहे. आलाही असेल. ज्याला अनुभव असतील तो लिहील.

¤

## यज्ञोत्सव

वात्स्यायनाला यज्ञोत्सवाला नेण्याचे आपण अंगावर घेतले आहे अशा रीतीने अंगरिक्ष दुसऱ्या दिवशी सकाळपासून वागत होता. सूर्योदयाआधी चांगल्या दोन घटिका त्याने वात्स्यायनाला उठवले होते. स्नानादी उरकून सिद्धता झाली, पण अंगरिक्ष निघण्याची घाई करीत नव्हता. आणि वात्स्यायनाने जरी आज अंगरिक्ष म्हणेल तसे वागायचे आणि नेईल तेथे जावयाचे असे ठरवले होते तरी, उत्तरीय अंगावर टाकून तिष्ठत बसण्याचा त्याला कंटाळा आला. पण अंगरिक्ष वारंवार गच्चीत जाऊन परत येऊ लागला तेव्हा आपली चूक त्याच्या लक्षात आली. मग तो जेव्हा 'निघू या' म्हणाला तेव्हा योग्य 'मुहूर्त' पाहूनच तो ते म्हणाला याची वात्स्यायनाला खात्री पटली. कारण घराबाहेर येऊन मार्गावर पाऊल टाकताच, पुढच्याच वळणावरून वासंतिका आड झालेली त्याने पाहिली.

अंगरिक्षाची ही लपवाछपवी पाहत असता वात्स्यायनाला अतिशय सुख झाले. हा लंपडाव किती मोहक दिसतो! त्याच्या मनात आले, तो अनुभवायला मिळाला नाही, आपण कधी अनुभवला नाही. म्हणून त्याला पुन्हा खेद वाटला. असे काही अनुभवायला मिळाले असते तर! या प्रेमी जोडप्याबद्दलचा जिव्हाळा वाढून त्याचे मन उचंबळून आले. दूर आपल्याच डौलात वासंतिका चालत होती. काहीही करून दोघांना एकत्र आणू—निश्चयाने त्याने स्वतःला म्हटले.

वसंत ऋतूत नागरिकांनी करावयाचे सोमयज्ञ सुरू झाले होते. अवंतीच्या त्या भागातला हा या ऋतूतला पहिलाच यज्ञ होता. आपल्याप्रमाणेच यज्ञस्थलाकडे जाणाऱ्या नागरिकांचा उत्साह पाहता पाहता, वात्स्यायन, अंगरिक्षाला, यज्ञ करणाऱ्या यजमानाचे नाव, यज्ञ किती दिवसांचा इत्यादी विचारीत होता. यज्ञाच्या अग्नीचे दर्शन घ्यावयास निघालेल्या नागरिकांत सर्व वयाचे स्त्रीपुरुष होते तरी, स्त्रिया आणि तरुण मुलामुलींचा भरणा जास्त होता. विचारलेले प्रश्न अंगरिक्षाला ऐकण्याचे भान नव्हते. यज्ञ पंचरात्रींचा आहे एवढेच वात्स्यायनाला त्याच्याकडून कळले.

यज्ञस्थलाकडे जाणारे नागरिक पाहून वात्स्यायनाच्या मनात आले, अवंतीचे नागरिक खरोखरच हौशी. 'यज्ञस्थल किती लांब आहे?' प्रश्न विचारल्यावर जरा वेळाने अंगरिक्षाचे भानावर आल्याप्रमाणे उत्तर आले, 'इथेच.' मग वात्स्यायनाचा हात धरून त्याने त्याला वळवले आणि एका प्रशस्त वाड्याच्या पुढील प्रांगणातला मंडपाचा कोपरा दिसू लागला.

मंडपाजवळ जाता जाता, धरलेला आपला हात अंगरिक्षाने सोडलेला वात्स्यायनाला कळला नाही. मंडपाजवळची गर्दी पाहून जो तो नागरिक आपली चाल थबकावीत होता. भोवतालची दाटी वाढत होती. यजमानांचे दासदासी त्या दाटीला वळण लावण्याचा यत्न करीत होते.

वात्स्यायन दाटीतून शिरून मंडपाशी गेला. यजमान आणि यजमानीण यज्ञाला आरंभ करीत होती. यजमानणीने कषाय वस्त्र परिधान केले होते व अंगावर उत्तरीय घेतले होते. डोळ्यात भरपूर काजळ होते. समारंभाला साजेसे तिचे तोंड गंभीर होते. ऋत्विजाकडे आणि पतीकडे ती वारंवार पाहत होती. तिचे पतीकडचे पाहणे कौतुकाचे होते. मंडपाबाहेर उभ्या असलेल्या नागरिक स्त्रिया आपल्याकडे पाहत असल्याचे भान असूनही ती एकदाही बाहेर दृष्टी फेकीत नव्हती.

यज्ञाचे यजमानही गंभीर होते आणि ऋत्विज सांगतील ते ते करीत होते व म्हणत होते. पत्नीच्या मानाने यजमान स्थूल होते. भुवया जाड भरगच्च होत्या. त्यांच्याही डोळ्यांत काजळ होते आणि

ते एका गालावर उतरले होते. त्यांची कमरेला गुंडाळलेली मोळाची तिपेटी दोरी लठ्ठ पोटावरून उतरली होती. ती ते अधूनमधून सावरीत होते. एका हातात उंबराचा दंड आणि दुसऱ्या हातात खाजवण्याचे शिंग होते. हे शिंग हातात असले की, कंड सुटली नसली तरी सुटल्यासारखी वाटते. ते उगाचच पाठ खाजवताहेत, वात्स्यायनाला वाटले. फारच गंभीर वातावरण केलंय त्यांनी. सोमक्रमाचा भाग संपलेला दिसतो. आता अग्नीचा भाग सुरू होईल. शेणाने सारवलेल्या यज्ञमंडपाच्या कुडाच्या हिरवट भिंती, धूर तरंगू लागला की निळपट दिसू लागतील. मंडपाचे पाचही दरवाजे धुराचे पडदे लावावे तसे दिसतील आणि झरोक्यातून धूर भराभर वर येऊ लागेल. धूर डोळ्यांना झोंबेल आणि डोळे चोळीत दोघे अधिक गंभीर होतील.

फारच गंभीर होत चालले आहेत यज्ञ. फार पूर्वी होता तो खेळकरपणा यात राहिला नाही. ज्यांनी यज्ञाचे मंत्र रचिले ते खेळकर होते. तेव्हाचे ऋत्विजही असे दीन दिसत नव्हते. मंत्र फार जवळचे होते तेव्हा. त्यावेळी यजमान आणि ऋत्विज दोघेही मंत्रकार होते. म्हणूनच ते खेळकर होते. गंभीरही. यज्ञेन यज्ञ मजयंत देवाः ऋचांमधील गंमत त्याला आठवली. ऋत्विज यजमानणीची मजेदार चेष्टा करीत होता तेव्हा. आणि ती कृतकोपाने उत्तर देत होती.

यावेळी अंगरिक्षाने सोडलेला हात वात्स्यायनाच्या लक्षात आला. 'चोर पळाला.' वात्स्यायन स्वतःशी हसला. मान उंच करून अंगरिक्षाला पाहता पाहता मुलामुलींच्या गर्दीत त्याला तो दिसला. वात्स्यायन पुढे झाला.

वासंतिकाही तिथे होती. दर्शनास जाण्याआधी पाय धुण्यासाठी नागरिक घोटाळत होते. पाणी घालण्याचे काम दासीबरोबर काही नागरिककन्याही करीत होत्या. वासंतिका त्या मुलींत होती आणि आता अंगरिक्ष तिच्यापुढे पाय जुळवून उभा राहिला होता. वात्स्यायन पाहत होता. वासंतिकेने अंगरिक्षाकडे न पाहता पाणी घालण्यास सुरुवात केली. पाण्याच्या धारेत हात घालून अंगरिक्षाने हळूच बोटाने तिच्या तोंडावर पाणी उडवले. वासंतिकेने झटकन मान वर करून हलवली. उडालेल्या पाण्याचे बिंदू तिच्या तोंडावरून ओघळत होते आणि रागाने डोळे मोठे करून ती अंगरिक्षाकडे पाहत होती. राग खोटा आहे का तिचा? कुतूहलाने वात्स्यायन आणखी पुढे झाला आणि अंगरिक्षाने एक पाय पुढे करून अंगठ्याने वासंतिकेच्या पायावर जोराने दाबले. पाय काढून घेण्याचा प्रयत्न करीत वासंतिकेने त्याच्याकडे हताशपणे पाहिले. मग अंगरिक्षाने तिच्या हातातला गडवा घेतला आणि घेता घेता नख तिच्या हातावर रोवले. उत्तरीयात हात लपवून गडवा सोडून ती मागे झाली. मग जोराने गडवा परत हिसकावून तिने भडाभडा अंगरिक्षाच्या वस्त्रावर पाणी ओतले. भिजलेल्या वस्त्राकडे लक्षही न देता तोंडातली चूळ अंगरिक्षाने तिच्या पायांवर टाकली.

गडवा खाली ठेवून वासंतिका मुलींच्या गर्दीत मिसळली. वस्त्र झटकून अंगरिक्ष तिच्यामागे गेला आणि काही वेळ वात्स्यायनाला दोघेही दिसली नाहीत.

गर्दीतून मागे होऊन उलट्या बाजूने मंडपाला फेरा घेत असता वात्स्यायनाच्या मनात आले, या खोड्या कुणी शिकवल्या यांना? आता त्या खांबाआड दोघे दिसताहेत. तिने स्वतःला खांबाआड लपवले आहे. मधूनच पुढे आलेले तिचे तोंड हसरे दिसतंय. हनुवटीशी बोट ठेवून ती खदखदायला लागली आहे. अंगरिक्ष काही मजेदार गोष्ट सांगत असावा. अंगरिक्षाने तिची बोटे धरताच ती सोडवून घेण्याचा यत्न करीत तिने तशीच ठेवली आहेत.

डोळ्यांत प्राण आणून अंगरिक्ष तिच्याकडे पाहत होता. त्याच्याकडे न पाहता तिचे त्याच्याकडे लक्ष होते. तो बोलत असता तिने झटकन आपली बोटे सोडवून घेतली आणि प्रियकराला फसवण्याच्या आनंदात खुदकन् हसून कमरेत अंग लववून घराच्या कोपऱ्यातील आम्रवृक्षाकडे धावली. मागोमाग अंगरिक्ष धावत जवळ येताच तिने झाडावरच्या फळांकडे बोट केले आणि फांदी धरायला उडी मारली.

अंगरिक्षाने पुढे होऊन पटकन् तिला फांदी वाकवून दिली. हाताशी आलेला मोहोर खुडून प्रथम तिने सावकाश दोन्ही हाताने केसात खोवला. मग एक कैरी खुडून दातांना लावीत ती पुन्हा खुदकन् हसली. वाकवलेली फांदी धरून अंगरिक्ष वेड्यासारखा उभा होता.

हा आता एवढ्यात परतायचा नाही हे ओळखून वात्स्यायन तोंड फिरवून यज्ञकुंडाकडे गेला आणि दर्शन घेऊन घराकडे परतला. ¤

## उद्यानयात्रा

त्यानंतर दोन दिवसांनी उद्यानयात्रेचा दिवस आला.

यज्ञोत्सवाच्या वेळेला वात्स्यायनाचा हात अंगरिक्षाने हळूच सोडवून घेतला तसेच उद्यानयात्रेच्या वेळीही केले. यावेळी महेश्वरदत्ताने ज्या अवतारात दर्शन दिले, त्या धक्क्यातून वात्स्यायन सावरता सावरता अंगरिक्ष निसटला.

रस्त्याला लागताच घोड्यावर बसलेला महेश्वरदत्त त्याला दिसला होता. त्याने आपल्या पुढ्यात वेशीतल्या एका वृद्ध गणिकेला घेतले होते. पण एखाद्या भर यौवनातल्या रूपसुंदर गणिकेला घ्यावे तसा त्याचा आवेश होता. वृद्धेने घोड्याचा प्रतोद हातात धरला होता. आणि हातवारे करून ती गात होती. तिने मद्य घेतलेले होते. महेश्वरदत्ताला टाळण्यास वात्स्यायन बाजूला वळणार तोच, त्याला आपल्या नावाची हाक ऐकू आली.

'मल्लनाग ! मित्रा !'

वात्स्यायनाने हात वर करताच तो म्हणाला,

'मल्लनाग ! सर्व गणिकांच्या या महाराणीला पाहा. कामारण्यातील या तपस्विनीला पाहा. सगळ्या पुरुषांना झिडकारून हिने मला आपल्या अश्वावर मान दिला आहे. ये ! मल्लनागा ! तुलाही जागा आहे इथे.'

महेश्वरदत्ताने शेजारी घोडा उभा करताच वात्स्यायन हाताने नको म्हणाला. महेश्वरदत्त म्हणाला,

'लाजू नको. कामसूत्रकाराने सगळे पाहायला हवे.'

वात्स्यायनाचे तोंड लाजेने लाल झाले. तो म्हणाला,

'मी एकटा नाही आलो.'

वात्स्यायनाने बैलगाडीकडे बोट दाखवताच महेश्वरदत्त म्हणाला,

'ठीक ठीक ! शहाण्या माणसाने सासुरवाडीच्या मंडळीस दुखवू

नय. पण एकटा असतास तर इथे बसण्याचे भाग्य तुला लाभले असते. ते गमावलेस.'

गाणे म्हणत, ओरडत, महेश्वरदत्ताने घोडा पुढे दामटताच वात्स्यायनाने श्वास सोडला होता.

नागरिकांबरोबर आज अवंतीमधील सर्व गणिका, वेश्या आणि त्यांच्या दासदासी उद्यानयात्रेला बाहेर पडलेल्या दिसत होत्या. महेश्वरदत्त इकडे तिकडे हात करीत ज्या हाका मारीत होता, त्यावरून तरी तसे वाटत होते. काही गणिका आपल्या पुरुषापुढे घोडयांवर होत्या, काही बैलगाडींतून चालल्या होत्या आणि काही हसत-नाचत पायी निघाल्या होत्या.

उद्यानयात्रेचा प्रबंध आपण पूर्वी पाहिला त्याहून वाढला आहे. वात्स्यायनाच्या लक्षात आले. पूर्वी एवढा उत्सव नव्हता. एवढया गणिका नव्हत्या. बहुतेक नागरिकच असत. आता वस्त्रभूषणांची शोभाही वाढली आहे आणि लोक निघतानाच मद्य घेऊ लागले आहेत.

उद्यान जवळ येऊ लागले. वात्स्यायनाने वासंतिका बसली होती त्या गाडीकडे पाहिले. अंगरिक्ष मित्रांना घेऊन रात्रभर ती गाडी सजवण्यात आणि रंगवण्यात गढला होता. उद्यानात खावयाचे जिन्नस तयार करण्यात रात्रभर त्याची आई, दासी आणि आपली पत्नी श्रमल्या होत्या. बागेत हताश होऊन पडलेला तेव्हाचा अंगरिक्ष! आपल्या कोणत्या शब्दाने त्या निराशेतून त्याला जागे केले? आपण तेव्हा बोललो त्यातले नेमके कोणते?

कुठलेही असेल. आपण जे वाक्य समजू तेच नसेल. दुसरे असेल. अंगरिक्ष आता गाडीत जाऊन बसलाय, काही अंतरापर्यंत तो आपला हात धरून होता. महेश्वरदत्ताशी आपण बोलत असता त्याने संधी साधली. गाडीवानाला खाली उतरवून त्याने त्याची जागा घेतलीय. हे सगळे त्याने ठरवून केले असले पाहिजे. कारण वासंतिका त्याच्या मागेच बसलेली आहे. तिला त्याने बसवतानाच ती जागा दिली असली पाहिजे. पाहा पाहा! अंगात संचारल्यासारखा तो बैलांना प्रतोद हाणीत पादचारी नागरिकांना भिववीत त्यांच्यातून गाडी घुसवतो आहे.

वासंतिका आणि गाडीतल्या इतर मुली आता गाणी म्हणू लागल्या होत्या. हळू आवाजात गाणी सुरू झाली होती. साऱ्या संकोचत होत्या. इतर गाडयांतील प्रौढ स्त्रियांचा धीटपणा त्यांच्यात नव्हता. तिथे हसणे–ओरडणे चालू होते. काही मुळे खात होत्या, काही केळी खात होत्या आणि भरल्या तोंडाने गाण्याला साथ करीत होत्या आणि केळांची साले दुसऱ्या गाडीतील मैत्रिणींवर फेकीत होत्या. आणि एखाद्या सुंदर पुरुषाची दृष्टी आपल्याकडे गेलेली दिसताच त्या अंगविक्षेपात जाणूनबुजून उन्मादकता आणीत होत्या.

अंगरिक्षाच्या गाडीतून हसण्याचा कलहाट आला. वात्स्यायनाने पाहिले, गाडीतील एक कन्या पलीकडील गाडीतील एका गणिकेच्या नृत्याची नक्कल करीत होती. मुली हसत होत्या. नुकतीच वयात येत असलेली ती सडपातळ मुग्धा, गणिकेसारखे कामोत्तेजक अंगविक्षेप करीत असता, पुरुषी आणि बिभत्स वाटत होती. वात्स्यायनाला ओरडावेसे वाटले, जरा थांब कन्यके! जरा थांब! यौवनात येण्याची इतकी घाई करू नको. यौवन ही घाईने आणण्याची गोष्ट नाही.

उद्यान प्रथम ऐकू आले, मग दिसू लागले, मग हाताशी आले. तेथून येणाऱ्या हास्याच्या किंचाळ्यांनी वातावरण भरून गेले होते. उद्यानातून जात असता त्याचे मन रमून गेले. एका बाजूला कोंबडयांची झुंज सुरू झाली होती. हात गुडघ्यावर टेकून ओणवे होऊन, मधूनच एक हात फेकीत, माना वर करीत, ओरडत नागरिक आपापल्या कोंबडयाला प्रोत्साहन देत होते. एकदा एकमेकांची पिसे ओरबाडून दोन्ही कोंबडे समोरासमोर पावित्र्यात उभे होते. ज्यांनी त्यांची झुंज लावून दिली त्यांचे भान दोघांना हरपले होते. एकाने उंच उसळी घेताच दुसराही कोंबडा वर उडाला आणि हवेत त्यांची पांढरी, तांबडी, काळी पिसे फडफडली, एकमेकांत चोच गुंतवून क्षणमात्र ते हवेत राहिले आणि खाली पडले. आणि जमिनीवरच एकमेकांना पकडून धरून ठेवू लागले. आता एकाचा तुरा लोंबू लागला होता, दुसऱ्याच्या डोळयातून रक्त वाहत होते. 'तू किंवा मी' दोघांची ईर्षा वाढली होती. दूर होऊन पुन्हा ते परस्परांवर तुटून पडत होते. सापडेल त्या भागात चोच खुपसीत होते. पंख फडफडत होते. भोवतालची भूमी तुटलेल्या रंगीत पिसांनी रंगल्यामुळे झुंजीचा रंग वाढत होता. पाहता पाहता पराभूत कोंबडा घाबरून सैरावैरा झोकांडे घेत धावत प्रेक्षकांच्या पायांतून घुसू लागला. जिंकलेले ओरडू लागले.

वात्स्यायन झुंज संपलेली पाहून पुढे निघाला. आता क्रीडांचा कोलाहल वाढता होता. आनंदातली हसणी, किंचाळणी, हाका वाढल्या. एका प्रचंड वटवृक्षाखाली दहा-बारा नागरिक स्त्री-पुरुष वाटोळे बसले होते. गाठ मारलेले एक वस्त्र हातात घेऊन एक सुंदर युवती सर्वांच्या पाठीमागून फेरी घेत होती. आता हातातील गाठीचे वस्त्र ती कुणा तरी एकाच्या मागे हळूच सोडून देईल. मग वर्तुळ पूर्ण करून टाकलेले वस्त्र उचलील आणि त्या खेळाडूला गाठीने मारीत सुटेल. कुतूहलाने वात्स्यायन पाहत राहिला. कुणामागे टाकील ती वस्त्र? वर्तुळातल्या तरुणांचे लक्ष वस्त्रापेक्षा तिच्या देहाकडे आहे. तरुणीही स्वतःच्या रूपाची मोहिनी जाणून आहे. तिकडेच लक्ष जावे अशी ती चालत आहे. हातातील गाठ तिने त्या लठ्ठ तरुणामागे टाकावी. न कळता सहज तिला टाकता येईल. बघ! पाहता पाहता तिने वस्त्र टाकलेही. दुर्दैव पडावे तसे त्या लठ्ठ तरुणामागे पडले आहे. त्याला भान नाही! तो तिच्याकडेच पाहतो आहे. एका क्रीडेत दोन क्रीडा चालू आहेत.

युवतीने टाकलेले वस्त्र वात्स्यायनाला दिसत होते आणि हसू येत होते. ओरडून त्या तरुणाला सावध करावे असेही त्याच्या मनात आले. आपले हात, हातातले वस्त्र अजून टाकलेले नाही या आविर्भावात मागे ठेवीत, ती युवती फेरी पुरी करीत होती. आली ती–फेरी पुरी करून आली. वाकून गाठ उचलून तिने टोलाही हाणला.

उठून गडबडीने धावता धावता तो तरुण अडखळला, सावरला, धावू लागला. हातातल्या वस्त्राच्या गाठीचे तडाखे देत तरुणी मागे धावत सुटली आणि हसण्याचा कल्लोळ उडाला. हसता हसता वात्स्यायनाचे डोळेही पाण्याने भरून आले.

हसण्याच्या भरात दूर जाऊन एका वृक्षाच्या तळाशी मुळावर, वृक्षाला पाठ देऊन तो बसला आणि पुन्हा खेळ सुरू झाला होता त्याकडे आणि आजूबाजूला पाहत राहिला. तो असा पाहत असता

एक नागरिक शेजारी येऊन हात छातीशी बांधून उभा राहिला. खेळाकडे पाहता पाहता मान वळवून तो वात्स्यायनाला म्हणाला,

'महाराज ! आपण अवंतीतले दिसत नाही.'

वात्स्यायन म्हणाला,

'नाही. आपण ?'

'मीही अवंतीचा नाही.' तो गृहस्थ म्हणाला, 'अवंती पाहायला मी दक्षिणेतून आलो आहे. महाराज ! आर्यावर्तात मी पुष्कळ हिंडलो, पण इतके हौशी, कलावेडे, संपन्न, उद्योगधंद्यात निपुण नागरिक मी कुठे पाहिले नाहीत. आपण उद्यान हिंडून आलात का ? इकडे कोंबड्यांची, तिकडे मेंढ्यांची झुंज, पलीकडे सोंगट्याचे पट, आणि किती नानातऱ्हेचे पण लावण्याचे खेळ चालू आहेत. अवंतीच्या नागरिकांनी दैवाला जिंकून, ते त्याचा खेळ करून राहिले आहेत असेच वाटते. भाग्यवान आहेत नागरिक इथले !'

वात्स्यायन म्हणाला,

'धन असेल त्याने अवंतीत राहावे.'

'धन ?' तो गृहस्थ म्हणाला, 'धनाला इथे काय तोटा ? देशोदेशींचे व्यापारी इथे येऊन धन ओतीत आहेत. जिंकून अंकित केलेल्या देशातून इथे संपत्ती वाहत आहे. बाजारपेठा मालाने भरल्या आहेत. इथे गरीब राहील तो दुर्दैवी.'

'आपण इथेच राहणार काय यापुढे ?'

वात्स्यायनाने विचारताच तो म्हणाला,

'नाही. हे सगळे पाहून जाणार आणि जे फक्त ऐकून होतो ते खरे आहे म्हणून सांगणार. अवंतीचे नागरिक सारखे कोणता ना कोणता उत्सव करीत असतात असे ऐकत होतो ते खरे आहे, असे माझ्या देशातल्यांना सांगणार. येथील सुंदर वेश, त्यातील त्याहून सुंदर गणिका, येथील ललना, अशा कुठे मिळणार नाहीत. जन्माला यावे तर अवंतीत.'

जरा वेळाने तेथून उठून पुढे निघाल्यावर वात्स्यायनाच्या मनात आले, जी वेश आपण पाहिली ती याने पाहिली नाही. द्रव्य खर्चून एखाद्या गणिकेकडे हा गेला असेल आणि तिने त्याला तेवढा काल सुखात ठेवले असेल. पणाचे खेळ हा दुरून पाहतोय, पण अशाच पणात महेश्वरदत्ताने सर्वस्व हरवले हे याला ठाऊक नाही, आणि व्यापारी तर आपणास ठाऊकच आहेत. पण कदाचित हा म्हणतो तसे सौंदर्य अवंतीत असेलही. त्याच्या दृष्टीतून पाहिल्यावर अवंतीचे सारे सुंदर वाटत असेल. एकदा त्या दृष्टीतून आपणही पाहायला हवे.

समोर विस्तीर्ण हिरवळ पसरली होती आणि महेश्वरदत्त तीवर एकटाच पहुडलेला दिसला. वात्स्यायन ओरडला,

'मित्रा !'

'ये ये ! मल्लनाग ! आकाशाकडे तोंड करून मी पाहत होतो. तिथे एकही तारका दिसली नाही. मग माझ्या लक्षात आले. सगळ्या तारका उद्यानयात्रेला आल्या आहेत.'

याची वृद्धा सखी कुठे गेली ? वात्स्यायनाच्या मनात आले. नकळत तो इकडे तिकडे पाहू लागला. महेश्वरदत्त म्हणाला,

'बघू नको ! त्या थेरडीने मला दगा दिला. बस इथे. कामसूत्राचा एक धडा तुला देतो.'

वात्स्यायन बसताच तो म्हणाला,

'कामसूत्राचा मूलविषय काम असे म्हणतात पण तसे नाही. स्त्री ही कामसूत्राचे मूळ आहे. कारण स्त्री नसेल, तर काम व्यर्थ होय. या स्त्रिया पाहा, मल्लनाग ! यांतील कुणी गणिका, कुणी राज्ञी, कुणी वेश्या, कुणी कुलीन, कुणी दासी असतील. पण शास्त्राच्या दृष्टीने सर्व शेवटी स्त्रियाच. शास्त्रकाराला आणि प्रेमिकाला हे लौकिक भेद करण्याचे किंवा भिण्याचे कारण नाही. स्त्री ही कुणाला अनुकूल होईल हे सांगता येत नसल्याने असले बाह्य भेद मी अमान्य करतो.'

भोवताली खेळणाऱ्या स्त्रियांपैकी एकीकडे बोट करून तो म्हणाला,

'पाहा ! ती मृगी वर्गातील स्त्री आहे. जी वाकली आहे ती हस्तिनी आणि जिने चेंडू फेकला ती बडवा वर्गातील स्त्री आहे. शरीरदृष्ट्या स्त्रीचे फक्त हे तीन वर्गच संभवतात. पण या तिघी केवळ मृगी, केवळ हस्तिनी. केवळ बडवा नाहीत. मृगीत थोडी हस्तिनी आहे. हस्तिनीत थोडी बडवा आहे, बडवात किंचित मृगी आहे. स्त्रियातले मूळ तीन भेद, त्यात हे तीन आणखी घाल. त्याशिवाय काही मृगी थोड्या बडवा असतील आणि हस्तिनीही असतील. असे आणखी तीन भेद झाले. त्यातही आणखी वेगवेगळ्या अंशाने हे दोन किंवा तीन भेद एकत्र येऊन विचार केला तर, एकंदर एक्याऐंशी तऱ्हा मी काढल्या आहेत. जगातील कुठलीही स्त्री या एक्याऐंशी स्त्रीत बसेल,'

वात्स्यायनाने मध्येच विचारले,

'बसेल का ?'

'तू म्हणतोस ते बरोबर आहे.' महेश्वरदत्त म्हणाला. 'नाहीही बसणार. भेद करावे तेवढे होतील. तो केवळ आकडा आहे. लिहिशील, तू नक्की कामसूत्र लिहिशील. बहुतेक ती माझी सखी घोडा विसरेल आणि मला चालत जावे लागणार नाही. खरे पाहिले तर, डोक्यात कोवळी पाने खोवून सर्व नागरिकांबरोबर चालत परत जाणे किती आनंदाचे ! पण उद्यानयात्रा संपून, सायंकाळ होऊन नागरिक परतू लागले की, मी उदास होतो. मला रडूच येते. मला वाटते, सदासर्वकाळ उद्यानयात्रा चालूच राहावी. मग मी या हिरवळीवर असाच हे गोड ध्वनी ऐकत पडून राहीन. माझे ऐकशील? आता तू नगराला परत जाऊच नकोस. त्या खर्वटात काय आहे ? आणि ही उद्यानयात्रांची अवंती सोडून तुला जावते तरी कसे ?'

वात्स्यायन काही बोलला नाही. महेश्वरदत्ताने विचारले,

'का रे ? तुला राग आला वाटतं. मी—'

महेश्वरदत्ताचे वाक्य अर्धेच राहिले. धापा टाकीत धावत आलेली एक कन्यका वात्स्यायनापाशी येऊन म्हणाली,

'वासंतिका आणि अंगरिक्षा कुठे दिसत नाहीत. आम्ही खूप शोधले. साऱ्या मुली घाबरल्या आहेत.'

वात्स्यायन गडबडीने उठून उभा राहिला.

[ क्रमशः ]

पुस्तके

# नदीची लेकरं

वसंत शिरवाडकर

'नदीची लेकरं' हा प्रो. हुमायून कबीर यांच्या 'मेन अँड रिव्हर्स' या त्यांनी मुळात इंग्रजीतूनच लिहिलेल्या कादंबरीचा श्री. पंढरीनाथ रेगे यांनी केलेला मराठी अनुवाद. प्रो. कबीर यांच्या या कादंबरीच्या एकामागून एक अशा दहा-बारा आवृत्त्या निघाल्या, त्यावरून या कादंबरीला लाभलेल्या अमाप लोकप्रियतेची कल्पना येते.

पूर्व बंगालमधील (आजचा बांगला देश) वाहत जाणाऱ्या पद्मा या नदीच्या काठावरील एका खेड्यातील दोन शेतकरी कुटुंबांच्या संघर्षाची ही कथा आहे. नाझुमिया आणि अस्गरमिया हे दोन मातब्बर शेतकरी आणि गावाचे पुढारी. पण एकमेकांचे ते वैरी आहेत. वस्तुतः तरुण वयात ते जिवाभावाचे मित्र होते. या भागात वस्ती करण्यात त्यांचाच पुढाकार होता. त्यांच्या दोस्तीची जिगर इतकी की, जनावरांच्या अभावी नांगराला स्वतःला जुंपून घेऊन त्यांनी एकमेकांची जमीन नांगरली होती. पण आता मात्र त्यांच्यात वैमनस्य आहे. त्याचे कारण काय, हे कादंबरीच्या शेवटच्या प्रकरणात गुलदस्तात ठेवण्यात आले आहे. दैवगती अशी विचित्र की, नाझुमियाचा मुलगा मालेक आणि अस्गरमियाची मुलगी नरू यांची बालमैत्री असते व त्यातून पुढे त्यांचे प्रेमसंबंध जुळतात. विवाहाच्या आणाभाका घेण्यापर्यंत वेळ येते तेव्हा त्यांचे नाते बहीणभावांचे आहे हे विलक्षण, धक्का देणारे रहस्य अस्गरमिया उघड करतो. घडले ते असे की, नाझुमियाने ज्या स्त्रीशी–अमिना तिचे नाव–लग्न केले होते, तिचा अस्गरमियाशी अनैतिक संबंध आहे, असा संशय येऊन तिला तलाक दिला आणि नंतर अस्गरमियाने अमिनाशी लग्न लावले. म्हणजे मालेक व नूरू ही एकाच आईची मुले, पण दोन वेगळ्या पुरुषांपासून झालेली. हे जन्मरहस्य उघडकीला आल्यानंतर मालेक व नुरू यांच्या प्रेमाची शोकात्मिका होते हे सांगायला नकोच.

कादंबरीच्या कथानकाचा हा अगदी मोजका गोषवारा सांगितला. पण त्यावरूनसुद्धा ही एक पारंपरिक धर्तीची रोमँटिक कथा आहे, हे सहज लक्षात येईल. दोन प्रेमिक हे बहीणभाऊ असल्याचे नंतर उघडकीस यावे अशा प्रकारचे रहस्य जगातील वाङ्मयात अनेक कथांत आले असेल. दुसरे असे की, प्रस्तुत कादंबरीत लेखक मालेक व नुरू यांच्या जन्मरहस्याचे आव्हान सरळपणे न स्वीकारता कादंबरीच्या रचनेतील खुबीचा एक भाग म्हणून त्याची योजना करतो. म्हणून तर नाझुमिया आणि अस्गरमिया यांच्यातील वैमनस्याच्या कारणाबाबत अगदी शेवटपर्यंत काहीही खुलासा करण्यात येत नाही. कादंबरीला रहस्याची डूब देऊन एक रोमँटिक परिणाम साधण्याचा लेखकाचा हेतू उघडच आहे. त्यासाठी तो काही विसंगतींचा दोषही पत्करतो. कारण असे पाहा की, नाझुमिया आणि अस्गरमिया हे गावचे पुढारी. नाझुमिया तर गावाचा 'पंचायन' म्हणजे सरपंच. तो त्याच्या बायकोचा त्याग करतो आणि अस्गरमिया मग तिच्याशी लग्न करतो, या गोष्टीचा गावातील लोकांना थांगपत्ताही असू नये, हे असंभवनीय आहे. खेडेगावात कोठे खुट्ट झाले की, ते गावातल्या सर्व लोकांच्या कानांवर जाते आणि बाईसंबंधीच्या भानगडी तर लोक मोठ्या चवीने चघळत राहतात. येथे तर नाझुमियाचा म्हातारा नोकर बसीर आणि अस्गरमियाचा आश्रित अझीझ यांनासुद्धा या रहस्याची गंधवार्ता नसते. परिणामी माणूस आणि नदी यांच्या संबंधातील भव्योदात्त नाट्याची वाट अखेरीस एका रहस्यात फसते आणि वाचकांचा विरस होतो. शिवाय जन्मरहस्यामुळे झालेल्या प्रेमाच्या शोकात्मिकेत अपरिहार्यतेचा अंश नाही. ती पातळच ठरते.

मग प्रश्न असा की, 'मेन अँड रिव्हर्स' किंवा 'नदीची लेकरं' या कादंबरीच्या नावात माणसाइतकेच नदीला प्राधान्य दिले आहे, त्याला कादंबरीत काही प्रयोजन आहे काय ? नदी आणि नियती यांना लेखकाने एकरूप कल्पिले आहे असे म्हणावे तर, जन्माने बहीणभाऊ ठरल्याने मालेक व नुरू यांचे प्रेम विफल होते या घटनेशी नदीचा काहीच संबंध नाही. नदीची भूमिका एवढी आवर्जून सूचित करण्यात आली आहे त्याला काही अर्थ आहे की नाही ?

या प्रश्नांची उत्तरे होकारार्थी देता येतील. माणूस आणि नदी यांचे संबंध हा या कादंबरीचा दुसरा एक स्तर आहे आणि तो अतिशय चित्तवेधक आहे. पद्मा ही काही साधीसुधी नदी नाही. 'अगणित कुटुंबे आणि शेतीवाडी जिने गट्ट करून टाकली अशी आधाशी काळनागीण' या शब्दांत तिचे वर्णन करण्यात आले आहे. नाझुमियाला पद्मेचे पहिले दर्शन घडले ते असे... 'ही नदी जशी काही राक्षसीण. खुशाल मैलोन मैल पसरलेली. गरगरा फिरणाऱ्या, उसळणाऱ्या आणि घोंघावणाऱ्या प्रवाहाच्या त्या झपाटलेल्या झोतास अंतच नव्हता. जसा काही दुष्ट गतीने चाललेला प्रवाह झळाळला. संध्याकाळच्या झेपावत्या अंधारात विषण्णतेचा पगडा बसवला.' हे दृश्य पाहून भयाकुल स्वरात नाझुमिया उद्गारला, 'हा समिंदर तर नाही ?'

ही नदी राक्षसीण असल्याची नाझुमियाची भीती त्याच्या बाबतीतही खरी ठरली ! या मुलुखातला उन्हाळा भयंकर आणि उन्हाळ्यात कधीकधी मोठी चक्रीवादळेही होतात. वैशाखातल्या अशाच एका दिवशी नाझुमियाने पैलतीरावर राहणाऱ्या कुळांकडून खंड वसुल करण्याकरिता नदीत होडी घातली. सकाळच्या तल्खलीच्या पाठोपाठ दुपारी मोठे तुफान उठले. नदी खवळली आणि तिने नाझुमियाचा त्याच्या दोन तगड्या साथीदारांसह घास गिळला ! यानंतर एकदा असेच मोठे अवर्षण आले. सारे जीवन शुष्क, निर्माल्यवत करून टाकणारे. अवर्षणाच्या मागून अतिवर्षण येणे हा जणू काय येथला निसर्गक्रमच आहे. पाऊस धो धो पडू लागला आणि नदीला बेफाम पूर आला. दोन्ही बांध फोडून तिने सारा मुलूख पाण्याखाली घातला. घरेदारे, माणसे, गुरेढोरे तिने उचलून नेली. गाव वाहून गेले. मुलूख उजाड झाला. जे कोणी या प्रलयातून वाचले त्यांनी इतर ठिकाणी जाऊन नव्याने जीवनाची उभारणी केली. पण निसर्गाची लीला अशी अगाध की, जी पद्मा काळनागीण आहे तशी ती कामधेनूही आहे. जीवनाचे दान देते तेव्हा अनंतहस्तांनी देते. तिच्या गाळपेर

जमिनीत बी नुसते फेकले तरी, धान तटतटून येते. तिच्या काठावर केवळ पीकच नव्हे तर, जमीनसुद्धा ' उगवते.' तिच्या विशाल पात्रात कधी अकस्मात नवे बेट वर येते आणि कोरी कसदार जमीन लागवडीसाठी मिळते. म्हणून तर नाझुमियासारखे कास्तकार या नदीवर ' देहाच्या आसक्तीने ' प्रेम करतात. कधी उग्र तर कधी आनंदमयी, कधी क्रूर तर कधी दयावंत अशी ही नदी या माणसांच्या जीवनाचा एक भाग बनून गेली आहे. तिने कितीही विध्वंस केला तरी जगण्यासाठी त्यांना पुन्हा पुन्हा तिच्याकडेच धाव घ्यावी लागते. अशा अर्थाने ही माणसे तिची लेकरेच आहेत. अस्गरमिया हेच सत्य बोलून दाखवतो. तो म्हणतो, ' आपण नदीची लेकरं आहोत–किसान आहोत. आपण आपली घरं वाळूवर उभारतो नि नदीचं पाणी ती वाहून नेतं. आपण ती फिरफिरून उभारतो; आणि आपण जमीन नांगरतो आणि ओसाड जमिनीतून सोन्याचं पीक काढतो.' नदी आणि माणूस यांचा संबंध चिरंतन स्वरूपाचा आहे. त्याला शिळेपणा असा कधीच येणार नाही. तीस वर्षांपूर्वी लिहिलेल्या या कादंबरीचा अनुवाद वाचताना तिच्यात आजही ताजेपणा जाणवतो याचे हे एक कारण आहे.

पूर्व बंगालमधील मुसलमान शेतकऱ्यांच्या जीवनाचा लेखकाचा अनुभव ' फर्स्टहॅंड ' आहे हे जाणवते. व्यंकटेश माडगूळकरांची ' बनगरवाडी ' वाचताना जाणवते तसे. म्हणूनच कादंबरीतील नाझुमिया, अस्गरमिया, मालेक, नुरू ही प्रमुख पात्रेच केवळ नव्हे तर बसीर, कुल्सुम, अझीझ, गावात येणारा कोणी फकीर यांसारखी दुय्यम पात्रेही ठळक आकार घेतात. अझीझची बायको कुल्सुम मरते पण तो भाबडा जीव ते मानायला तयार नाही. ती जीवंतच आहे असे समजून ' कुल्सुम म्हणते की...' अशा प्रकारचा उल्लेख तो दर वाक्यागणिक करतो. येथे मानवी स्वभावातील निरागसतेचा एक अनुकंपनीय नमुना आपल्याला पाहावयास मिळतो. माणसांकडे पाहण्याची लेखकाची एकूण दृष्टीच सहानुभूतीची व अनुकंपेची आहे. माणसांच्या स्खलनशीलतेची पूर्ण जाणीव त्याला आहे. म्हणून या कादंबरीत उदात्त आदर्श जसे नाहीत तसेच कोणी अकारण दुष्टही नाहीत. गावात आलेला फकीर नाझुमियाच्या अपघाती मृत्यूचे भविष्य वर्तविती ही दैववादी वा अतिमानवी घटना कादंबरीच्या एकूण वास्तववदर्शी बैठकीला गालबोट लावणारी आहे.

छोटा मालेक नदीत मासे पकडायला गेला असता त्याच्या जाळ्यात सुसर अडकते; भटकायला गेलेला मालेक व नुरू एका ओहोळातील चिखलात अडकून पडल्यानंतर घरची माणसे रात्रभर किर्र जंगलात मशाली लावून त्यांचा शोध करतात; मालेकला समुद्रावरचे चाचे पकडून नेतात, या प्रसंगातील नाट्य वेधक आहे. अशा नाट्यपूर्ण प्रसंगांनी कथानकाला गहिरे रंग भरण्याची लेखकाची खास हातोटी आहे. भीषण अवर्षणाचे आणि त्यानंतर नदीच्या प्रलयाचे वर्णन काळजाचा थरकाप उडवणारे आहे. भारतीय उपखंडातील शेतकरी निसर्गाच्या प्रकोपापुढे किती असाहाय्य व हतबल ठरतो याची विदारक जाणीव येथे होते.

पंढरीनाथ रेगे यांनी या कादंबरीचा अनुवाद सफाईदार केला आहे. आपण अनुवाद वा भाषांतर वाचतो आहोत असे वाटत नाही, यातच रेगे यांचे यश सामावले आहे. प्रो. हुमायून कबीर यांना ही कादंबरी मळात इंग्रजीतून लिहिताना त्या भाषेला उर्दूची डूब देणे शक्यच नव्हते. रेग्यांना ते मराठीच्या बाबतीत शक्य झाले. संवादातील उर्दूमिश्रित मराठी वातावरण निर्मितीस पोषक झाले आहे. अनुवादात क्वचित काही ठिकाणी मात्र गडबड झाली आहे. कादंबरीच्या सुरुवातीच्याच परिच्छेदात ' Under the morning Sun the waters shone with a pleasant gliut ' याचे ' सकाळच्या उन्हात नदीच्या पाण्याची चमक आल्हादकारक वाटत होती ' असे सरळ साधे भाषांतर करायला हरकत नव्हती. ' प्रभातीच्या रविकिरणात पात्रातील पाणी उल्हासमय तेजाने चमकत होते ' या रेग्यांच्या अनुवादात भारदस्त शब्दांनी परिणाम साधण्याचा हेतू दिसतो. पण खरे तर, तसा कधी परिणाम साधत नाहीच. कोठे तरी sentimental fool याचे भाषांतर ' भावनाशील मूर्ख ' असे केले आहे ते बरोबर नाही. आयेषा नदीकाठी मरते त्याचे वर्णन ' There she lay with her face pressed to the wet mud ' याचे भाषांतर ' ती तेथे पडली होती. तिचा चेहरा चिखलात लडबडला होता.' असे योग्य झाले असते. ' ती ओल्या चिखलात तोंड खुपसून पडली होती ' हे रेग्यांचे भाषांतर चुकीचे वाटते. पण अशा काही थोड्याच जागा सापडतील. एकूण अनुवाद मुळातल्या कादंबरीला न्याय देणारा आहे. ◘

' नदीची लेकरं '

मूळ लेखक : प्रो. हुमायून कबीर
अनुवाद : पंढरीनाथ रेगे,
श्री प्रकाशन, मेहुणपुरा, पुणे
किंमत : रु. १५–सवलत योजना रु. १०.

---

# आमचे ग्रंथालय

जे. एन्. पोंडा

---

## Don't Fall Off The Mountain

हे पुस्तक तसे काही नवीन नाही. परंतु इतके दिवस मला ते मुंबईच्या किंवा पुण्याच्या पुस्तकाच्या दुकानात कधीच दिसले नव्हते. थोड्या दिवसांपूर्वी ते मुंबईच्या एका दुकानात हाताला लागले. कधीकधी इंग्रजी पुस्तकाच्या प्रती भारतात इतक्या कमी येतात व त्या इतक्या लवकर खपून जातात की, ते पुस्तक खरोखरीच भारतात आले होते याचा थांगपत्ताच लागत नाही. कारण मुंबईचे काही इंग्रजी पुस्तकांचे दुकानदार त्यांच्याकडे पुस्तक कधीच आले नव्हते हे कबूल करत नाहीत. त्यात त्यांना काय कमीपणा वाटतो कुणास ठाऊक. पण अमके पुस्तक आपल्याकडे आहे का ? असे विचारता ' सॉल्ड आऊट ' असे उत्तर मिळते. खरं म्हणजे त्या पुस्तकाचे नावही त्यांनी ऐकलेले नसते. म्हणून या पुस्तकाचा परिचय एक नवीन पुस्तक म्हणून नव्हे तर एक आगळे पुस्तक म्हणून देत आहे.

सिनेनटांनी लिहिलेली दोनच पुस्तके आतापर्यंत गाजली. ती म्हणजे बॉब हॉपनी लिहिलेले ' I Owe Russia $ 1200 ' व एरॉल फ्लीनचे ' My Wicked, Wicked Ways '. शर्ले मॅक्लीनच्या या पुस्तकाला

वरील दोन पुस्तकांइतकी जरी मागणी नसली तरी ते एक फारच वाचनीय पुस्तक आहे. किंबहुना वरील दोन पुस्तकांपेक्षा तिचेच पुस्तक जास्त संवेदनाशील वाटते.

कधीकधी नियती एकाच कुटुंबात भिन्न भिन्न व्यक्तिमत्त्वाची माणसे एकत्र आणते. या भिन्नतेची एकमेकांवर प्रतिक्रिया होऊन त्या दोन व्यक्तीतील फरक आणखीनच वाढत जातो. या भिन्नतेला समजूतदारपणाची झालर असली तर ठीक, नाहीतर काही व्यक्ती नियतीच्या या क्रूर चेष्टेने अक्षरशः पिचून जातात.

पण शर्ले मॅक्लीनसारख्या व्यक्ती अगदी यशाचे टोक गाठतात. पण तिच्या या टोक गाठण्यातसुद्धा सुप्त वैर असेल. जणू तिच्या घवघवीत यशाने तिला असे म्हणावयाचे आहे, 'हे पाहा बाबा, मी किती उंच भरारी मारली.' तिचे वडील अगदीच तिच्या विरुद्ध होते. हे तुला जमणार नाही, ते तू करू नकोस, असं तिच्यामागे सारखं टुमणं लावायचे.

शर्ले मॅक्लीनचे नाव आज सर्वांना माहीत आहे. एका पिक्चरमध्ये काम केल्यास ती $ ८००,००० घेई! ती प्रवासाची तर अत्यंत भुकेली आहे. दोन महिने स्टेजवर काम केले की तिची मोटार जणू काही आपोआपच विमानतळाकडे प्रवासासाठी उड्डाण करण्याकरिता वळे! कुणी मोटारीसाठी पैसे जमवले असल्यास ती सांगे, 'नका घेऊ ती मोटार. ते पैसे घेऊन तुम्हाला जितके हिंडता येईल तितके हिंडा. प्रवासाने तुम्ही इतर लोकांना समजून घ्याल व तेच तुम्हाला स्वतःला समजण्यासाठी मदतरूप होईल.'

तिचा प्रवास म्हणजे आलिशान हॉटेलमध्ये राहून शहरात शॉपिंग करण्यासाठी नसतो. ती जिकडे जिकडे प्रवासाला जाईल तिकडे तिकडे भोवतालच्या परिस्थितीत स्वतःला अक्षरशः झोकून देई! आफ्रिकेतील मसाई जमात तिला रोगट जनावराचे दूध व रक्त प्यावयास देते. त्याचा सुद्धा घोट ती घेते! ह्याच मसाई जातीत एका अर्भकाचा जन्म होताना ती हजर राहते. याचे वर्णन ती इतके हुबेहूब करते की, ते चित्र डोळ्यासमोर उभे राहते. मसाई जमातीत एकट्याने भाल्याने सिंह मारला तरच त्याचे पौरुषत्व मानले जाते. कॅमेऱ्याची तर त्यांना फारच भीती वाटे. त्यांचा समज असा की, कॅमेऱ्याच्या निगेटिव्हमध्ये आपला शरीराचा आत्मा उडून जाऊन बसतो!

हिचकॉकच्या Macabre Sense of humour बद्दल बरेच ऐकले होते. पण या पुस्तकात तर तो पराकाष्ठेला गेला आहे. शर्ले मॅक्लीन जेव्हा त्याच्या स्टुडिओत कामाला जाते तेव्हा तो तिला म्हणतो, 'Pleasant period after dealth!' (म्हणजे Good mourning!) 'Genuine Chopper!) (म्हणजे Real–Axe म्हणजे Relax).

शर्ले मॅक्लीन लहान असताना तिच्या पायात दोष असतो. पण आता ती चाळिशीच्या पुढे गेलेली असली तरी तिचा दैनंदिन कार्यक्रम हा असा : संध्याकाळी ६–३० ते रात्री १०–३० झोप घेणे. रात्री १२ ते पहाटे ५ पर्यंत लिखाण करणे! नंतर रोज चार तास व्यायाम करणे. पुढे चित्रपटाच्या स्टुडिओत काम करणे!

शर्ले मॅक्लीनची 'Irma La Douce' ची भूमिका सर्वांना परिचित आहेच! पण या भूमिकेची तयारी म्हणून तिने फ्रान्समधल्या रेड लाईट डिस्ट्रिक्टमध्ये जाऊन त्या धंद्यावर तिने 'संशोधन' केले होते ते बऱ्याच लोकांना माहिती नसेल. ह्या रेड लाईट डिस्ट्रिक्टचेही वर्णन तिने फार मजेशीर केले आहे.

एकंदरीत जरी पुस्तकाची शैली अगदी सरळ आणि वेधक असली तरी काही बाबतीत ती अतिरंजित वाटते.

बँकॉकमध्ये ती असताना एका नावेतून एक तान्हे मूल त्याच्या आईवडिलांसमोर पाण्यात बुडते. त्या मुलाचे आईवडील त्याला वाचवायचा तर काहीच प्रयत्न करीत नाहीत, पण त्यांच्या चेहऱ्यावरचे भावसुद्धा अजिबात बदलत नाहीत. त्याचे कारण जर सरळ दुष्टता असते तर मला काहीच वाटले नसते. परंतु दैवाच्या इच्छेच्यामध्ये आपण लुडबूड करू नये, अशी आईवडिलांची भूमिका!

भारतात ती आली होती त्यावेळी तिने कलकत्त्याचे केलेले वर्णनसुद्धा थोडेसे अतिरंजित वाटते. पण लोकांचे काय किंवा स्थळांचे काय, ती फार सूक्ष्मपणे निरीक्षण करीत असे.

शेवटी थोडीशी एक शंका मनात येते. पाश्चात्य देशात अलीकडे Ghost Writing चे प्रमाण थोडे वाढते आहे. म्हणजे एखादी मशहूर किंवा श्रीमंत व्यक्ती मुद्दे सांगून दुसऱ्याकडून पुस्तके लिहून घेते. पुस्तक खपते ते या व्यक्तीच्या नावाखाली! त्या गरीब बिचाऱ्या लेखकाला अल्पसा मोबदला मिळतो, तेवढेच काय ते! लिखाणाच्या शैली वगैरेचे श्रेय सर्व त्या बड्या व्यक्तीचे!

पण शर्ले मॅक्लीन रोज रात्री १२ ते पहाटे ५ पर्यंत लिखाण करते म्हणजे तिच्या बाबतीत हा Ghost Writing वगैरे प्रकार काही होणार नाही! ¤

**'Don't Fall off the Mountain'**
Shirley MacLaine
Bantan Books, pages 292.
Rs. 18–35.

## Curtain

'कर्टन' हे ॲगाथा ख्रिस्तीचे 'शेवटचे' पुस्तक! पण खरे म्हणजे तिने ते ३० वर्षांपूर्वीच लिहून ठेवले होते! (म्हणूनच तिची ही कादंबरी जास्त दमदार आहे.) मृत्यूनंतर ही कादंबरी प्रसिद्ध व्हावी अशी ख्रिस्तीची मनीषा होती. पण कदाचित ती ८५ वर्षांची झाली तेव्हा तिला आणखीन गौरव मिळवण्याची इच्छा अनावर झाली व तिच्या मृत्यूच्या आधीच ही कादंबरी प्रसिद्ध झाली. तिने एक आत्मचरित्रही लिहून ठेवले आहे.

कोनन डॉईल आणि ॲगाथा ख्रिस्ती यांनी इंग्रजी रहस्यकथेला आदराचे स्थान मिळवून दिले. या दोघांच्या रहस्यकथा इंग्रजी साहित्यात मोडल्या जातात. तिच्या रहस्यकथेत हिंसाचाराने केलेली अतिरंजित खुनाची वर्णने नसतात. जास्त करून विषप्रयोगच असतो. परंतु युद्धोत्तर काळाच्या युरोपचे वर्णन व ग्रामीण भागाचा इंग्लंड यांचे चांगलेच दर्शन होते.

ख्रिस्तीच्या पुस्तकांचा खप बायबल व माओचे विचार ह्या पुस्तकांइतका आहे! तिच्या पुस्तकांचा खप ३० कोटींच्या वरती आहे. सतत २४ वर्षांपासून रोज प्रयोग होत असलेले 'माऊस ट्रॅप' हे तिचे नाटक ३५ लक्ष प्रेक्षकांनी पाहिले. 'माऊस ट्रॅप' चे रूपांतर शं. ना. नवरे यांनी 'अ, ब आणि क'

या नावाखाली केले होते व विद्याधर गोखल्यांनी 'विटनेस फॉर द प्रॉसिक्युशन'चे रूपांतर 'साक्षीदार' या नावाखाली केले होते. पण ही दोन्ही नाटके पडली. तिने ८५ कादंबऱ्या, १२ काव्यसंग्रह व १७ नाटके लिहिली. याखेरीज मॅरी वस्टमेकॉट या टोपण नावाखाली तिने बरीच पुस्तके लिहिली. तिला लिखाणात इतका अमाप पैसा मिळाला की, तिच्या रॉयल्टीज वगैरे व्यवस्था बघण्यासाठी तिचे दोन डिटेक्टिव्हज पॉयरॉ व मिस् मार्पल या दोघांच्या ग्रेसेलसला बरेच काम मळाले असते !

एकदा न्यू गिनीच्या रविराजांच्या निष्ठावंताच्या हाती ख्रिस्तीचे 'Evil Under The Sun' हे पुस्तक आले ! लागलीच त्या जमातीच्या लोकांनी त्या पुस्तकाला अत्यंत आदराचे स्थान दिले ! कदाचित त्यांनी ख्रिस्तीच्या नावाचा संबंध Christ शी लावला असेल.

ख्रिस्तीच्या आयुष्यातला १९२६ हा काळ रहस्यमय आहे. या वेळी अचानक ती दोन आठवडे नाहीशी झाली होती. त्या वेळी तिच्या शोधात ३०० पोलीस व बरीच कुत्री हिंडत होती. थोडी विमानेही घिरटचा घालीत होती आणि शेवटी स्वारी एका हॉटेलात टॅसा नीऊ या नावाखाली लपलेली आढळली. दोन वर्षांनंतर खऱ्या टॅसा नीलशी ख्रिस्तीच्या पतीने विवाह केला !

'कर्टन'मध्ये स्टाईल्स यथे पॉयरॉ एका खुनीच्या शोधात येतो. पॉयरॉला स्वतःला आर्थ्रायटिस व हृदयरोग झालेला असतो. तो व्हीलचेअरमध्येच हिंडतो इतका आजारी असतो. तो आल्यावर कॅप्टन हेस्टिंगज्ला बोलावणे पाठवतो. कॅप्टन हेस्टिंगज्ला कोण खुनी आहे ते तो सांगत नाही. कारण कॅप्टन हेस्टिंग्ज म्हणजे शेरलॉक होम्समधील डॉ. वॅटसनचा भाऊ ! अगदी भाबडा. पॉयरॉला वाटतं की, हेस्टिंगज्चा चेहरा खुनीला सावध बनवील.

'स्टाईल्स'च्या गेस्ट हाऊसचे वातावरणच जणू खुनाला पोषक होते. खुद्द कॅप्टन हेस्टिंग्ज ॲलर्टन नावाच्या गृहस्थाचा खून करण्यास तयार होतो. कारण ज्युडिथ (हेस्टिंग्जची मुलगी) त्याच्या नादी लागलेली असते. सुदैवाने पॉयरॉला त्याचा सुगावा लागतो व तो हेस्टिंग्जलाच निद्रावश करून टाकतो. मिसेस फ्रँकलिन बाईचा नवरा डॉक्टर असतो. त्याची एक असिस्टंट बाई असते. ह्या दोघांचे काही तरी प्रकरण असावे, असे मिसेस फ्रँकलिनला वाटते. म्हणून ती नवऱ्याला कॉफीत विष टाकून मारण्याचा प्रयत्न करते. हा कप इतर कपाबरोबर एका रिवॉल्विंग बुककेसवर ठेवलेला असतो. तोच वेंधळचा हेस्टिंग्जचा धक्का बुककेसला लागतो व विष असलेला कप खुद्द फ्रँकलिन बाईच्या जागेवर फिरून जातो ! इतर खूनही होतात.

शेवटी पॉयरॉच्या मृत्यूनंतर चार महिन्यांनंतर वकिलाकडून हेस्टिंग्जला बोलावणे पाठविण्यात येते व त्याला पॉयरॉचे पत्र देण्यात येते. या पत्रात सर्व गौप्यस्फोट केला आहे.

कधीकधी अँगॉथा ख्रिस्तीची पुस्तके धक्का देणारी असतात. मर्डर ऑफ रॉजर ॲकरॉईड्मध्ये तर निवेदन करणारा स्वतःच खुनी असतो ! याही पुस्तकात ती अनपेक्षित ट्वीस्ट देते. ◻

**Curtain**


Agatha Christie
Pages 221–Rs. 12/-


## SOME NEW TITLES

1. Night Judgement At Sinos – ( Bestseller – Thriller ) – Jack Higgins — Rs. 12·00
2. In Search of Ancient Gods – (Bestseller – Pictorial evidence of extraterrestrial life) – Erich Von Daniken — Rs. 15·00
3. Nausea – (a novel of the alienation of personality in a diary form) – Jean Paul Sartre — Rs. 10·0
4. The Curious Death of Marilyn Monroe – (Bestseller – Marilyn was murdered ! Not a Case of Suicide ! ) Robert F. Slatzer — Rs. 18·35
5. The Great Train Robbery – (Bestseller – Novel) Michael Crichton — Rs. 14·00
6. The Lonely lady – (Bestseller – Novel) Harold Robbins — Rs. 14·00
7. TM : Discovering Inner Energy & Overcoming Stress – (Most reliable book on transcendental meditation ) Field Bloom, Harold, Cain, Jaffe, Kory — Rs. 20·00
8. The Medical Witness – A forensic medicine expert who collected evidence from exhumed bodies & helped find murderers) – Richard Gordon — Rs. 10 00
9. The Golden Gate – (Bestseller – Thriller) – Alistair Maclean — Rs. 10·00
10. Gandhi – his Life and Message For The World – (Biography) – Louis Fisher. — Rs. 10·00

**फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव, पोस्टासमोर, पुणे–३०.



# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

## पु. ल. इनामदार

## प्रकरण अठरा : वातावरण–दिल्ली, पंजाब, ग्वाल्हेर

भारताची राजधानी दिल्ली येथे महात्मा गांधींची हत्या झाली त्यानंतर तेथील वातावरण कसकसे होते याची पहिली चुणूक मला लालकिल्ल्यातील अभियोगपर्वासाठी तेथे गेल्याच्या पहिल्या दिवशीच पाहायला मिळाली होती. दिनांक २७ मे १९४८ च्या सकाळी अण्णासाहेब भोपटकरांशी झालेले बोलणे संपविल्यावर मी लालकिल्ल्यात जावयासाठी बिर्ला मंदिरापाशीच टांगा ठरविला नि एकटाच त्यात बसून जात होतो. दिल्लीला मी पहिल्यानेच आलो होतो, त्यामुळे मला तेथला परिसर सगळ्याच रीतीनं नवीन होता. टांग्यात मी आपल्याच विचारात होतो. मला गुमसुम बसलेला पाहून की आपल्या कार्याचा एक भाग म्हणून, टांगेवाल्याने दिल्लीचे माझे अज्ञान माहीत करून घेऊन दिल्लीच्या वैभवाची गौरवगाथा व त्या संदर्भाने तेथे काय काय पाहण्यासारखे आहे ते, मला उर्दू भाषेत सांगायला सुरवात केली. तो सुमारे ४५–५० वर्षे वयाचा, किरकोळ शरीराचा, अगदी जीर्ण व मळके कपडे घातलेला, ओढलेल्या चेहऱ्याचा मनुष्य होता. घोड्याजवळ टांग्याच्या बंबावर–दांडीवर–बसून घोडा हाकीत होता. त्याच्या अवतारावरून निर्वासित असेलसे वाटले. त्याने आपल्या गौरवगाथेच्या संदर्भातच मला, 'आज आप लालकिलेमें क्यूं तशरीफ ले जा रहे हैं ?' म्हणून अदबीने विचारले व पुढे तेथे जायला आज 'पास' लागेल, आपल्याजवळ 'पास' आहे का असे विचारले नि 'अजी वहां तो बडी झंझट है. पहिचान देनी पडेगी. पुलिस का पेहरा है आज जबरदस्त ! वहां गांधीजी के कतल का मुकदमा चला है ना ?' असे मला वेळीच सावध करण्याच्या सौजन्याने सांगितले. त्याचे सौजन्य मला त्यावेळी 'बडबड' वाटले नि त्याला गप्प करण्याच्या हेतूने मी त्याला 'मला तेथे आज जायलाच पाहिजे. मला तेथे जायला कोणी अडवू शकणार नाही' असे म्हटले. टांगेवाल्याने ते ऐकताच तो चमकल्यासारखें टांग्याच्या पायदानावर एक पाय देऊन चटकन उभा राहिला नि दोरीधरल्या हातानेच सलाम करून मला म्हटले, 'माफ कीजिएगा, हुजूर ! कौन है आप ?' त्याची भीती घालविण्यासाठी मी हसऱ्या चेहऱ्यानेच त्याला 'चल, लवकर टांगा हाक. मला लालकिल्ल्यातील कोर्टामध्ये एका 'मुलजिम'च्या वतीने वकील म्हणून जायचे आहे. मला वेळेवर पोचले पाहिजे' म्हणून सांगितले. 'मुलजिम का वकील' या शब्दांनीच तो खडबडून जागा झाल्यासारखा दिसला. त्याने माझ्याकडे बघून, 'बडे बहादुर है आप' असे म्हणून दोरी धरलेला हात समोर उंचावून 'जुग जुग जीओ और फतह पाओ' असा 'आशीर्वाद'च दिला ! माझा चेहरा आनंदला नि त्यालाही जवळीक वाटली असावी माझ्याबद्दल. त्याने आपले मन मोकळे केल्याच्या स्वराने पुष्कळ सांगितले. त्याने दिल्लीच्या गल्ल्याबोळांतून काय परिस्थिती आहे, लोक काय बोलतात, रस्त्यावरचे जीवन कसे जगतात, रस्त्यातली वणवण फिरणारी मुलेसुद्धा कसे बोलतात वगैरे पुष्कळ सांगितले. तो तर हा 'कत्तलचा मुकदमा'च का चालवला असे रागावून विचारीत होता ! आणि 'खास जज्ज; नि लालकिल्ल्यात कोर्ट, असे का ? उघड्या न्यायकोर्टात मुकादमा चालवा म्हणावे. कोणी गवाह साक्ष देण्यासाठी येणार नाही. पोलिसांचा पहारा कोर्टाभोवती कशाला पाहिजे ?' असे विचारून त्याने एक वाक्य म्हटले, 'क्या पुलिसके पहरेमें कही इन्साफ मिलता है ?' अपराधसंबंधी व्यवहारन्यायशास्त्रातला मूलभूत सिद्धान्त त्याच्या स्वाभाविक उद्गारांतून किती उत्कट, किती प्रभावीपणे उमटला होता ! मी त्यावेळी 'अच्छा, अच्छा, जलदी टांगा बढाओजी !' असे म्हटले नि त्यानेही उत्साहाने 'बचके', 'बचके' म्हणत आपल्या घोड्याला पिटाळले होते.

त्या अशिक्षित टांगवाल्याने सांगितलेल्या मूलभूत सिद्धान्ताची उमज मला त्याच्या वाहनातून चांदणी चौक रस्त्याच्या लालकिल्ल्याच्या बाजूच्या सीमेवर उतरावे लागल्यापासूनच व्हायला लागली होती. माझे विचार मुगल सम्राट जहांगीरच्या मलिका-ए-मुल्क नूरजहां सम्राज्ञीच्या राजप्रासादाच्या प्रवेशद्वारासमोरचा सोनेरी साखळदंड ओढू पाहणाऱ्या व दाद मागणाऱ्या धोबिणीसारखेच होते. सत्ताधीशांचे न्यायपीठ तितकेच भव्य नि दाद मागणारा तितकाच क्षुद्र. पण तेथे तर एक गणवेशधारी पोलीस सबइन्स्पेक्टर पिस्तुलावर हात ठेवून उभा होता. त्याच्याबरोबर बंदूकधारी पाच शिपायांचे पथक उभे होते. त्या अधिकाऱ्याने माझ्यापुढे हात करून 'पास कुठे' असे विचारल्यासारखे बघितले. पण पुढे त्या सबइन्स्पेक्टर महाशयांनी मला कसे आत जाऊ दिले व पुढल्या वाटेवर सात चौक्यांवर सातदा ओळख पटवीत बंदूकधारी शिपायाच्या मदतीने मी कोर्टात कसा पोहोचू शकलो, याचे सविस्तर वर्णन मी या कहाणीच्या आरंभी दिलेच आहे. हे सबइन्स्पेक्टर महाशय श्री. बालकिसन दिल्ली पोलीस सेवा श्रेणीमधले खरोखरीचेच एक सौजन्यशील अधिकारी मला तेथे भेटले, हे माझे नि माझ्या पक्षकारांचे सौभाग्य! हे सौभाग्य मला राजसत्तेच्या सुरक्षिततेच्या धाबऱ्या आडंबरामुळे मिळाले असे नसून ते दोन मानवांच्या परस्पर सद्‌भावामुळे मिळाले होते.

अभियोगपर्वातल्या माझ्या दिल्ली येथील वास्तव्यात मला तेथील परिसरात घरांतून, रस्त्यांवर, दुकानांत, जलपान गृहांतून, निर्वासित वस्तीमध्ये, कार्यालयीन परिसरामध्ये, बसच्या प्रवासातून, रेल्वेच्या डब्यांमधूनही, घरगिरस्तीतले तसेच निर्वासितांमधले, छोटया व्यवसायिकांमधले तसेच शासकीय सेवेमधले, कर्मचारी वर्गातले तसेच अधिकारी वर्गातले, अन्नान्नदशेमधले नि सुखवस्तूही असे नि निरनिराळ्या स्तरांतले लोक निरनिराळ्या परिस्थितीत बघायला– बोलावयाला मिळत. या सर्व वेळी मला जाणवला होता तो, त्यांच्या साहानुभूतीच्या शब्दातला जसा प्रामाणिकपणा तसाच मते मागणाऱ्या राजकीय पक्षाची विचारसरणी सरसकट जनतेवर नीतिधर्म म्हणून लादू पाहणाऱ्या पक्षनिष्ठ शासकांविरुद्ध बोलून दाखवलेल्या असंतोषाचा आवेगही. त्यांच्या सहानुभूतीचे भाजन होण्याचे, महात्मा गांधी खून खटल्यातील अभियुक्तांना ती सहानुभूती अनुभवायला मिळायचे प्रसंग फार थोडे, पण ते अभियुक्तांच्या वकिलांना सर्व स्तरांतून सर्व ठिकाणी अनुभवायला यायचे. सामान्य पक्षनिरपेक्ष जनतेमधला असंतोष ठिकठिकाणी पाहायला मिळायचा. याउलट महात्मा गांधींच्या हत्येबद्दलच काय, पण या खूनखटल्यामधील अभियुक्तांच्या वकिलांबद्दल तिरस्कार दाखवणे, त्यांना अमंगळ समजून अस्पृश्य मानणेही अनुभवायला मिळायचे. परंतु जशी सहानुभूती दाखविणारी किंवा शासकांविरुद्ध असंतोष दाखविणारी मंडळी आम्हाशी निरपेक्षपणे वागत असे म्हणता येई, तसे या तिरस्कारी नि सोवळ्या मंडळींच्या निरपेक्षतेबद्दल किंवा निरुद्देशाबद्दल मला नेहमीच शंका वाटायची. माझ्या एका कुटुंबी बंधूमुळे माझे 'संबंधी' (हिंदी अर्थाने) झालेले एक गृहस्थ त्यावेळी दिल्लीला बड्या अधिकारावर असलेले यॉर्क प्लेसमध्ये राहत होते. त्यांच्याकडे जाण्याचा मला आकस्मिक कारणामुळे प्रसंग आला होता. त्यावेळी त्या गृहस्थांच्या 'त्रासिक' वागण्याचा मला जो अनुभव आला तो अजून माझ्या स्मरणात आहे. मला त्या 'त्रासिक'पणाचा सारा अर्थ तात्काळ उमगला नि मी पुन्हा त्यांच्याकडेच काय पण त्यानंतर माझ्या कितीतरी अन्य 'संबंधी गृहस्थांकडे कितीतरी वर्षे माझे 'तोंड दाखवले' नव्हते! आमच्याशी या विषयावर वाद घालणारे किंवा संयत शब्दांत आमच्या 'शहाणपणा'बद्दल किंवा 'औचित्या'बद्दल स्पष्टपणे शंका दाखविणारे नेहमीच भेटत, नि अशा लोकांशी बोलण्याची वेळ टाळणे हेच श्रेयस्कर असे मानण्याची माझी वृत्ती झाली होती–अजूनही आहे. येथे मला हेही कृतज्ञपणे सांगितले पाहिजे की, त्यावेळीही कॉंग्रेसी राजनीतीचे नि गांधीवादाचे सन्मान्य सिद्ध, पण मला माझ्या पोरवयापासून ओळखणारे असेही काही दिल्लीला तसेच ग्वाल्हेरला माझ्या निवासी येऊन मला उजागरीने भेटून गेले होते. हे सगळे सांगताना मला माझ्या मतां–दृष्टिकोनापेक्षा, माझ्याकडे बघणाऱ्या– माझ्याबद्दल मते बोलून दाखविणाऱ्यांच्या दृष्टिकोनाचे–मतांचे निर्मळ, निरपेक्ष, निरुद्देश पण अधिक महत्त्वाचे वाटते हे सांगणे नकोच.

दिनांक ९ जुलै १९४८ व १२ जुलै १९४८ या दिवशी लालकिल्ल्यातील कोर्टात तीस जानेवारी १९४८ च्या सायंघटनेबद्दलचे साक्षीदार येऊन आपापली साक्ष बोलून गेले होते. त्या दोन्ही दिवशींचे मला अजून चांगले स्मरण आहे. दिनांक ९ जुलैला अभियोग साक्षी क्रमांक ३१ अमरनाथ एस. आय. यांचे मुख्य परीक्षण संपले नि त्यावर नथूराम व त्याचे वकील श्री. ओक यांनी कूटपरीक्षण करण्याचे 'नाही' म्हटले नि तो साक्षीदार 'कूटपरीक्षण नाही'चा 'सत्यसाक्षीचा' अभिमान उराशी बाळगत कोर्टाबाहेर गेला! पण ते सर्व ऐकून-बघून साऱ्या कोर्टावरून जी एक प्रचंड लाट एकाएकी सर्वांना धडक मारून गेली होती ती मला चांगली आठवते. कित्येकजण पहिला धक्का ओसरताच प्रथम विस्मित होऊन पण लगेच सावरल्यासारखे नथूरामच्या धैर्याकडे सहानुभूतीने चिंब भिजून विस्फारल्या डोळ्यांनी बघत होते. 'महात्मा गांधींची हत्या मी केली' अशी स्पष्ट कबुली नथूराम देणार हे प्रथमच लोकांना तेथे कळले! तसेच नथूरामचे अटळ विधिलिखितही सगळ्यांना चटकन उमगले! त्यानंतरचे साक्षीदार क्रमांक ३२, ३४, ३५, ३६ नि ३७ हेही ९ जुलैला आपली साक्ष देऊन व 'कूटपरीक्षण नाही'चे बिरुद छातीवर दाखवीत कोर्टातून परत पाठविण्यात आले. या संदर्भातली एक विचित्र घटना साक्षीदार क्रमांक ३४ रतनसिंग याबद्दलची सांगतो. या साक्षीदाराने दिनांक २० जानेवारीच्या नि ३० जानेवारीच्या दोन्ही घटनांबद्दल 'आखों देखा हाल' अशी साक्ष दिली होती. या साक्षीदाराने तीस जानेवारी रोजी संध्याकाळी मी महात्माजींवर गोळ्या झाडल्या गेल्याचे पाहिले नि गोळ्या मारणाऱ्या माणसाला घटनास्थळीच पकडलेले पाहिले असे सांगितले होते. श्रीमान ॲडव्होकेट जनरल महोदयांनी या साक्षीदाराला तो गोळ्या झाडणाऱ्या व घटनास्थळीच पकडला गेलेल्या माणसाला तेथल्या अभियुक्तांमधून ओळखले का असा प्रश्न विचारला नव्हता! अशा वेळी सर्वसाधारण अनुभव असा की, स्वतः न्यायाधीश काही बोलत-विचारत नाहीत, अभियुक्ताचे वकील तर नाहीच. पण त्यावेळी जज्ज आत्मचरणजींनी आपण होऊन त्या साक्षीदाराचे कूटपरीक्षण संपताच, त्या साक्षीदाराला त्याला अभियुक्तांतले आपटे व नथूराम यांना बघून 'हत्यारा व घटनास्थळी पकडला गेलेला तो कोण' हे

ओळखून दाखविण्याबद्दल विचारले ! त्याबद्दल छापील पुस्तक क्रमांक १, पान ५३, ओळ ५३ ते ५७ वर लिहिले गेले ते असे : ' न्यायालयीन प्रश्न : टिप्पणी. साक्षीदार, नथूराम वि. गोडसे व नारायण द. आपटे यांकडे बोट दाखवितो आणि म्हणतो की, या दोघांपैकी एकजण ३० जानेवारी ४८ ला पकडला गेला होता. वास्तविक या दोघांमधला कोण प्रार्थना प्रांगणात पकडला गेला होता याची मला खात्री नाही. '

श्रीमान अॅडव्होकेट जनरलांनी साक्षीदाराला, मारेकऱ्याला ओळखून दाखविण्याबद्दल विचारले नसताना न्यायाधीशाने असा हस्तक्षेप करण्याचे औचित्य मला अजून कळले नाही.

कहाणीचे सूत्र सांभाळून सांगायचे ते हे की, ९ जुलै १९४८ नंतर लालकिल्ल्यातील अभियोगपर्वात तसेच सिमला येथील अपील-पर्वाच्या वेळीही अपराधाची कबुली देण्यात दिसलेल्या नथूरामच्या असंभ्रान्त धैर्याबद्दल नि ध्येयनिष्ठेमुळे त्याच्या चेहऱ्यावर दिसलेल्या निरागसतेबद्दल न्यायालयातल्या प्रेक्षक-श्रोत्यांनी काय नि न्यायालयीन कर्मचारी व्यक्तींनी काय आपली सहानुभूती व विस्मयही बोलून दाखविण्यात मुळीच अनमान केला नव्हता.

नथूरामबद्दलच्या अशा प्रतिक्रियांचा अनुभव अगदी अकल्पनीय जागी अनाहूतपणे मिळत असे. डिसेंबर १९४८ च्या पहिल्या आठवड्यात माझ्याकडे आलेल्या एका वयस्क नातेवाईक आईंना मला दिल्लीहून पूर्व बिहारमधल्या एका गावी पाठवायचे होते. त्या एकट्याच जाणार होत्या व चोवीस तासांपेक्षा जास्तीचा प्रवास होता. पण गाडी न बदलता जायचे होते. त्यांना जुन्या दिल्ली स्टेशन-वरून दुपारच्या एक्सप्रेसने त्या वेळच्या इंटरवर्गाचे तिकीट काढून देऊन पुरुषांच्या डब्यातच बसवून दिले. स्टेशनवर त्याच डब्यातून जाणारे एक सभ्य बंगाली गृहस्थ बघून त्यांना माझ्या ' मातोश्री 'कडे लक्ष ठेवण्यास मी विनविले व ते त्यांनी सहर्ष स्वीकार केले होते. स्टेशनवर बराच वेळ मी त्यांची व्यवस्था बघायला होतो. गाडी गेल्यावर घरी आलो, पण त्या सुखेनैव आपल्या मुक्कामाला पोचल्याचे कळण्याची वाट पाहत होतो. तीन दिवसांतच तारेने ते कळून नंतर त्यांचे सविस्तर पत्र आले. त्याचा थोडक्यात सारांश असा की, त्यांच्याबरोबर जात असलेल्या बंगाली गृहस्थांनी माताजींची यथायोग्य विचारपूस केलीच. पण त्यांच्याबरोबर जाणारे त्याच डब्यात पूर्व बिहारकडचे तीन तरुण होते. त्यांतला एक तिकडचाच ' जेलर 'च्या पदावर काम करणारा होता. त्या तिघा तरुणांनीही माताजींशी बोलण्यात ' आपण एकट्याच जात आहोत, आपल्याला एकट्याच जाऊ देणारे, आपल्याला पोचवायला आलेले ' ते ' कोण होते, दिल्लीला काय करतात, ' म्हणून त्यांच्याजवळ चौकशी केली. माताजींनी त्यांच्या ' त्या ' मुलाबद्दल सांगताच, त्या तिघा तरुणांनी माताजींना आपलीच मानून डोक्यावर घ्यायचेच बाकी ठेवले होते ! नथूराम आणि मंडळींबद्दल जे काही विचारणे शक्य होते ते विचारून ' उनके वकील बहादुर हैं, आप भी तो कुछ कम बहादुर नहीं हो, ' म्हणून त्यांची सर्व प्रकारे सेवापूजा केली ! ' माताजींनी ' मला पत्राने हे सर्व कळवले होते व पुढे पुन्हा भेटल्यावर प्रत्यक्ष ही सर्व ' मजा ' सांगितली होती. माझ्यासारख्या ' अमंगल, अस्पृश्य, असाहाय्य ' वकिलाने ही आठवण अजूनही जपून ठेवली याचे कुणाला नवल वाटेल ?

मी जर येथे लिहिले की, मला त्या वेळी भेटलेल्या कुणाही व्यक्तीने, नथूरामने केलेल्या अघोरी कृत्याबद्दल, आपली ' पूरी असहमती ' दाखविणाऱ्या व्यक्तींनीही, स्वतः नथूरामबद्दल एकही कटुकर्कश, अभद्र शब्द किंवा विचार बोलून दाखविला नव्हता, तर ते निव्वळ सत्य होते असे समजावे. त्या लोकांची ही साहानुभूती, हे भद्र मत त्यांना मिळालेल्या वर्तमानपत्री माहितीवरच आधारलेले होते. त्या लोकांना नथूरामला कोर्टात प्रत्यक्ष बघायला मिळते, नथूरामचे कोर्टातले वागणे, बोलणे ऐकायला मिळते, त्याचे कोर्टातले लेखी निवेदन वाचायला मिळते, तर काय झाले असते याची मला कल्पनाच करवत नाही.

लालकिल्ल्यातील न्यायालयात प्रेक्षक-श्रोते नेहमीच येत. काही येत ते अभियुक्तांना बघायला, काही केवळ नथूराम किंवा श्री. सावरकर किंवा दोघांनाही बघण्याकरताच येत, काही लोक रोज वर्तमानपत्रात येणाऱ्या कोर्टकामकाजाच्या वर्णनाने अधिक कुतूहल वाटून ते कामकाज स्वतः बघायला व ऐकायला येत. मधूनमधून बाहेरगावचेही लोक येत. काही लालकिल्ल्यातील ऐतिहासिक जागा पाहण्यास आलेले लालकिल्ल्यातील कोर्टातही ऐतिहासिक असे पाहण्यासाठी येत असे म्हणावयाचे. मला आश्चर्य वाटायचे ते याचे की, दिल्ली येथील किंवा बाहेरचे दिल्लीला येणारे असे कोणीही वकील कोर्टात कधी दिसत नसत. याला लक्षणीय अपवाद मद्रास हायकोर्टाच्या एका अॅडव्होकेट महोदयांचा. ते दिल्लीला काही कामाकरता आलेले प्रौढ वयाचे गृहस्थ. ते स्वातंत्र्यवीर सावरकरांचे दर्शन घ्यायला म्हणून लालकिल्ल्यातल्या कोर्टात आले. अंगात काळा कोट, त्यावर श्वेतबंद बांधलेले, डोक्यावर जरीकाठाचा रुमाल मद्रासी तऱ्हेने बांधलेला, अंगावर काळा झगा असे आले नि कोर्टात शिरताना पायांतले दाराशी काढून ठेवून अनवाणी आत आले व आम्हा वकीलमंडळींत बसले. विश्रांती-मध्यांतर होऊन कोर्ट उठून जाताच या गृहस्थांनी काय केले असावे ? ते उठले नि सरळ स्वातंत्र्यवीरांच्या समोर जाऊन अंगावरच्या झग्यासहित फरशीवर त्यांनी साष्टांग नमस्कार घालत जमिनीवर रुमाल त्यालेले डोके टेकले ! माझा आश्चर्याने झालेला ' आ ' किती वेळ तरी मिटला नाही ! उठून उभे राहून, मग सावरकरांशी मध्यान्तरात बराच वेळ बोलून व रीतसर अभिवादन करून, दर्शनाने पुनीत झालेल्या चेहऱ्याने ते परत गेले. लालकिल्ल्यातील भर कोर्टात अभियुक्ताला न्यायालयीन गणवेषात साष्टांग दंडवत घालणारा उच्च न्यायालयाचा दीक्षित अभिवक्ता ! असले स्वप्नातही पाहायला न मिळणारे दृश्य आम्ही लालकिल्ल्यात प्रत्यक्ष पाहिले !

ग्वाल्हेरहूनही एक बडी व्यक्ती एके दिवशी कोर्टात येउन गेली. ती व्यक्ती होती ग्वाल्हेरच्या त्या दिवसांतल्या कॉंग्रेसपक्षाचे एक नेते. ते सरळ कोर्टात येऊन मला सर्वांसमोर-पोलीस अधिकाऱ्यांसमोरही

**....त्या व्यक्तीने कोर्टात स्वातंत्र्यवीरांच्या समोर साष्टांग नमस्कार घातला.**

भेटले. एवढेच नव्हे तर त्यांनी सर्वांना कोर्टात सांगितले की, ' मैं अपने वकीलसाहबको मिलने यहाँ आया हूँ। इन वकीलसाहबने मुझे और मेरे सब साथियोंको एक मानहानी के जुर्मसे बचाया है। ' त्यांच्या त्या वकीलबरवानी उत्साहाला आवर घालणे मला काही वेळ कठीण होऊन गेले होते.

ज्या दोन दिवशी १५ व १६ डिसेंबरला नथूरामने लालकिल्ल्यातील कोर्टात बचावाचे तर्कनिवेदन केले त्या दोन्ही दिवशी कोर्टाचा दिवाणखाना प्रेक्षकश्रोत्यांनी पूर्ण भरून गेला होता. पोलिसांचे अधिकारी शिपायी, कोर्ट कार्यालयामधले कर्मचारी दाराशी दाटीवाटीने उभे होते. त्या सगळ्या श्रोतृवृन्दातले पुष्कळसे नथूरामच्या निर्भीक नि गंभीर व्यक्तित्वाने भारून गेले होते, नथूरामच्या धैर्यशील उत्तुंगतेने स्तिमित झाले होते, नथूरामचे मुद्देसूद तर्कनिवेदन ऐकून त्यांचा भ्रमनिरास झालेला वाटत होता, त्याच्या मातृभूमीच्या अथांग प्रेमाने त्यांचे डोळे ओलावले होते. ते निःसंकोचपणे आपल्या भावना-प्रतिक्रिया एकमेकांशी बोलत होते, आम्हालाही बोलून दाखवत होते.

नथूरामच्या सान्निध्यात आलेल्या प्रत्येकावर नथूरामच्या व्यक्तित्वाचा काही ना काही परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. त्याने आपल्या निरागस व्यक्तित्वाने बंदीगृहासारख्या जागी रात्रंदिवस वावरणाऱ्या अधिकारी-कर्मचारी वर्गाची मनेही जिंकली होती. दीर्घ मुदतीच्या शिक्षेमध्ये बंदीगृहातले रक्षक झालेल्यांची पाषाणी मनेसुद्धा पाझरविली होती. अभियोगपर्वाच्या दिवसांत तीन बंदीगृहातून नथूरामला मी भेटलो. त्यांतले पहिले लालकिल्ल्यातील ' विशेष बंदीगृह. ' येथे सुरुवातीस बंदीगृह अधिकारी म्हणून एक रशियन गृहस्थ मिस्टर मास्कोव्हिच नावाचे होते. त्यांनी आमचे स्वागत न चुकता हसतमुखाने करावे. लवकरच माझे बंदीगृहात जाणे म्हणजे नथूरामला भेटण्यासाठीच असे व्हायला लागले, नि त्यावेळी या मास्कोव्हिच महोदयांनी नथूरामशी माझे बोलणे किती वेळ चालावे याबद्दल कधीच पर्वा करू नये. आम्ही कशासंबंधी बोलत आहोत याकडे लक्ष देऊ नये. ते नथूरामविषयी विशेष अगत्य दाखवून वागायचे असे मला कळले. सर्व अभियुक्त मंडळी या मास्कोव्हिच महोदयांशी सक्षम खेळीमेळीने बोलत नि त्यांच्या पाठीमागे त्यांच्याबद्दल फार आपलेपणा दाखवून बोलत नि त्यांनी दिलेल्या सवलतींचा लाडावलेल्या मुलांसारखा उपयोग करीत. या मास्कोव्हिच महोदयांची लवकरच लालकिल्ल्यातून एकाएकी बदली करण्यात आली. त्याचे कारण काय ते काही कळले नाही. मास्कोव्हिच यांच्या जागी एक श्री. भगतराम नावाचे अधिकारी आले. ते जरा निराळ्या वृत्तीचे, नियमांच्या पालनाकडे विशेष लक्ष पुरविणारे. पण काटेकोरपद्धत त्यांचीही नसे. सिमला येथील बंदीगृहाविषयी मी पूर्वी सांगितले आहेच की तेथे नथूरामचे कसे आतिथ्य झाले. स्वतः नथूरामने सहा जून १९४९ रोजी मला सांगितलेला सिमल्याचा स्वर्ग मुख्यतः तेथले बंदीगृहच होते, हे वाचकांच्या लक्षात आलेच असेल. त्याचवेळी नथूरामने उल्लेखिलेल्या ' अंबाल्याच्या मृत्युलोकात 'चा अर्थ अंबाला बंदीगृहातील फाशीची शिक्षा झालेल्यांनी फाशीच्या दिवसाची वाट पाहत राहावयाच्या दगडी भिंतींच्या-विना वातायनांच्या कोष्ठांविषयींचा होता. तेथल्या अधिकारी, कर्मचारी किंवा दीर्घदंडित रक्षकांबद्दलच्या अभिप्रायाचा मुदलीच नव्हता, हे मी तेथे दिनांक २७ एप्रिल १९४९ रोजी सकाळी घालविलेल्या चार तासांच्या अनुभवावरून ठामपणे सांगू शकतो. याला समर्थन म्हणून मला आणखीही हवाले देता येतील, पण ते माझ्या प्रत्यक्ष अनुभवातले नाहीत. तरी त्यातला एक हवाला शहाजोग हुण्डीसारखा कितीकांच्या रुजवातीवर आधारित म्हणून येथे सांगतो. मला स्वतःला त्याच्या शहाजोगपणाविषयी जरासुद्धा शंका नाही. अंबाला येथील बंदीगृहाचे सर्वच अधिकारी, कर्मचारी, रक्षक नथूरामशी फारच मायेने वागले होते. बंदीगृहविषयक नियमावली मधला नियम तर दूरच राहो, स्वल्पविराम देखील त्या शासकीय सेवकांच्या नथूरामविषयीच्या सहृदयतेला अडसर घालू शकला नव्हता, नियमांचा अघळपघळ अर्थ लावण्याला पूर्णविराम देऊ शकला नव्हता. दिनांक १४ नोव्हेंबर १९४९ रोजी मृत्यूलोकाच्या सीमेवर पोचलेल्या मानवांना निरोप देण्यासाठी म्हणून बरीचशी मंडळी अंबाला येथील बंदीगृहात गेली होती. त्यांमध्ये नातेवाईक तर होतेच, पण आस्थेवाईकही होते. हे सगळेजण गटागटाने ज्यांच्या जीवनातले आठ प्रहरसुद्धा पूर्णपणे उरले नव्हते, त्या जीवांना निरोप द्यायला गेले होते. कुणी फुले घेऊन गेले होते, कुणी मिठाईसुद्धा ! त्या दिवशी रक्षकमंडळींचे बांध मोडकळले होते, अधिकारी मंडळी जड पावलांनी वावरत होती. तरी आगतुकांनी नि संचालकांनी ही निरवानिरव ज्या नीरवतेत आणि निर्मळ औचित्याने पार पाडली त्याचे सर्वस्वी सर्वांगीण श्रेय त्या निरोप घेणाऱ्याच्या धीरगंभीरतेला होते, यात काहीच संशय नाही.

लालकिल्ल्यातील कोर्टाभोवतीचे काटेरी कुंपण कितीही बोचरे असो, कुत्रे माणसाला चावले याऐवजी माणूस कुत्र्याला चावला या वजनाने तोलंलेली कोर्टातली काही बातमी वर्तमानपत्रे चविष्टपणे छापीत व त्यामुळे आम्हा बचावपक्षाच्या वकिलांनाही प्रसिद्धी मिळायची. काही काही साक्षीदारांचे कूटपरीक्षणही पुष्कळच सविस्तरपणे प्रश्नोत्तरासहित छापले जायचे. नि कूटपरीक्षण करणाऱ्या वकिलालाही प्रसिद्धी मिळायची. यासंबंधातल्या एक दोन गोष्टी सांगतो. प्रवासामध्ये प्रवाश्यांपैकी काही चौकस प्रवाशांना त्यांच्या शेजारच्या प्रवाशाचे नाव कळून त्यांचा चौकशीपणा अधिक उफाळायचा नि ' काय हो, वर्तमानपत्रात त्या लालकिल्ल्यातल्या वकील इनामदारांचे नाव पुष्कळदा आले आहे, त्यांचे आपण कोण ?' या प्रश्नाला तोंड देणे मला भाग पडायचे. ' महात्म्यांचेही वर्म कीर्ती ' या सुभाषिताला माझाही आत्मा बळी पडे नि माझ्या तोंडून खरे उत्तरही बाहेर पडे, आणि मग माझ्यावर चौकशी-प्रश्नांची बरसात होई नि मला तोंड चुकवणे कठीण होई. कधी रात्रीची प्रवासातली झोपही दुर्मिळ व्हायची. लालकिल्ल्यातले सारे अभियोगपर्व संपल्यावरच ग्वाल्हेरहून महाराष्ट्रात व दिल्ली, पाटना, लखनौ, कलकत्ता वगैरेंसारख्या लांब प्रवासातही हा भोग भोगावा लागे. दोन्ही अर्थाने. अशा अनामिकांनी ओवाळलेल्या आरत्यांना व दाखवलेल्या नैवेद्यांचा भोग स्वीकारणे मला टाळता येत नसे. या अस्तिपक्षाला नास्तिपक्षही आहेच. आणि तोही येथे सांगतो. या लालकिल्ल्यातील महात्मा गांधी खून खटल्यातील बचावपक्षाचा वकील म्हणून माझ्या नावाभोवती फेकलेल्या प्रकाशांच्या प्रखरतेची झळ दुसऱ्या कोणाला लागू नये, माझ्या नावाला चिकटू पाहणाऱ्या शेणाचा डाग इतरांना लागू नये याकडेही मला लक्ष देणे भाग झाले होते. स्वतंत्र भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात चातुर्वर्ण्याश्रम व्यवस्थेच्या ऐवजी राजकारणातले जातिभेद अधिक विषक्त होऊ पाहत आहेत. ही सगळी झळ नि या सगळ्या शेणमारीचा खेळ खेळणाऱ्या होळीकरांच्या उन्मादात सुक्याबरोबर ओले जळावे, अधूताच्या संसर्गाने धूतही विटाळावे हे क्रमप्राप्त होते. हे सगळे टाळण्याचाही मला प्रयत्न करावा लागे. ही झळ नि या शेणफेकीने माझ्या आप्तपरिचितांचे नुकसान होऊ नये या विषयीही मला जागरूक राहावे लागे. या माझ्या प्रयत्नात माझ्या खादी

वेशाचा मला मुखवटयासारखा उपयोग करता येई व तो मी करीत असे. केवळ या विचाराने की, माझा खादी वेश हा माझा मुखवटा नाही–स्वातंत्र्योत्तर काळातली कॉंग्रेसी शासकांच्या खादी छाप रमण्यांमध्ये आपलीही दक्षिणा पुरेपूर वसूल करून घेण्याची ही आपली ओळखचिठ्ठी नाही. हा माझा मीच लहानपणीच घेतलेला वसा आहे. याचा मी दोष का मानावा ? व हा वसा का टाकावा ?

माझ्या वकिलीव्यवसाय चरितामध्ये माझ्या एका अव्वल वकील-मित्राने मला एक मजेदार प्रशस्तिपत्र आणून दिले होते. हे मित्र उत्तरप्रदेशातल्या एका युनिव्हर्सिटीचे एल. एल. एम. पदवी विभूषित वकील. त्यांना म्हणे, त्यांच्या युनिव्हर्सिटी प्रोफेसर महाशयांनी अपराध व्यवहारन्यायशास्त्राचे सिद्धान्त लालकिल्ल्यातल्या अभियोग-पर्वात मी केलेल्या कूटपरीक्षणाचे वर्तमानपत्रांतले उतारे घेऊन शिकवावे ! आज माझे हे दोघेही कदरखान आपापल्या व्यवसाय-चरितात मानाचे स्थान विभूषित करीत आहेत हे मी माझेच सौभाग्य समजतो.

लालकिल्ल्यातील महात्मा गांधी हत्त्या अभियोगाशी झालेल्या माझ्यासंबंधाने मला सुप्रसिद्धी अथवा कुप्रसिद्धी ग्वाल्हेरच्या परिसरात तरी बरीच मिळाली होती. त्याचेच एक अनिवार्य फलित असे निघाले की, भारतीय लोकराज्याच्या संविधानानुसार भारतात पहिल्यावहिल्या प्रौढ मतदारसंघांच्या आधारावर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या १९५१–५२ च्या हिवाळी सत्रात मी ग्वाल्हेरच्या उत्तरपूर्व मतदारसंघातून 'ब' वर्गी मध्यभारत राज्याच्या विधान-सभेच्या ९९ सदस्यांपैकी एका सदस्य निवडणुकीला उभे राहावे असा प्रस्ताव माझ्यापुढे माझ्या इष्टमित्रांनी ठेवला. मी पुष्कळ विचारान्ती व शेवटी या निवडणुकीतले यश माझे लांच्छन, लांच्छन न राहून तेच भूषण होते म्हणून सांगावयाची संधी आहे म्हणून मी प्रस्ताव स्वीकारला. ज्या मताधिक्याच्या आधारावर माझ्या पक्षकारांनी सत्तेचा वाटा मागून आपले सर्वस्व गमावण्याची वेळ आणली होती त्याच मताधिक्याचा अधिकार त्यांचे वकील म्हणून आपण सिद्ध करून दाखवावा अशी जिद्द माझ्यामध्ये बळावून मी निवडणुकीला उभे राहायचे ठरविले. हिंदुसभेचा सदस्य न होता केवळ हिंदुसभेच्या समर्थित तिकिटावर 'घोडा व सवार' हे निवडणूक चिन्ह वापरून मी निवडणूक लढवावी हे ठरले. पण माझे नामांकन स्वीकार होताच प्रतिपक्षातर्फे कोणकोणते अतिरथी-महारथी निवडणूक कुरुक्षेत्रावर माझ्यासमोर उभे राहिले आहेत, हे दिसताच 'सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति' असेच म्हणण्याची मजवर वेळ आली. वकील व्यवसा-यातले ज्येष्ठ सहयोगी पण पुढे जज्ज,हायकोर्ट जज्ज राहून कॉंग्रेस पक्षा-तर्फे त्यावेळीही न्यायमंत्री असलेले वृद्ध नेते, माझ्या निर्वाचन क्षेत्रातील बिर्ला मिल मजदूरवर्गाचे सन्मान्य नेते, जनसंघ, आर. एस. एस. चे विद्यार्थी नेते व इतर तीन ज्ञाती पुढारी असे भीष्मापासून शल्यापर्यंत सर्व गणगोती माझ्याविरुद्ध आपापल्या अक्षौहिणी सज्ज करून कुरु-क्षेत्रावर आले होते. नावाने राजप्रमुख पण परिस्थितीने गलित (अधिकार) गात्र झालेले ग्वाल्हेरचे महाराज माझ्याच क्षेत्रात असलेल्या जयविलास राजवाड्यात महाराणी नि विदुर संजयासहित आपल्या कॉंग्रेसी पुत्रांवर विसंबून माझे मतदार म्हणून होते. आणि मी ? नावाने इनामदार पण पैशाने नादार, 'घोडा और सवार'चा कपिध्वज घेऊन, 'न धरी शस्त्र करी मी गोष्टी सांगेन युक्तिच्या चार' म्हणून घरी बसलेले माझे पक्षकार डॉ. परचुरे यांच्या पाठ-बळावर माझ्या मतदारसंघाच्या गल्याबोळांतून खादीच्या कपड्यांत पायपीट करून सकाळ-संध्याकाळ फिरत असे. माझ्या इष्टमित्रांनी रोज म्हणावे, 'अहो, तुमचे ढोल नगारे, भेरी कुठे आहेत. तुमचा पांचजन्य ऐकूसुद्धा येत नाही. हे काय ? त्या पाहा, कॉंग्रेसी कुरु-पुत्रांच्या ढोल-नगाऱ्यांच्या भेटी कशा वाजत आहेत ? त्यांचे शंख-ध्वनी पाहा काय म्हणत आहेत, 'गांधीजी, बापूजी, महात्माजी के हत्यारे के वकील को व्होट मत दो.' कुरुकुलाचाच खादीधारी मी एकाही सभेच्या फडावर न जाता गरीबगुरिबांच्या घरांतून 'मताची याचना' करीत हिंडत असे. नि विश्वास ठेवा अगर ठेवू नका, पण मला त्यावेळी ग्वाल्हेरच्या गल्लीबोळांतून असे काही मतदार भेटले की, त्यांनी म्हणावे की, 'जे बापूजी महात्मा कौन, कब गये ?' या गरीब मतदारांना 'हमारे डॉक्टरसाहबको आपने बचाया, ग्वालिअर का नाम रखा' यांचे समाधान वाटत होते नि त्या दिवसांत 'पैशाच्या किंवा सत्तेच्या बळावर 'हाकलेली मेंढरे' बनण्याचे भाग्य न लाभ-लेले ते गरीब मतदार आपल्या मताधिकाराचा पहिलाच उपयोग करण्याच्या उत्साहात होते. तरी पण माझे आत्मशंकी मन सर्व तऱ्हेने संकोचून स्वतःलाच म्हणे की, 'कशाला या भानगडीत पडलास ? नको तेथे धडपडण्याचा स्वभावच तुझा. भोग त्याची फळे !' मी माझ्या सत्यसंकल्पाची ग्वाही देत माझ्या दात्या भगवानाची आळवणी करीत धडपड करण्याचे चालूच ठेवले. मते पडून मतगणनेचा दिवस उजाडेपर्यंतच काय पण मतांच्या दोन-चार पेट्या उघडल्या तरीही, माझ्या छातीतली धडधड थांबली नव्हती ! सत्यसंकल्पानेच मला जिवंत ठेवले त्यावेळी ! पण भगवान दात्यांनी मला काय नि किती दिले म्हणून सांगू ? माझ्या नियतीचे सप्तसहस्र अदृश्य हात मत-फुलांच्या ओंजळी पेट्या माझ्यावर रित्या करीत असल्याचे दृश्य मी पाहिले ! माझ्या आयुष्यातले ते सुवर्णकण क्षण मी कसे विसरू ? माझे दयाळू पारखी कोण होते म्हणून सांगू ? ग्वाल्हेरच्या गरीब चप्रासी, खल्लासी, कारकून, कर्मचारी, पिता, बंधू, माता, भगिनी मतदारांनी माझे नाव राखले नि मला, एका वकिलाला, कॉंग्रेसी विधिमंत्रिमहोदयांच्यापेक्षा दीड हजारांपेक्षा अधिक मतांनी व बाकी विरोधकांच्या जमानती जप्त करीत विजयी निवडून दिले होते ! त्यांचा विजयी वीर एक चप्रासी, एक कारकून, एक पक्षकार यांची मिरवणूक मिरवीत मतमोजणी केंद्रापासून माझ्या घरापर्यंतचा चार मैलांचा विजयपथ पायी चालत घरी आला होता ! त्या मिरवणुकी-तले एकच पुण्यस्मरण मला आहे. परत येताना वाटेवर डॉ. परचुरे यांच्या घरी त्यांच्या वृद्ध मातेला त्यांच्या मुलाच्या वकिलाने वाकून नमस्कार केल्यावर भरल्या डोळ्यांनी आशीर्वाद देऊन थरथरत्या हातांनी त्या मातेने वकिलाचे तोंड गोड केले होते !

माझ्या वकिली व्रतामधील एका वश्याचे असे मंगल उद्यापन मला करता आले याचे मला आत्मसाधान आहे.

पण याची दुसरी बाजू अशी की, मी हिंदुसभेचा सभासद झालो नव्हतो याचा राग धरून जेव्हा तेव्हा ग्वाल्हेरच्या हिंदुसभाई नेत्यांनी 'हमारी हिंदुसभाने वकीलसाहबको यह तोफा दिया है,' असे म्हणावे. अर्थात येथे हेही कृतज्ञपणे नमूद करतो की, त्यावेळचे हिंदु-महासभेचे निर्वाचन संचालक सचिव श्री. विष्णू घनश्याम देशपांडे यांनी मला अभिनंदन पत्र पाठवून माझे कौतुक केले नि लिहिले होते की, 'आजवर हिंदुसभाई इच्छुकांच्या निर्वाचन पराजयाच्या वार्ता वर्षानुवर्षे ऐकून किटलेल्या कानांनी तुमच्या घोडा आणि सवारच्या विजयाची बातमी पहिल्यांदाच ऐकली आहे !'

[ क्रमशः ]

क्रीडांगण

श्रीकांत जपे

# हायर–फास्टर–बेटर

## सर्वोत्कृष्ट खेळाडू संघ–जिंकू दे– ऑलिंपिकची ज्योत तितकीच प्रज्वलित राहू दे !

१७ जुलै १९७६ ! ज्या दिवसाची जगातले सर्व क्रीडाप्रेमी चातकासारखी वाट पाहतायत, तो आजचा हा दिवस. आजपासून पंधरा दिवस जगातल्या कानाकोपऱ्यांतून आलेले नऊ हजार दोनशे सर्वोत्तम तरुण व तरुणी आपल्या तनमनधनाची बाजी लावणार. आजपासून मॉन्ट्रीयलला एकविसाव्या ऑलिंपिक स्पर्धा सुरू झाल्या. 'फॉर द एनहॅन्स्मेंट ऑफ फ्रॅटरनिटी अँड पीस !' होय, ऑलिंपिक ज्योत त्या तत्त्वाची साक्ष देतेय. किंबहुना इतकं घाणेरडे राजकारण अमेरिका व इतर भांडवलशाही राष्ट्रे खेळून-सुद्धा शेवटी ही स्पर्धा सुरू झालीय.

खरं आजच्या या शुभदिनी गलिच्छ राजकारणाची आठवणदेखील नको. कुठंतरी खदखदलं म्हणून निव्वळ एक उल्लेख केला.

आज सतरा जुलैला मार्चपास्ट झालाय. उद्या म्हणजे रविवार दिनांक अठरा जुलैपासून सारी मैदाने गाजू लागतील.

त्या निमित्ताने, अनेक माहीतगार, व अडाण्यांच्या मनात अनेक सवाल उभे असतील. माफ करा मंडळी, आमच्या 'मऱ्हाठी' मुलखातल्या माणसांना इंग्रज साहेबाच्या क्रिकेटखेरीज इतर फारसे काहीच समजत नाही, समजावून घ्यावयाची इच्छाही नसते. जेसी ओवेन्स, हॅरिसन डिलार्ड, डॉक्टर रॉजर बॅनिस्टर ह्या जुन्या महारथींची वात सोडाच; परंतु अमेरिकेचे स्टीव्ह विल्यम्स्, रेगी जोन्स आणि क्यूबाचा सिल्व्हियो लिओनार्द मॉन्ट्रीयलच्या त्या सुंदर ट्रॅकवर १०० मीटर्सचे अंतर ९·९ सेकंदांपेक्षा कमी वेळात तोडण्यासाठी जीवाची बाजी लावणार आहेत, याची तरी कितीशा लोकांना कल्पना आहे ?

म्हणूनच या साऱ्या मंडळींना या सर्वोत्कृष्ट पंधरवडयाची थोडीशी कल्पना देण्याचा हा खटाटोप आहे. तसेच त्याच निमित्ताने क्रीडारसिक सहकाऱ्यांशी हितगुजही साधतो.

### प्रथम हॉकी

'हॉकी संघटनेचे अध्यक्ष रामस्वामींच्या मते ५० टक्के चान्सेस !' अगदी डिप्लोमॅटिक–आन्सर. बिझिनेसवाला आहे ना तो.

पण मी पडलो क्रीडासमीक्षक. तेव्हा असे अंदाज करण्याचा मूर्खपणा मी तरी करणार नाही. केवळ काही मुख्य संघाच्या तुलनेत आपण कोठे बसतो, त्याचाच विचार करणार.

तेव्हा प्रथम पाकिस्तानी संघाकडे लक्ष– माझ्या अंदाजे लाईन-अप–सलिम शेरवानी (गोलकीपर), मंझूर अलहसन (राईट बॅक), मुन्नव्वर जमान (लेफ्ट बॅक), ललिम नाझीम (राईट हाफ), अख्तर रसूल (सेंटर हाफ), इफ्तिकार (लेफ्ट हाफ), इस्लाउद्दीन (राईट विंगर), मंझूर ज्युनिअर (राईट-इन्साईड), रशिद (सेंटर फॉरवर्ड), शहेनाज (लेफ्ट-इन्साईड) व समीउल्ला (लेफ्ट-विंगर). शेरवानी अनुभवी असला तरी, उत्कृष्ट गोलकीपर्समध्ये त्याची गणना करणे कठीण. त्यामुळे दोन्ही बॅकसवर भरपूर बर्डन पडण्याची खूप शक्यता आहे. पैकी मुनव्वरचा खळ पाहता, त्याला रिकव्हरी कमी आहे हे मान्य करावे लागते. मंझूर मात्र सर्व बाबतीत चांगला बॅक आहे.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे दोन्हीही बॅकस् शॉर्टकॉर्नर्स घेण्यात पटाईत आहेत.

हाफ लाईनमध्ये रसूल सोडला तर, नाझीम व इफ्तिकार हे तितके चांगले स्कीमर्स वाटत नाहीत. नाझीमचा खेळ अनाकर्षकही वाटतो. परंतु पाकिस्तानची डावी डिफेन्स फळी तितकी मजबूत वाटत नाही.

या संघातला प्लस-पॉईन्ट म्हणजे त्यांचे फॉरवर्डस. 'इस्ला, समी, रशिद व शहेनाज' या चारांच्या इतके तुफानी फॉरवर्डस् आज जगात दुसऱ्या कोणत्याही संघात नाहीत. पाकची फॉरवर्ड लाईन एकत्रित राहून चाली रचते. त्यांना जर रिदम् सापडला, तर कोणत्याही संघास 'छठीके दूधकी ही याद' यायला हवी. फक्त मंझूर ज्युनियर हाच काय तो मिस्‌फिट वाटतो. तो फास्ट आहे, पण स्कीमिंगमध्ये कमी पडतो. राईट इन्साईडचे तेच तर मुख्य काम असते.

'पश्चिम जर्मनी, हॉलंड' हे दोन संघ नंतर विचारात घ्यावे लागतात. रॉथ, क्रूझसारखे रथीमहारथीही त्यांच्याकडे आहेत. विशेषतः प्री–ऑलिम्पिक स्पर्धांत जर्मनीने पाकचा केलेला पराभव फारच बोचरा आहे. कारण जर स्कील व खेळाच्या दर्जाचा विचार केला तर पश्चिम जर्मनी व हॉलंड हे दोन्हीच काय पण इतर युरोपीय संघ भारत–पाकच्या तुलनेत कमीच वाटतात.

परंतु कृत्रिम हिरवळीवर खेळायचा त्यांना भरपूर सराव आहेच. शिवाय या सरफेसवर दांडगाईचा खेळ– मारझोड हॉकी– खेळण्यासही भरपूर वाव आहे.

त्याचप्रमाणे 'पेनल्टी–स्ट्रोक' बद्दल करण्याबाबतचे नवे नियम आणि 'आर्टिफिशियल टर्फ'मुळे भारतीय व पाकिस्तानी खेळाडूंच्या घोटयावर येणारा ताणही युरोपीय पद्धतीची हॉकी खेळणाऱ्या संघांना उपयुक्त ठरावा.

इतर संघांच्या बलाबलाचा विचार केल्यावर भारतीय संघाच्या गुण–दोषांचे अवलोकन. सर्वप्रथम या लेखात तरी मी गोविंदा अनफिट आहे असे ग्राह्य धरून, भारताचा लाईन–अप अपेक्षितो.

गोली– अशोक दिवाण, राईट बॅक– आस्लम शेरखान, लेफ्ट बॅक– सुरजितसिंग, राईट हाफ– विरींदर, सेंटर हाफ– अजित पालसिंग, लेफ्ट हाफ– मोहिंदरसिंग,

राईट विंगर– फिलीप्स्, राईट इन्साईड– अशोककुमार, सेंटर फॉरवर्ड– अजितसिंग, लेफ्ट इन्साईड– चांदसिंग व लेफ्ट विंगर• हरचरणसिंग– राखीव–चेत्री व बलदेवसिंग.

अशोक दिवाणची अवस्था शेरवानीप्रमाणेच आहे. त्याच्यात धाडस भरपूर आहे. फक्त तितकेसे कौशल्य नाही. वास्तविक पाहता ख्रिस्तवासी फान्सिसनंतर खऱ्या अर्थाने दर्जेदार गोली भारतास लाभलेलाच नाही. अगदी शंकर लक्ष्मणही त्या रांगेत बसत नाही. तेव्हा भारतीय संघातले हे मोठे वैगुण्य.

सर्वांत चांगली गोष्ट म्हणजे भारतीय संघाचे बॅकस् व हाफ–लाईन. फक्त इथे दोनच गोष्टी किंचित खटकतात. मायकेल किंडोचा उपयोग, त्याची रिकव्हरी लक्षात घेता, या अॅस्ट्रो–टर्फवर फार झाला असता. पण तो नाही. दुसरी बात म्हणजे लेफ्ट–हाफ मोहिंदरसिंगचा स्लोनेस. परंतु ह्या तितक्याच जिगरीचा आदमी आहे.

फॉरवर्डस्मध्ये गोविंदाची उणीव फारच जाणवावी. त्याचा डॅश व स्कीमिंग अजित वा चांदमध्ये नाही. इतर फॉरवर्डस्चा विचार करता, आपल्या संघाचा स्टार वा डोकेदुखी ठरू शकणारा एकच खेळाडू आहे. तो म्हणजे ग्लॅमर–बॉय अशोककुमार. ह्या जेव्हा सेल्फिश खेळतो व चार–पाच प्रतिस्पर्ध्यांना चकविण्याची स्वप्नं पाहत, 'डी 'त घोळ करतो; तेव्हा तो एक डोकेदुखीच ठरतो. तो कुआलालंपूरला ज्या पद्धतीने पाकविरुद्ध तसाच तो या स्पर्धेत खेळला तर तो मात्र एक वरदानच ठरेल.

फिलीप्स्, हरचरण या दोहोंचा समावेश आपोआपच होतो.' हरचरणच्या बाबतीत, एकच दोष–तो ऑन–द्–रन् लेफ्ट फ्लिक मारू शकत नाही. त्याला वळावे लागते. उलटपक्षी पाकचा समीअल्ला इथे जास्त श्रेष्ठ ठरतो.

भारतीय संघाच्या ताकदी व कमकुवतीचा विचार करता आणि इतर संघाचे चान्सेस लक्षात घेता; भारतीय संघ उपान्त्य फेरीत पोहोचेल असे आज तरी वाटत आहे. ऑस्ट्रेलिया, हॉलंडकडून जबरदस्त मुकाबले होतील. पण त्यांची खेळायची पद्धत तितकी आक्रमक नसल्याने, आमचा संघ श्रेष्ठ ठरावा.

'१–४–३–३' अशा कॉम्बिनेशन्सनी युरोपीय खेळतात. त्यामुळे फील्ड–गोल्स अवघड. म्हणूनच पेनल्टी–कॉर्नर्समध्ये सुरजित व आस्लमनी यशस्विता मिळवणे आवश्यक. या दोघांनाही एकाच वेळी 'डी' वर ठेवून, प्रतिस्पर्ध्याला पेचात पाडायची अजितपालची नवी युक्ती एकदम पटली.

आणखीन एक छोटा मुद्दा म्हणजे पाकिस्तानी संघ ज्याप्रमाणे आपल्या जुन्या पद्धतीनुसार विंगर्सना पासेस देऊन आक्रमक चाली करतो; त्याच पद्धतीचा अवलंब आमच्या संघाने करावा. युरोपीय संघाप्रमाणे फक्त सेंटरलाच पासेस देऊन घोळ माजविण्याच्या फंदात पडू नये.

असा आहे भारतीय संघ. तो जिंकेलच असे आज तरी छातीठोकपणे सांगता येत नाही. परंतु आशा करण्यास निश्चित वाव आहे. लेकिन रास्ता कठिन है !

मात्र सध्याच्या फॉर्मचा विचार करता मी तरी पाक–भारत फायनलची अपेक्षा करतोय.

## आता भारतीय कुस्तीचा समाचार !

हो ! समाचारच घ्यायला हवा. कारण हॉकीनंतर ऑलिम्पिकमध्ये मेडल मिळायची फक्त कुस्तीतच जेमतेम शक्यता.

परंतु दिवाण प्रतापचंद महाराज व राजे मामाजी मोहोळ यांच्यातल्या भांडणाचा परिणाम, म्हणजे अखिल भारतीय कुस्तीगीर परिषदेची भारत सरकारने मान्यताच काढून घेतली. 'आम्ही भारतातल्ये कुस्टीग्योर येकत्र क्येले' ह्यो मामा–दिवाणचा दावा क्षणभर मान्य करूनही, भारत सरकारचे काहीही चुकले नाही असेच मानावे लागते. कारण 'ह्यांनी फकस्त येकत्र क्येले, पर आमची पैलवानं ढेरं संभाळीत, लाल मातीतच खुरं घुसवून घुमत राह्यली त्याचं काय?'

भारतामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जेमतेम दोनच मॅटस् आहेत याचा विचार कोणी केलाय का? यास जबाबदार, पूर्वीचे हे 'मेतर' व 'सध्याचे दावेदार' आहेत असे म्हटल्यास काय गैर आहे? वास्तविक कुस्तीइतका पैसा, सरकार दुसऱ्या कोठल्याही खेळास देत नाही. मग ही अनास्था का? आजारीपणाची सबब सांगून मामा अखिल भारतीय ऑलिम्पिक कमिटीच्या मीटिंगलाही गेले नव्हते.

परिणाम राम किरपाल, सुदेशकुमार, जगमिंदरसिंग, कर्तारसिंग व सतपाल यांची मॉन्ट्रीयल ऑलिम्पिकसाठी निवड न होण्यात झाला.

जबाबदार कोण ? मामा मोहोळांनी उत्तर द्यावे. दिवाण प्रतापचंदास मराठी समजत नाही, हे मान्य. पण मामांना तरी ते समजते.

आता मैदानी स्पर्धा व भारत–

मेडलबाबत अपेक्षा अजिबात नाही. दोष खेळाडूंचा नाही. कारण त्यांना आंतरराष्ट्रीय मुकाबल्याचा फारसा अनुभव नाही. जेमतेम आशियाई स्पर्धांत भाग घ्यायला मिळतो व निवडल्या गेलेल्या पहिल्या तिघांनी आशियाई सुवर्णपदकावर 'मालकी' प्रस्थापित केलीय. पाह्य ना–

८०० मीटर्स धावणे

श्रीरामसिंग–सुवर्णपदक विजेता– आशियाई स्पर्धा.

शिवनाथसिंग–सुवर्णपदक विजेता-५००० मीटर्स धावणे. मॉन्ट्रीयलला मॅरेथॉनमध्ये भाग घेतोय. सध्या फॉर्म उत्तम. निदान पहिल्या सहात यावा.

टी. सी. योहानन–लांब उडी–सुवर्णपदक विजेता. आशियाई स्पर्धा– ७·७७ मीटर्सचा नवा आशियाई उच्चांक.

हरिचंद–१०,००० मीटर्स धावणे–तसा नवखा गडी.

बॉक्सिंगसाठी भारतीय संघात दोघे आहेत. एस. के. राय व मचय्या. या दोघांकडून मी किमानपक्षी चवथ्या क्रमांकाची अपेक्षा ठेवतो. दोघेही 'टफ फायटर्स' आहेत; व लेफ्टनंट कर्नल जोन्ससारख्या कुशल शिक्षकाच्या हातून घडत आहेत. जाताना जोन्स मला म्हणाला होता– 'आय एक्स्पेक्ट अॅट लीस्ट ए ब्रॉन्झ! सो विश हिम लक् !'

वेटलिफ्टिंगमध्ये अनिल मंडल आणि नेमबाजीत भीमसिंग, गुरबीरसिंग संधू व रणधीरसिंग भारतातर्फे उतरतील. यांच्याकडून फारशा अपेक्षा नाहीत.

आता 'देशबिश' प्रकरण विसरून जाऊन, मुख्यत्वेकरून ट्रॅक अॅण्ड फील्ड, कुस्ती, बास्केटबॉल, व्हॉलिबॉल, पोहोणे, जिम्नॅस्टिक व वेट लिफ्टिंगमध्ये कोण चमकतील, झुंजी कशा होतील याचा विचार–

प्रथम धावण्याच्या स्पर्धा–

१०० मीटर्स धावण्याच्या पुरुषांच्या स्पर्धांत अनुक्रमे स्टीव्ह विल्यम्स, रेगी जोन्स (अमेरिका) व क्यूबाचा सिल्व्हियो जोन्स-

मध्ये फोटोफिनिश व्हावी. तिघांचे बेस्ट-परफॉर्मन्सेस–९·९ सेकंद आहेत. म्युनिकचा विजेता सोव्हिएट युनियनचा व्हेलरी बॉर्गाव्ह हे अंतर काटण्यास १०. सेकंद घेतो. ( इथे हिशोब सेकंदाच्या हजार हिश्श्यांचा असतो.)

२०० मीटर्समध्ये अमेरिकेचा स्टीव्ह विल्यम्स व जमेकाचा डॉन क्वारे या दोघांत पुन्हा फोटोफिनिशची अपेक्षा, कारण दोघांचेही टाइमिंग १९·८ सेकंद. इथेही व्हेलरी बॉर्गाव्हचा वेळ २० सेकंद.

महिलांच्या या दोन्ही शर्यतीत पूर्व जर्मनीच्या रेनेट स्टेकरचेच नाव समोर येते. १०० मीटर्समध्ये तर तिने १ जूनलाच ११·० सेकंदांचा नवा जागतिक उच्चांक प्रस्थापित केला.

४०० मीटर्स धावण्याच्या शर्यतीत पुरुषात अमेरिकेचे आर. रे ( वेळ ४४·४५ सेकंद ) व के. रॅन्डल या दोहोंत चुरस होईल, तर महिला विभागात पूर्व जर्मनीची ई. स्ट्रेइडट व पोल या दोहोंत धमाल उडावी.

या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख.

**आनंदाच्या दाही दिशा**

**रवींद्र पिंगे**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**किंमत : दहा रुपये**

११० मीटर्स हर्डल्समध्ये फ्रान्सचा गाय ड्रूट सध्या तरी टॉप फेव्हरीट समजला जातो. त्याचा वेळ १३·० सेकंदांचा आहे.

तसेच ४०० मीटर्स हर्डल्समध्ये म्युनिकच्या विजेत्या अक्कई बुवाला, यंदा आपले अजिंक्यपद टिकवण्यासाठी अमेरिकेच्या जे. बोल्डिंग" बरोबर कठोर मुकाबला करावा लागेल. बोल्डिंगने नुकतेच ४८·४ सेकंदांचे टाइमिंग दिलेच.

८०० मीटर्स धावण्यात अमेरिकेचे वुल्हेर, आयनकार्ट आणि केनियाचा माईक बॉईट यांच्यात स्पर्धा व्हावी, तर महिलांच्या विभागात सोव्हिएटच्या एन. मार्गाझोवाला सध्या तरी तोड दिसत नाही. वर्ल्ड रेकॉर्ड तिने नुकतेच केलेय. टाईमिंग १ मिनिट ५९·४ सेकंद.

१५०० मीटर्स धावण्यात माझ्या मते टांझानियाचा फिल्बर्ट बायी नसल्यामुळे जॉन वॉकर शुड वॉक इन वुईथ ए गोल्ड ! गडचाने नुकताच ' एक मैल ' ३ मिनिटे, ४८·४ सेकंदांत पार केला होता.

३००० मीटर्सच्या स्टीपलचेसमध्ये पोलंडचा बी. मॅलिनोव्हस्की व फ्रान्सचा ए गार्देउ यांच्यात १०००० मीटर्समध्ये इंग्लंडचा ब्रॅन्डन फॉस्टर, इतर कोठलाही चमत्कार न झाल्यास, विजेता व्हावा.

' २० किलोमीटर्स वॉक'मध्ये सोव्हिएटचे निकोलाय स्मागा आणि व्ही. ब्लू बीनिकी, या दोहोंत मुकाबला घडेल.

' मॅरॅथॉन ' बद्दल काय बोलू ? ' अबेबे बिकीला ' प्रमाणे एखादा सरप्राईझ इथियोपिया पुन्हा देईल ही अपेक्षा.

भालाफेकीतल्या पुरुष विभागात नुकतेच वर्ल्ड–रेकॉर्ड करणारा (९४–०८ मीटर्स) हंगेरीयन एम निमेथ आणि महिलांमध्ये पूर्व जर्मनीची फ्यूक्स् (६६–४ मीटर्स) हे दोघे जोरात आहेत.

गोळाफेकीतल्या पुरुष विभागात मी माझे पैसे स्वीडनच्या हॉगलँडवर लावीन तर महिला विभागात, मी पूर्व जर्मनीच्या एम्. ॲडमवर बेट घेईन.

डिकॅथलॉनमध्ये सोव्हिएट युनियनचा अव्हिलॉव्ह व अमेरिकेचा बी. जेन्नर जीवाचे रान करतील.

उड्यांच्या प्रकरणात-तिहेरी उडी : डॉलीव्हेरा (मेक्सिको), सानीव्ह (सोव्हिएट); लांब उडी–स्टेकी (युगोस्लाव्हिया), उंच उडी डी. जोन्स् (अमेरिका) हे माझे फेव्हरिटस् आहेत.

थाळीफेक प्रकरणात मी सोव्हिएट युनियनचा एफ्. मेलनिक आणि अमेरिकेची मॅक विल्किन्स् यांच्यात मुकाबला अपेक्षितो.

शेवटी महिलांची सर्वात अवघड स्पर्धा पेन्टॅथलॉन–तिच्यात माझा अंदाज ब्रिटनची मेरी पीटर्स हा आहे.

यानंतर कुस्ती. इथे ग्रीको–रोमन पद्धतीत सोव्हिएट युनियन स्ट्रेट मारते. खिसा मुटडिनॉव्ह, रिझॅन्टसेनव्हन, ॲन्टली नाझारेंको, व्ही. कॉन्स्टॅटिनोव्ह, हे जुने खंदे वीर त्यांच्यात आहेतच; शिवाय निकोलाय बार्बोशिन, फकराय मुश्ताशित ही नवी पोरेही जोमात आहेत.

फ्रीस्टाईलमध्ये सोव्हिएट रेसलर्सच बहुतांशी जिंकावेत. त्यांना पूर्व युरोपातल्याच कोणा कुस्तीगीरांचा प्रतिकार झाला तरच. अमेरिका, ब्रिटन आदींजवळ जागतिक दर्जाचे फारसे कोणी नाही.

जलतरणात माझ्या मते अमेरिकेस सध्या तरी तोड नाही. फार तर महिला विभागात पूर्व जर्मनीकडून प्रतिकार व्हावा.

बास्केटबॉलमध्ये पुन्हा सोव्हिएट युनियन व अमेरिका फायनल अपेक्षित. या वेळेला म्युनिकच्या पराभवाचा वचपा अमेरिका काढणार का ? शक्यता आहे.

जिम्नॅस्टिक्स्मध्ये जपान व सोव्हिएटमध्ये कॉम्पिटिशन आहे. पुरुष गटात जपानकडे पारडे झुकण्याची शक्यता आहे. तर महिला विभागात सोव्हिएट युनियनची मक्तेदारी चालावी.

वेटलिफ्टिंगमध्ये सोव्हिएट युनियन आणि पूर्व युरोपीय राष्ट्रे परंपरेनुसार अजिंक्य ठरावीत असा अंदाज; तर व्हॉलिबॉलमध्ये जपानचे पारडे जड व्हावे.

ही आहे एक ओळख–एक विचार.

शेवटी एकच इच्छा.

सर्वोत्कृष्ट संघ व खेळाडू विजयी व्हावेत.

आणि

ऑलिम्पिकच्या तत्त्वाशी जागून स्पर्धा खेळल्या, पाहिल्या व समजावून घेतल्या जाव्यात.

आमेन ! □

**(१७ जुलै १९७६)**

जमेका : पृष्ठ ७ वरून

बांधले आणि सरकारविषयी प्रतिकूल लेख त्या वृत्तपत्रांत छापून आणले. सरकारवरचा लोकांचा विश्वास डळमळीत व्हावा, उद्योगधंद्यात भांडवल गुंतविले जाऊ नये, अर्थव्यवस्था खिळखिळी व्हावी, हा त्यामागे उद्देश होता. श्रीमंत जमेकन व्यापाऱ्यांनी अमेरिकेत जमिनी खरेदी केल्या आहेत, असे मुन यांनी सांगितले. तीन लाख पाच हजार डॉलर्स परदेशी पाठविण्याचा कट केल्याबद्दल एका स्थानिक व्यापाऱ्यावर खटला भरण्यात आला आहे. काही स्थानिक व्यापाऱ्यांनी वीस कोटी डॉलरची बेकायदा निर्यात केली, असा आरोप खाणमंत्री होरेस क्लार्क यांनी केला आहे. पण हे सारे व्यवहार एवढ्या हुशारीने केले जात आहेत की, विशिष्ट देशाचा यात हात आहे हे माहीत असले तरी तसा आरोप सरकार करू शकत नाही, हे मंत्री क्लार्क यांनीही सांगितले.

आपल्याला अनुकूल अशा राजवटी अधिकारावर आणण्यासाठी आणि नको असलेल्या राजवटी खाली ओढण्यासाठी सी. आय. ए. मार्फत कारवाया अमेरिका अजूनही करीत आहे. अमेरिकन स्वातंत्र्याचा द्विशताब्दी समारंभ नुकताच साजरा झाला. ब्रिटनविरुद्ध झगडून दोनशे वर्षांपूर्वी अमेरिका स्वतंत्र झाली, पण असे स्वातंत्र्य सर्व देशांना उपभोगू देण्याची अमेरिकेची तयारी नाही. पश्चिम गोलार्ध हे अमेरिका आपले वर्चस्वक्षेत्र मानते. येथील कोणत्याही देशात अमेरिकेच्या कलाने न चालणारी राजवट अधिकारावर येणे अमेरिकन राजकर्त्यांना पसंत पडत नाही. याबाबत नुसती नापसंती दर्शवून अमेरिका स्वस्थ बसत नाही तर सी. आय. ए. मार्फत तेथील राजवट उलथण्याचा आणि त्या जागी आपल्याला अनुकूल राजवट आणण्याच्या कारवाया सुरू होतात. क्यूबात कम्युनिस्ट क्रांती झाली. तेथील राजवट उलथण्याचे प्रयत्न केनेडींच्या काळात झाले, पण त्यात यश आले नाही. चिलीमध्ये अध्यक्ष आयेंदे यांचा खून करून त्यांची राजवट उलथण्यात आली आणि आता जमेकामध्ये तशाच स्वरूपाच्या कारवाया झाल्या. त्यांना यश आले नाही तरी परकीय हस्तक्षेपापासून छोट्या देशांच्या स्वातंत्र्याला असलेल्या गंभीर धोक्याची जाणीव या घटनेने करून दिली. आपले स्वातंत्र्य जपण्यासाठी किती जागरूक राहण्याची आवश्यकता आहे, हाच धडा जमेकातील घटनांनी दिला आहे. अशा कारवायांना तोंड देण्यासाठी छोटी राष्ट्रे संघटित झाली पाहिजेत, एकत्रित आली पाहिजेत. बड्या राष्ट्रांच्या गटात सामील व्हावयाचे नाही, त्यांच्या दडपणापुढे मान तुकवायची नाही हे छोट्या राष्ट्रांनी निर्धारपूर्वक ठरविले पाहिजे. □

## मराठी चित्रसृष्टीत नवी विटी नवं राज्य । शिरीष सहस्रबुद्धे

□ □

## हा खेळ सावल्यांचा .या सुखांनो या

मराठी चित्रपटसृष्टीसंबंधी नवलविशेष नवीन असं काही लिहिण्याजोगं नाही, कारण त्यात (तमाशाशिवाय) काही नवं करण्याजोगंच नाही, अशी एक प्राचीन समजूत आहे. या समजुतीत माझाही कधी अपवाद नव्हता, कारण 'रामजोशी' पासून भरभराटलेली तमाशाचित्रांची परंपरा ही तमाशा आणि मराठी चित्रपट यांचं अभिन्नत्व यावच्चंद्र... वगैरे कायम राखणार अशी लक्षणं दिसू लागली होती. अपवाद होते त्याला, नाही असं नाही. कारण भालजी पेंढारकरांसारखे काही निर्माते–दिग्दर्शक अद्यापही तग धरून होते, तर 'सामना' सारखा आगळा चाकोरीबाह्य प्रयोग करणारे नवीन निर्माते–दिग्दर्शकही क्वचित दाद घेऊन जात होते. तथापि शांतारामबापूंनी 'पिंजरा' सारखा प्रच्छन्न तमाशापट काढल्यामुळे आणि तो अपूर्व गाजल्यागरजल्यामुळे त्या रुळत्या आडवाटेला हमरस्त्याची झिलई उगीचच प्राप्त झाली होती. तमाशा ही महाराष्ट्राच्या बहुसंख्य जनतेला भिडलेली सार्वत्रिक लोककला आहे, तेव्हा तिचा अनादर किंवा उपेक्षा करण्याचा हेतू नाही. पण प्रेमाच्या त्रिकोणात किंवा डबलरोलच्या हव्यासात गुंतून साचेबंद होणाऱ्या मालमसालाभऱ्या हिंदी धंदेवाईक चित्रपटांना जी दूषणे दिली जातात, ती 'कार्बन कॉपीज्' सारख्या निघणाऱ्या साचेबंद मराठी तमाशापटांनाही दिली, तर काय चुकलं ? हिणकस कलाकृती दिल्यानंतर निर्मात्यानं केवळ 'मराठी चित्र' म्हणून प्रेक्षक–समीक्षकांकडून सहानुभूतीची अवाजवी अपेक्षा करणं गैरच.

सुदैवानं 'प्रेक्षकांना आवडतात' म्हणून निर्मात्यांनी तमाशाची झड लावायची आणि 'तेच तेच पाहायला लागतं' म्हणून सुजाण प्रेक्षकांनी मराठी चित्रपटाकडे पाठ फिरवायची, मग मराठीला पुरेसा सुजाण प्रेक्षकवर्ग नसल्याची हाकाटी करून निर्मात्यांनी पुन्हा ढोलकं–तुणतुणं–नाचीला शरण जायचं, हे दीर्घकालीन दुष्टचक्र भेदलं जाईल, अशी आशा गेल्या वर्षी दिसायला लागली होती. या वर्षी ती खूपच वाढली आहे. पुण्यातच सध्या तब्बल पाच मराठी चित्रपट चालू आहेत, जोरात चालले आहेत; आणि त्या पाचांपैकी–'चोरीचा मामला', 'पाहुणी', 'तुमचं आमचं जमलं', 'या सुखांनो या' आणि 'हा खेळ सावल्यांचा'.–एकही चाकोरीतला तमाशापट नाही. भर पावसातही एकावेळी चार–चार चित्रपटांचे खेळ हाऊसफुल्ल गर्दीत चालावेत ही घटना बरंच काही सुचविणारी आहे. चांगल्या मराठी चित्रपटाला शहरी भागातही भरपूर लोकाश्रय मिळू शकतो, याचा तो बोलका पुरावा आहे. मराठी चित्रसृष्टीची संख्येच्या आणि गुणवत्तेच्याही दृष्टीनं अशीच वाढ होत राहिली तर बंगाली किंवा कन्नड–तामिळी प्रादेशिक चित्रसृष्टीच्या तुलनेतही मराठी चित्रपट कमी पडणार नाहीत. बर्लिनपर्यंत पोचलेल्या १९७५ च्या 'सामना' चित्रपटानं प्रादेशिक भाषेतील भारतीय चित्रपटात राष्ट्रपतींचा पहिला पुरस्कार–रजत कमल–मिळवून इतरांना मार्ग दाखवला आहे, असं मला वाटतं.

मराठी चित्रपटसृष्टीच्या पुनरुत्थानाची ही जी काही प्रक्रिया आज चालल्यासारखी दिसते आहे, त्याच्यामागे अनेक कारणं, अनेक आधार आहेत. एक तर ग्रामीण मराठी चित्रपट हा दुष्ट पाटील–बाईबाटली–फरशीकुऱ्हाड–तमासगीर यांच्या वर्तुळाबाहेर जाऊनही चांगल्याप्रकारे रंगविता येतो आणि मराठी चित्रपटाचा धंदा ठाकठीक चालण्यासाठी ग्रामीण भागातल्या फार मोठ्या प्रेक्षकवर्गाचा जो आधार लागतो, पाठिंबा लागतो, तो तमाशा न दाखविताही मिळविता येतो; हे दादा कोंडके यांच्या कॉमेडीज् आणि 'सामना' सारख्या चित्रपटांनी सिद्ध करून दाखवलं. दुसरं असं की, नवनव्या प्रयोगांची जी उत्कंठा–करण्याची आणि स्वीकारण्याची निर्मात्या-प्रेक्षकांची इच्छा-अपेक्षा–गेल्या काही काळात करपळली होती, ती पुन्हा एकदा नव्यानं पुनरुज्जीवित झाली. उदाहरणार्थ,

मराठी चित्रसृष्टीत निखळ कॉमेडीची चणचण होती ती भरून काढायचा प्रयत्न दादा कोंडके यांनी यथाशक्ती–यथामती चालवला आहे. एरवी आधीच महाराष्ट्रात सेंटिमेंटॅलिझम् प्रमाणाबाहेर असल्यानं चित्रनाट्यसृष्टीतही प्रकाशापेक्षा पडछाया जास्त. कौटुंबिक रडारडीनं भिजलेले करमणूक प्रकार आपल्याकडे भाव खाऊन जातात आणि निवळशंख शतप्रतिशत कॉमेडीचं मात्र खुल्या दिलानं स्वागत केलं जात नाही. अशा परिस्थितीत दादा कोंडके यांच्या या पाच संपूर्ण कॉमेडीज्–विशेषतः स्लॅपस्टिक कॉमेडीज्, हॉर्स प्ले जोक्स–हा एक धाडसी जुगारच होता, तो यशस्वी ठरलाही. दादांच्या कॉमेडीतील कलात्मतेचा वादग्रस्त मुद्दा बाजूला ठेवूनही या प्रायोगिकतेचं श्रेय त्यांना मिळायला हवं. याच प्रकारचा नवा प्रयोग 'सामना'नं गंभीरपणे केला. ग्रामीण राजकारण–अर्थकारण–समाजकारण यासारख्या गहन, नाजूक पूर्वास्पृष्ट विषयांचा ऊहापोह करूनही चांगला ग्रामीण चित्रपट सादर करता येतो, हे 'सामना'नं दाखवून दिलं. ही एक्सपेरिमेंटेशनची प्रवृत्ती मोलाची आहे, अनुकरणीय आहे. 'हा खेळ सावल्यांचा' हा पहिला नवा मराठी चित्रपट या एक्सपेरिमेंटेशनचाच एक भाग आहे. कॉमेडीप्रमाणेच गूढकथा–रहस्यकथाप्रधान चित्रपटांची मराठीतली उणीव या चित्रपटानं भरून काढली आहे आणि अतिशय समर्थपणे भरून काढली आहे. हिंदीमध्ये अशा चित्रांची एक चांगली मालिका आहे. वह कौन थी, कोहरा, बीस साल बाद, मधुमती, गुमनाम ही चटकन आठवणारी काही ठळक नावं. मराठीत मात्र गूढकथांमध्ये नाव घेण्याजोगं काही नव्हतं, तथापि लेखिका–निर्मात्या सुमती गुप्ते आणि दिग्दर्शक वसंतराव जोगळेकर यांच्या 'हा खेळ सावल्यांचा' या नव्या रंगीत मराठी चित्रपटानं ही कोंडी फोडण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. हा सावल्यांचा जीवघेणा खेळ खेळला गेलाय् तो एका निष्पाप मुलीच्या जिवाशी; तिच्या गळ्याला फास लावून तिची इस्टेट बळकावण्यासाठी. गावचे जहागीरदार असलेले इंदूचे वडील (पाहुणा कलाकार: श्रीकांत मोघे) आपली इस्टेट मृत्युपत्रान्वये तिला देऊन जातात आणि इंदू (आशा काळे) च्या तरुण सावत्र आईला, सुशीलाला उरते ती फक्त चोळीबांगडी–इंदूवर एकीकडे प्रेम करणारी आणि दुसरीकडे आपल्या भवितव्याच्या कल्पनेनं अस्वस्थ होणारी सुशीला आणि तिच्याशी इमानदारी दाखवणारे दिवाणजी इस्टेट मिळविण्याच्या फिकिरीत असतानाच सुशीलाचा भाऊ गणूमामा (राजा गोसावी) येऊन टपकतो. बंद पडलेल्या नाटककंपन्यातला हा वाढपी इंदूवर प्रेमाचा वर्षाव करीत असतानाच नरसूचं भूत इंदूला पछाडतं आणि तिच्या वेडापायी ती आयुष्यातून उठायची वेळ येते. डॉ. शेखरशी ठरलेला तिचा विवाह मोडायच्या बेतात येतो. डॉ. शेखर (डॉ. काशिनाथ घाणेकर) मोठ्या धैर्यानं तिच्यावर उपचारही करतो आणि अखेरीस खऱ्या भुताला आणि भुताटकीच्या खऱ्या रहस्याचा भेदही करतो. 'नरसू गड्याच्या मरणाला आपण कारण झालो', या इंदूच्या मनातल्या भयगंडाचा फायदा घेऊन, तिच्यावर जिवापाड प्रेमाचं नाटक करणारा गणूमामाच भुताच्या वेशात तिला छळत असतो; या रहस्याचा उलगडा होऊन अर्थातच इंदू–शेखरचं मीलन होतं.

निर्मात्या सुमती गुप्ते यांची ही कथा तशी सरळसाधी आहे, विशेष आडवळणी तिढ्याची नाही. पटकथा–संवादाची आघाडी द. मा. मिरासदार आणि शंकर पाटील यांनी सांभाळली आहे. या मूळ कथेचं एक वैशिष्टच मला प्रकर्षानं जाणवलं. गूढ वातावरणनिर्मिती करीत असतानाही त्यात वास्तवाची कास सहसा सोडलेली नाही. उदाहरणार्थ, नरसूचं भूत हे गणूमामाचंच सोंग होतं हे सिद्ध झाल्यानंतर त्यात काही विसंगती जाणवत नाहीत–अगदी प्रेक्षकांना बसणारा आश्चर्याचा धक्का गृहीत धरूनही. कारण त्या आधी भुताटकीचे चाळे दाखवताना कोणतीही अतिशयोक्ती लेखकाने केलेली नाही. सर्वसाधारणतः अशा तऱ्हेची हिंदी चित्रपटात अतिमानुष योनीलाच जमतील–शोभतील अशा प्रकारचे भूतचमत्कार दाखवायच्या मोहाला लेखक–दिग्दर्शक बळी पडतात आणि नंतर भुताटकीचं फसवं मानवी रहस्यरूप उघड झाल्यानंतर त्याचं स्पष्टीकरण ते देऊ शकत नाहीत, देण्याच्या फंदात पडतही नाहीत. आणि प्रेक्षकांपुढे असे प्रश्न उभे राहिले की, एकूण परिणाम पातळ होतो. वह कौन थी आणि बीस साल बाद ही अशा गलथान चुकांची दोन ठळक उदाहरणं. 'हा खेळ सावल्यांचा'मध्ये मात्र प्रथमपासून 'भूतसृष्टी हे निव्वळ कल्पनेचे खेळ आहेत' हा दावा डॉ. शेखरच्या तोंडून सतत मांडलेला आहे. आधुनिक वास्तववादाचा असाच स्पर्श 'हा खेळ...'च्या पात्रांच्या व्यक्तिचित्रणामध्ये दिसतो. विशेषतः इंदूची आई आणि दिवाणजी ही दोन्ही पात्रं अत्यंत पटणारी –convincing–उतरली आहेत. संपत्तीचा हव्यास असतानाही सावत्र मुलीवरचं प्रेम कायम ठेवणारी आणि त्या दोन्हींतल्या संघर्षाला तोंड देणारी जहागीरदारांची तरुण विधवा आणि व्यवहारवादाचा अर्क असलेले पण तरीही माणूस वाटणारे दिवाणजी या उभयतांच्या स्वभावाच्या ज्या विविध आणि क्वचित विसंगतही छटा दिग्दर्शक दाखवतो, त्यामुळे ती दोघं रुपेरी पात्रं न राहता दोन वास्तव विलोभनीय माणसं वाटतात. एखाद्या चाकोरीतल्या भूतचित्रात या दोघांनाही उलट्या किंवा बिनकाळजाचे खलनायक बनवून टाकलं गेलं असतं.

'हा खेळ...'च्या कथेचं आणखीही एक आकर्षक वेगळेपण आहे. या चित्रात महत्त्व दिलं गेलंय ते भुताटकीच्या चाळ्या-चमत्कारांना नव्हे, तर भुताच्या निव्वळ आभासामुळेही मानवी मनावर–विशेषतः कमकुवत कोपऱ्यात–जे भीषण परिणाम, परिवर्तनं, होऊ शकतात, त्याला 'नरसू आपल्यामुळं मेलाय् आणि त्याचं भूत झालंय्' ही भयकारक कल्पना वयाच्या दहाव्या वर्षापासून जिच्या मनात घर करून राहिली आहे, त्या इंदूच्या मनात त्या भुताचं दर्शन झाल्यामुळं जे विलक्षण उत्पात होतात, त्यांचं चित्रण लेखक–दिग्दर्शकांनी महत्त्वाचं मानलं आहे आणि यामुळे प्रेक्षक एकदम भ्रमिष्ट होऊ घातलेल्या इंदूच्या जवळ जाऊ शकतो, तिच्या यातनांशी समरस–निदान सहानुभूत–होऊ शकतो. इतर भूतकथांतील नायिकांप्रमाणे तिच्याबद्दल लांबूनच हळहळत नाही. त्यातून हा चित्रपट अतिमानवी गूढकथा न राहता भयगंडानं पछाडलेल्या एका दुर्दैवी तरुणीच्या मनोव्यापारांचा आलेख बनतो.

भुताच्या भीतीनं–(की भीतीच्या भुतानं?)–झपाटलेल्या इंदुमतीची भूमिका हे आशा काळे यांना मोठंच आव्हान होतं

आणि त्यांनी ते ताकदीनं पेललं आहे. इंदूची मनोव्यथा (एरवी गुळगुळीत वाटणारा हा शब्द इथं खऱ्या अर्थानं 'फिट' आहे), तिची वेगवेगळी रूपं, तिचा ताठा आणि तिचं प्रेम या साऱ्यांचं चौफेर दर्शन घडविता त्या कुठेही कमी पडल्या नाहीत. विशेषतः इंदूच्या झपाटलेल्या अवस्थेतला त्यांचा अभिनय हे त्यांच्या कारकीर्दीतलं एक अभिमानाचं ठिकाण ठरावं. डॉ. शेखरच्या भूमिकेत डॉ. काशिनाथ घाणेकर यांनी घनघोर निराशा केली आहे. त्यांचं बोलणं अत्यंत सदोष, उच्चार अस्पष्ट आहेत. रंगभूमीवर प्रभाव पाडणारं त्यांचं व्यक्तिमत्त्व इथे निष्प्रभ वाटतं. त्यांच्या हालचालीही पुरेशा निर्दोष नाहीत, विशेषतः 'गोमू संगतीनं माझ्या तू येशील का' या गीताच्या वेळची त्यांची धावपळ तर विदूषकी चाळे या सदरात जमा होण्यासारखी आहे. त्यांच्या या इतक्या सामान्य कामगिरीवरून तरी चित्रसृष्टीत त्यांना फारसं उजळ भवितव्य दिसत नाही. इतरेजनांची कामगिरी समाधानकारक.

'या सुखांनो या' बाबत स्वतंत्रपणे काही लिहिण्याआधी या दोन नव्या मराठी चित्रपटांत आढळलेल्या काही 'कॉमन पॉइंटस्'चा –अर्थात प्लस पॉइंटस्‌चा–उल्लेख केला पाहिजे. यातला पहिला मुद्दा आहे संगीताचा. 'हा खेळ–' चे गीतकार आहेत सुधीर मोघे. या उगवत्या कलाकाराला मिळालेल्या या संधीचा पुरेपूर फायदा त्यांनी घेतला आहे, त्यांनी लिहिलेली आणि हृदयनाथ मंगेशकरांनी स्वरबद्ध केलेली चारही गाणी संस्मरणीय झाली आहेत. भयकारी वातावरणनिर्मितीसाठी वारंवार वापरलेलं गीत– 'काजळरातीनं ओढून नेला', 'आला वारा आला' हे समूहनृत्यात्मक गीत, 'गोमू संगतीनं...' हे आशा–हेमंतकुमारच्या आवाजातलं कोळी द्वंद्वगीत आणि 'हा खेळ सावल्यांचा' हे स्वतः हृदयनाथांनी गायलेलं सूचक, सोलो, थीम साँग ही चारही गाणी चित्रपटाला लेण्यांसारखी शोभली आहेत. रंगीत छायाचित्रणामुळे त्यांच्या सौंदर्यात भरच पडली आहे. 'या सुखांनो या' रंगीत नसला तरी ग. दि. मा.–सुधीर फडके जोडीनं त्याला दिलेलं संगीतही उल्लेखनीय आहे. 'या सुखांनो या' हे थीम साँग आणि 'तुला या फुलांची शपथ' हे द्वंद्वगीत विशेष लक्षणीय. दोनही चित्रांतली बहुतेक गाणी बाह्यचित्रणात घेतली आहेत ही एक डोळयांच्या समाधानाची बाब. संगीताप्रमाणेच दोन्ही चित्रांचं एक समान वैशिष्ट्य, त्यातलं सुरेख छायाचित्रण हे आहे. दोन्हींचे छायाचित्रकार एकच–श्री. मनोहर आचार्य हे–आहेत. विशेषतः गीतांच्या चित्रणात त्यांच्या कॅमेऱ्यानं मजा आणली आहे. 'आला वारा आला' आणि 'हा खेळ सावल्यांचा' ही दोन गीतं या दृष्टीनं विशेष लक्षात राहण्याजोगी. वातावरणातून मनावर दडपण आणण्याची फार महत्त्वाची कारागिरी त्यांच्या कॅमेऱ्यानं पार पाडली आहे. 'या सुखांनो या' मध्ये या छायाचित्रणाला अप्रतिम सुस्पष्ट ध्वनिलेखनाची जोड मिळाली आहे. 'हा खेळ...' मध्ये ही स्पष्टता थोडी कमी आहे. 'या सुखांनो या' मात्र मराठी चित्र असून; ऐकण्याजोगं' होतं.

'राजा गोसावी' हा या दोन्ही चित्रपटातला एक महत्वाचा common factor. रंगभूमीवरच्या या प्रथितयश अभिनेत्यानं 'या सुखांनो या' मधला रंगा आणि 'हा खेळ–' मधला गणूमामा या दोन पॅरेलल् भूमिकांमध्ये प्रचंड धमाल उडवून दिली आहे. आवाज, हलता चेहरा आणि हुकमी अभिनय. विशेषतः मुद्राभिनय ही आपली अस्त्रं राजा गोसावींनी कमालीच्या जिवंतपणानं वापरुन आपल्या दोन्ही भूमिका प्रभावीपणे उभ्या केल्या आहेत. दारूच्या नशेत धुंद राहणारा रंगा आणि नाटकाच्या मस्तीत बेहोष असणारा गणूमामा यात गुणवत्तेच्या दृष्टीनं डावं-उजवं करणं कठीण असलं तरी एक नक्की की, या दोन्ही चित्रपटांच्या नायकांना –रमेश देव आणि काशिनाथ घाणेकर– दुय्यम भूमिकेतल्या राजा गोसावींनी पडद्यावरून अक्षरशः उचलून फेकलंय. राजाभाऊ पडद्यावर असताना कित्येकदा 'वन् मॅन शो' चालू असल्यासारखा वाटावा, हे त्यांचं यश आहे. दोन्ही चित्रांत नायकांनी केलेल्या सपशेल निराशेमुळे चित्रपट पूर्णतः नायिकाप्रधान बनले आहेत. सुदैवानं दोघीही नायिकांनी– सीमा व आशा काळे–top चा performance दिला आहे. नायिकांचं पूर्ण वर्चस्व हे दोन्ही चित्रपटांचं आणखी एक समान वैशिष्ट्य.

'या सुखांनो या' च्या यशात प्रभावी संघर्षबीज असणारी कथा देणारे लेखक; आणि ती बीजं हळुवार फुलवून उत्कट संघर्षनिर्मिती करणारे दिग्दर्शक राजदत्त यांचा वाटा मोठा आहे, पण त्यापेक्षाही अधिक हे चित्र आहे सीमाचं. मराठी रंगभूमी आणि मराठी-हिंदी चित्रसृष्टी गाजवणाऱ्या या गुणी अभिनेत्रीला प्रदीर्घ कालावधीनंतर लाभलेली ही, इतकी परीक्षा पाहणारी भूमिका. सीमानं तिचं चीज केलं आहे. डॉक्टर होण्याचं स्वप्न पाहणारी जिद्दी विद्या, स्वतःच्या पायावर उभी राहू इच्छिणारी डॉ. विद्या, गौरवाच्या वर्षावातही गुन्हेगार पतीची आठवण ठेवणारी यशस्वी डॉ. (सौ.) विद्या देशमुख आणि ज्या गैरसमजापोटी पतीला दूर लोटलं, ते विरल्यानंतर कोलमडून पडणारी विद्या–विद्येच्या व्यक्तित्वाचे असे कित्येक पैलू सीमानं जिवंत उभे केले आहेत. कामात जीव ओतला की निर्माण होणाऱ्या श्रेष्ठ कलेचं हे एक ठळक उदाहरण. विजय देशमुखच्या भूमिकेत रमेश देवसारखा जुना जाणता अभिनेता मात्र फिका पडला आहे. त्याच्या काही संवादफेकी आणि विशेषतः हसण्याची पद्धती कृत्रिम व खटकणारी आहे. काही प्रसंगांत तो चमकदार अभिनय करून जातो, पण त्यात चढउतार आहेत, सलगता नाही.

दोन्ही चित्रपटांत मिळून शरद तळवलकर, पद्मा चव्हाण, मधु आपटे, बबन प्रभू, सुमती गुप्ते, श्रीकांत मोघे आणि देवेन वर्मा व अशोककुमार ही हिंदी-मराठी नाट्य-चित्रसृष्टीतली मंडळी पाहुण्या कलाकारांच्या भूमिकांमध्ये दिसतात. यांपैकी 'या सुखांनो या' मधील शरद तळवलकर व पद्मा चव्हाण आणि श्रीकांत मोघे यांचा विशेष उल्लेख आवर्जून केला पाहिजे.

दोन्ही चित्रपटांच्या दिग्दर्शकांविषयी खास काही लिहिल्यावाचून लेख पुरा होणार नाही, इतकी अजोड कामगिरी श्री. वसंतराव जोगळेकर ('हा खेळ–') व राजदत्त ('या सुखानो या') या उभयतांनी केली आहे. चित्रपटाच्या सर्व अंगांवर दिग्दर्शकाची नजर असली म्हणजे त्यांचा कसा उत्तम मिलाफ होऊन चित्राचा दर्जा आणि finish वाढतं, हे या चित्रातनं पाहता येण्यासारखं आहे. मराठी चित्रसृष्टीला नवसंजीवन देऊ शकणाऱ्या चित्रांच्या यशात त्यांचा वाटा सिंहाचा. 'या सुखानो या' ची कथाकल्पना ही प्रेम-त्यासाठी त्याग-पतिपत्नीतील विश्वास-अविश्वास, मानापमान-बेबनाव, कलह आणि पुनर्मीलन, असा प्रवास करते. दोन प्रेमळ, त्यागी पण self-assertive व्यक्तित्वातला संघर्ष प्रभावीपणे आणि अपरिहार्य पर्यायाशक्यतेने उभा करण्यात लेखक-दिग्दर्शक-अभिनेते यशस्वीही झाले आहेत.

–फक्त रमेश देव आणि (सौ.) सीमा (देव) यांना तरुण प्रेमिकांच्या भूमिकांमध्ये स्वीकारणं फार फार फार कठीण आहे. □

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

# कल्याणी

## पी. डी. ए. चे रजपूत काळातील नवे कोरे नाटक....

आपलं रौप्यमहोत्सवी वर्ष साजरं करीत असणाऱ्या प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन, पुणे, यांनी सौ. ज्योत्स्ना देवधर यांनी स्वतःच्याच कादंबरीचं केलेलं नाटयरूपांतर सादर केलं आहे. एका बड्या खानदानात सून म्हणून आलेल्या गरीब घरातल्या एका दुर्दैवी तरुणीच्या – कल्याणीच्या – वाट्याला आलेल्या भोगवटयाची ही रामकहाणी.

......कल्याणीचा पती वासुदेव वस्तुतः लग्नाला तयार नाही, कारण त्या घराण्याच्या वास्तूत कोणतंही जोडपं सुखी होऊ शकणार नाही अशी त्याची दृढ खात्री आहे. तथापि त्याचा विरोध न जुमानता लग्न करावं लागतं आणि वासुदेव घराण्यावरच्या शापाच्या भीतीनं कल्याणीचा पत्नी म्हणून खऱ्या अर्थानं स्वीकार करीत नाही, ती फक्त त्या घरची सून बनून राहते आहे. सगळ्यांशी प्रेमानं–नीतीनं वागूनही तिच्यावर कोसळायची संकटपरंपरा टळत नाही आणि अखेरीस सर्वस्व उद्ध्वस्त व्हायची वेळ आलेली असतानाही कल्याणी पुन्हा एकवार राखेवर नवनिर्मितीच्या जिद्दीनं उभी आहे......

पी. डी. ए. नं ह्या नाटयकृतीचा बाहेरचा थाटमाट तर मोठा आकर्षक केला होता. एका उच्च घराण्याच्या वाड्याचा सुरेख सेट आणि पडदा उचलून दाखवलेली वरच्या मजल्यावरची वासुदेवाची खोली. उमेश गुप्ते यांची नेपथ्यरचना आणि 'मनोरंजन' ची सजावट यांचा वाटा त्यात बराच मोठा. तथापि आतनं हे नाटक लेखनापासूनच खूप पोकळ वाटलं, ठिसूळ वाटलं, मनाची पकड घेऊ शकलं नाही. कादंबरीचं नाटयरूपांतर कलात्मक आणि व्यावहारिक अशा दोन्ही दृष्टिकोनातून यशस्वी क्वचितच ठरतं, हा आजपर्यंतच्या अनुभवांचा दाखला आहेच. माणसाच्या Superstitions हा नाटकासाठी यशस्वी विषय होऊ शकणारच नाही असं नव्हे, पण या शोककथेचं मूळ ज्यात आहे ती अंधश्रद्धा मात्र contrived, आणि तरीही तकलादू, अवास्तव वाटली, स्वीकारार्ह वाटली नाही. कदाचित ती थोडी वेगळी असल्यामुळे, कदाचित ही कल्याणीच्या, पुरेशा establish होऊ न शकलेल्या, पुरेशा परिणामकारक नसलेल्या आणि तरीही Communication मध्ये अडथळा बनून राहणाऱ्या खानदानी, राजपूत वातावरणाचाही परिणाम असेल.

कल्याणीचं दिग्दर्शन प्रा. भालबा केळकर यांनी केलेलं आहे. स्क्रिप्ट निवडण्यात झालेली चूक वगळता दिग्दर्शन ठाकठीक आहे. श्रीपाद आडकर (अप्पा), ज्योती मेहेंदळे (कल्याणी) या दोघांचीही निवड त्यांच्या त्यांच्या भूमिकांसाठी अयोग्य वाटली. ते उभयता पुरेशा सामर्थ्याअभावी, आवाजाअभावी आपापल्या भूमिकांना न्याय देऊ शकले नाहीत. तर श्रीराम खरे (वासुदेव) यांचं वय त्यांच्या परिणामकारकतेआड थोडंफार येत होतं. अनेक पात्रांच्या हालचाली अनावश्यक किंवा सदोष होत्या. अजित सातभाई (दामू) आणि सेवा चौहान (आत्या) यांच्या समरसून केलेल्या भूमिका ही अभिनयाच्या आघाडीवरची कल्याणीची मोठी जमेची बाजू आहे. विशेषतः आंधळ्या वृद्धेच्या सोशिक भूमिकेशी स्वतःला एकरूप करून घेणाऱ्या सेवा चौहान यांनीच खरं तर कल्याणीचा एकखांबी तंबू आधारून धरला. इंदिरा, काशी, मंदा, सावित्री यांच्या भूमिकाही ठीक वठविल्या गेल्या. जयराम कुलकर्णी यांचाही उल्लेख आवश्यक.

कल्याणीचं फार मोठं अपयश हे प्रभावहीन लेखनातच आहे. पहिल्या अंकातला 'पात्रपरिचयाचा' प्रकार तर हास्यास्पद आहे– 'ही इंदिरा, ही दिवसभर अशी खात असते'– वगैरे, अशा थाटात. नाटकाच्या अगदी आरंभीच्या हालचालीही– पात्रांचं येणं जाणं– अशाच स्वरूपाचं. अप्पा–आत्या मिळून जुन्या आठवणी काढतात तो प्रसंग हा कृत्रिम लेखनाचा उत्तम नमुना, त्यामुळेच तो प्रभावहीन ठरतो. वासुदेवाचा दामूवरचा राग हाही पुरेशा कारणाअभावी अनाठायी वाटणारा आहे. घरातल्या विधवा स्त्रियांच्या व्यथा मात्र लेखिकेनं चांगल्या साकारल्या आहेत.

कल्याणीचे दोन–तीन शेवट आतापर्यंत बदलण्यात आल्याचं ऐकलं. हे लक्षण आत्मविश्वासाचं तर खचितच नव्हे.

□